

दा.क्र. ६४६५

# गुरुदेव टागोर

अनुक्रम २८८७
विभाग बा.वा.
क्रमांक १०४४
नों. दि. ३।१३।६

लेखक
श्री. दामोदर नरहर शिखरे
एम्. ए.

म. प्र. सं. ग्रंथालय
दा. क्र. ६४६५ नों दि.
वि. बा. वा.

IRBK-0106465
IRBK-0106465

कींमत एक रुपया

★ चित्रशाळा प्रकाशन, पुणें-२ ★

: मुद्रक व प्रकाशक :
दा. त्र्यं. जोशी, बी. ए. (टिळक),
व्यवस्थापक, चित्रशाळा प्रेस,
१०२६ सदाशिव पेठ, पुणें २.

सर्वाधिकार प्रकाशकाधीन

प्रथमावृत्ति
७ ऑगस्ट १९५७

# अनुक्रमणिका


शांतीची पुजारीण

| | | | |
|---|---|---|---|
| १ | निसर्ग हाच गुरु | .... | १ |
| २ | मनाची मशागत | .... | ७ |
| ३ | पहिलें पारितोषिक | .... | १७ |
| ४ | कवि-मनाची घडण | .... | २३ |
| ५ | काव्याचा कोहिनूर | .... | ३१ |
| ६ | पंच-कलांच्या परिसरांत | .... | ४५ |
| ७ | देशभक्तीची ज्योत | .... | ५७ |
| ८ | मानवतेचें घरटें | .... | ६८ |
| ९ | जगीं हो जयजयकार ! | .... | ७५ |
| १० | चरित्र पट | .... | ८५ |


—:—


IRBK-0106465

IRBK-0106465

# शांतीची पुजारिण

एक विद्वान् आचार्य कविता समजावून सांगत होते. ते महाराष्ट्रीय आचार्य एका बंगाली कवितेचा भावार्थ समजून देत होते.

कठोर तर्कवादी असे ते आचार्य पुणें येथील जिज्ञासूंना एका बंगाली कोमल कवितेच्या पाकळ्या न् पाकळ्या उलगडून दाखवीत होते—अतिशय हळुवारपणें, अत्यंत प्रेमळपणें—फूल कुचंबूं न देतां त्यांतील रस घेणाऱ्या भ्रमराप्रमाणें.

मीहि तें काव्य-विवेचन ऐकत होतों—

—त्यांतील मृदु पद-लालित्य अनुभवीत होतों,

—त्यांतील नाट्यमय वातावरण सेवन करीत होतों.

—त्यांतील उदात्त संदेश तन्मयतेनें प्राशन करीत होतों.

—चकोर पक्ष्यानें चंद्राचे अमृत-कण वेचावे तसे.

त्या बंगाली काव्याचा अनुवाद ते आचार्य जसजसा विशद करूं लागले, तसतसें त्यांतील प्रतिभेचें प्रसन्न चांदणें मला मोह पाडूं लागलें आणि त्यांतील विश्वशांतीचा मंगल मंत्र तर माझ्या मनाला मुग्धच करूं लागला.

त्या काव्याचें नांव होतें 'पुजारीण'–भगवान् बुद्धानंतरच्या काळांत, एका राजवाड्यांत, एका प्रशांत सायंकाळीं, घडलेली ती हृदयद्रावक घटना अशी होती:—

"सायंकाळ झाली आणि श्रीमती हातांत पूजेचें तबक घेऊन निघाली. मगध देशच्या राजवाड्यांतील ती एक नर्तिका. राजाच्या उद्यानांतील एका अशोक–वृक्षाखालीं प्रत्यक्ष भगवान् बुद्धांनीं राजाला बौद्ध धर्माची दीक्षा दिलेली होती. पण त्याचा एक पुत्र, अजातशत्रु, बुद्ध-द्वेष्टा निघाला. तो राज्यावर बसला आणि राज्यांतील बौद्ध धर्म समूळ खणून काढूं लागला. त्यानें एक हुकूम सोडला, बुद्धाची पूजा करणाऱ्याला देन्हात प्रायश्चित्त दिलें जाईल. पण नर्तिका श्रीमती बुद्धाची परम-भक्त होती. तिनें त्या राज-उद्यानांतील त्या अशोक-वृक्षाखालीं, बुद्धाची पूजा करण्याचा निश्चय केला.

ती हातांत पूजेचें साहित्य घेऊन राणीच्या महालांत गेली, पण राणीनें तिला हाकलून दिलें. नंतर ती राजकन्येच्या महालांत गेली, पण तिचा अवतार पहातांच राजकन्येच्या हातांतून भीतीनें फणी गळून पडली. तरी श्रीमतीचा निर्धार अचल होता. ती तशीच एकटी त्या उद्यानांत गेली आणि दुसरे दिवशीं प्रात:कालीं—

लोकांनीं पाहिलें, अशोक–वृक्षाखालीं श्रीमतीच्या रक्ताचा सडा पडलेला आहे!"

रवींद्रांच्या सहस्र किरणांपैकीं हा एक!

ही मूळ बंगाली कविता पुढें दिली आहे.

● ● ● ●

# पुजारीन

श्रीमतीरे हेरि बाँकि गेल रेखा, काँपि गेल तार हात
कहिल " अबोध, की साहसबले
अनेछिस पूजा, ऐखनि जा चले—
के कोथा देखिबे, घटिबे ताहले विषम विपदपात । "

अस्त रविर रश्मि–आभाय खोला जानालार धारे
कुमारी शुक्ला बसि ऐकाकिनी
पडिते निरत काव्यकाहिनी,

चमकि उठिल शुनि किंकिणी, चाहिया देखिल द्वारे ।
श्रीमतीरे हेरि पुँथि राखि भूमे द्रुतपदे गेल काछे ।
कहे सावधाने तार काने–काने
" राजार आदेश आजि के ना जाने—

ऐमन करे कि मरणेर पाने छुटिया चलिते आछे । "
द्वार हते द्वारे फिरिल श्रीमती लइया अर्घ्यथालि ।
" हे पुरवासिनी " सबे डाकि कय,
" हयेछे प्रभुर पूजार समय । "

" शुनि घरे घरे केह पाय भय, केह देह तारे गालि ॥
दिवसेर शेष आलोक मिलालो नगर सौध "—परे ।
पथ जनहीन आँधारे विलीन,
कलकोलाहल हये ऐल क्षीण,

आरतिघंटा ध्वनिल प्राचीन राजदेवालय–घरे ।
शारद निशिर स्वच्छ तिमिरे तारा अगण्य ज्वले ।

सिव्हदुयारे वाजिल विषाण,
बंदीरा धरे संध्यार तान,
"मंत्रणासभा हल समाधान" द्वारी पुकारिया बले ।।
अेमन समये हेरिला चमकि प्रासादे प्रहरी यत,
राजार विजन कानन–माझारे
स्तूप–पद–मूले गहन आँधारे
ज्वलितेछे केन येन सारे सारे प्रदीपमालार मतो ।
मुक्तकृपाणे पुररक्षक तखनि छुटिया आसि
शुधालो, "के तुझि ओरे दुर्मति
मरिबार तरे करिस आरति ।"
मधुर कंठे शुनिल, "श्रीमती, आमि बुद्धेर दासी ।"
से दिन शुभ पाषाणफलके पडिल रक्तलिखा ।
मदिन शारद स्वच्छ निशीथे
प्रासादकानने नीरवे निभृते
स्तूपपदमूले निबिल चकिते शेष आरतिर शिखा ।।

—रवीन्द्रनाथ

२८.८.९२
आ. वा.
१०४४
३९१३८४

# : १ : निसर्ग हाच गुरु

वसंत ऋतु किती मनोहर ! त्याच्या सोनेरी पावलांची साक्ष झाडांच्या पानापानांवर उमटलेली दिसत होती. वातावरणांतील कणाकणांतून चैतन्य खेळत होतें. आणि आंब्याचीं झाडें तर काय ? मोहोरांनीं मढविलेलीं ! एकाद्या रूप-संपन्न राजकन्येच्या कानांत सोन्याच्या नक्षीदार बुगड्या शोभाव्या, त्याप्रमाणें पिवळ्याधमक मोहोरांचे भरगच्च घोस आंब्याच्या कांहीं झाडांवर लोंबत होते; तर एकाद्या गरीब खेडुत मुलीच्या कानांत रुप्याच्या बुगड्या चमकाव्यात, तशा पांढरसर मोहोरांच्या लोंब्या कांहीं आंब्यांच्या झाडांना लटकलेल्या होत्या. सोनेरी असो वा रुपेरी असो—दोन्ही मोहोरांमधून एकच मत्त गंध दरवळत होता आणि मन मुग्ध करीत होता.

तो सुगंध घेत घेत, छोटा रविबाबू आपल्या नोकराला हांक मारून म्हणाला, " अरे श्याम, किती गोड वास येत आहे या आंब्याच्या मोहोराचा ! "

" होय ना. " श्याम हसत हसत म्हणाला, " पण छोटेबाबू, यापेक्षां किती तरी अधिक गमतीजमती या झाडापलीकडे आहेत. त्यांची आहे कां कांहीं कल्पना तुम्हाला ? "

" छेः रे, मला कांहींच कल्पना नाहीं. कसल्या गमती, कसल्या जमती आहेत तिथं बाहेर ? "

" तें कांहीं पुसूं नका, छोटे बाबू. मी घरांतून बाहेर पडलों कीं मजाच मजा ! घोड्यांच्या बग्या काय धावतात, भोई लोक पालख्या काय वाहून नेतात, त्यांत आमच्या छोट्या बाबूसारखे लोक किती बसतात ! " फुलें घ्या, फुलें ! " असें कोणी ओरडतात; तर " कैऱ्या

पाहिजेत कां कैऱ्या ? " असें कोणी विचारतात. वा ! वा ! केवढी मौज असते ती ! रस्त्यांतून, बाजारांतून बायका–पुरुषांची ही गर्दी ! "

तो सारा न दिसणारा देखावा रविबाबूंच्या चिमण्या डोळ्यांपुढें उभा राहिला. आंबट कैऱ्यांचें नांव काढतांच त्याच्या तोंडास पाणी सुटलें. तें नवें जग पाहण्यास; नवें सुख लुटण्यास तो उत्सुक झाला आणि म्हणाला, " चल, चल श्याम, मला त्या बाहेरच्या जगांत घेऊन चल–त्या शहरांत घेऊन चल. "

" नको रे बाबा. " श्याम दोन्ही कानांवर हात ठेवून म्हणाला, " छोट्यासाहेबांना मोठ्या रस्त्यावर न्यायचें नसतें. नेलें तर महर्षि काय म्हणतील मला ? नोकरीवरून काढून टाकतील ना एकदम... " असें म्हणून श्यामनें घाबरल्यासारखी मुद्रा केली–आणि लगेच तो खोऽखो करून हंसूंहि लागला.

महर्षि म्हणजे देवेंद्रनाथ, त्यांचें घराणें मोठें श्रीमंत. तरी देवेंद्र-नाथांची रहाणी अगदीं साधी–साधुसारखी, संन्याशासारखी. ते मोठे कवि होते, पंडित होते, संपादक होते, ग्रंथकारहि होते. संस्कृत भाषेंतील जाडे जाडे ग्रंथ त्यांनीं वाचलेले होते–युरोपांत प्रवास करून आलेले होते ते. अशा धार्मिक व विद्वान् माणसाला इतर लोक सहजच ' संत ' म्हणत, ' महर्षि ' म्हणून मान देत.

देवेंद्रनाथांचे वडील द्वारकानाथ. यांचें ऐश्वर्य तर कळसास पोहोचलेलें होतें. ' राजा ' म्हणूनच लोक त्यांना ओळखीत. ते विलायतला गेले होते, तेव्हां ' राजा द्वारकानाथ टागोर ' या बिरुदावळीनें त्यांचें तेथें मोठ्या थाटामाटानें स्वागत झालें. अशा वडिलांच्या कीर्तींत भर घातली देवेंद्रनाथांनीं. ' ब्राह्म समाजाच्या ' स्थापनेंत त्यांचा हात होता. ' ब्राह्मधर्म ग्रंथ ' म्हणून त्यांनीं विद्वत्तापूर्ण ग्रंथ लिहिला. लक्ष्मी व सरस्वती यांच्या मधुरमीलनामुळें टागोर–घराणें बंगालमध्यें सुविख्यात झालें होतें.

अशा प्रतिष्ठित घराण्यांत, अशा थोर परंपरेंत, महर्षि देवेंद्रनाथांच्या पोटीं, ता. ६ मे १८६१ रोजीं एक तेजस्वी बाळ जन्मास आलें–त्याचें नांव रवींद्रनाथ !

देवेंद्रनाथांना एकूण चौदा मुलें झालीं. त्यांतील शेवटचे रवींद्रनाथ. टागोरांच्या वंशवृक्षाचें हें शेंडेफळ अतीव मधुर होतें. इतर मुलेंहि, कोणत्या ना कोणत्या क्षेत्रांत, मान्यतेस चढलीं व धन्यतेस पात्र झालीं. पण रवींद्रांचें यश कांहीं लोकोत्तरच ! वयानें सर्वांत धाकटा असून गुणानें सर्वांत मोठा, असा हा मुलगा देवेंद्रांचा लाडका होता. त्यांचा एक मुलगा तत्त्वज्ञानी होता, तर दुसरा चित्रकार म्हणून कीर्ति पावला होता. तिसरा मुलगा पुढें आय्. सी. एस्. झाला–जज्ज बनला. कोणाची गति संगीतांत, तर कोणाची पांडित्यांत. पण सारे यशवंत व प्रतापवंत. त्यांत सर्वांत उंच पताका फडकविली रवींद्रांनीं !

कलकत्ता शहरांतील टागोरांचें घर म्हणजे एक प्रशस्त वाडा होता. जणुं किल्लाच ! त्यांत किती चौक होते ! किती खोल्या होत्या ! हा वाडा तिमजली होता. त्याचे दरवाजे प्रचंड व भक्कम होते. त्या वाड्याबाहेर फिरकण्याची मुभा लहान मुलांना नसे. वडीलधाऱ्या माणसाचें जग निराळें व लहान मुलांचें जग निराळें,–अशी कप्पेबंद व्यवस्था असे. या दोन्ही जगांतील कायदेहि निराळेच. मोठीं माणसें हवी तिकडे जात; याचा "बाबालोकांना" मोठा हेवा वाटे. वडील माणसापुढें उभें रहाण्यासहि लहान मुलें कचरत. पूर्वीचा काळच तसा होता.

त्या वाड्यांतील, तिसऱ्या मजल्यावरील, एका उंच खोलींत, रवि एकटा बसे–नव्हे, त्याला बसावें लागे. त्याचा नोकर श्याम हा खडूनें एक वर्तुळ काढी आणि आपली मुद्रा उग्र करून व नाकावर बोट ठेवून त्याला बजावी, "छोटेबाबू, या रेघेच्या पलीकडे जायचं नाहीं हं !" रवि घाबरे. लक्ष्मणानें ओढलेली रेघ सीतेनें ओलांडली, पण

श्यामनें काढलेल्या वर्तुळाबाहेर रवींनें पाऊल टाकलें नाहीं. त्याच्या मनाला हा धसकाच बसला.

एके दिवशीं तर, " पोलिस आले ! पोलिस आले ! " असें घरांत कोणीसें ओरडलें. पोलिस म्हणजे काय आणि तो करतो काय ? याची कल्पना लहानग्या रविबाबूला कोठून असणार ? पण भीति मात्र जबरदस्त वाटूं लागली. जसा घरांत साप शिरावा, लांडगा घुसावा किंवा वाघ यावा, तशी धामधूम मुलांची उडाली. रवि तर काय ? आपल्यामागें पोलिस सोटे घेऊन धांवत येत आहेत अशा भीतीनें, पाठीला पाय लावून, आपल्या घरांतील अगदीं दूरवरच्या, अंधाऱ्या कोपऱ्यांतल्या, एका खोलींत दडून बसला. बाल-मनावर भयाचें भयंकर दडपण पडलें.

तसा एकान्तवासच रविबाबूंना आवडूं लागला. सक्ती अंगवळणीं पडली. ते तिसऱ्या मजल्यावरील एका खोलींत, प्रहरन्प्रहर, एकटे बसूं लागले. त्या खोलीच्या खिडकींतून, समोरचे विशाल वटवृक्ष त्यांना दिसत आणि दक्षिणेकडील नारळाच्या झाडांचीं जंगी झुलुपें त्यांच्या मनाला हलवीत.

खालीं एक तळें होतें. पहाट फटफटली कीं, त्या तळ्यावर एकामागून एक माणसें स्नानास येत. कोणी दोन्ही कानांत बोटें घालून ' हर गंगे ! हर गंगे ! ' अशी आरोळी ठोकून तळ्यांत बुडी मारीत, तर कोणी वरून एकदम उडी झोकून देत. कोणी भूपाळ्या गात तर कोणी मंत्र म्हणत. दुपारपर्यंत हे स्नानविधि चालत. दुपारनंतर, मात्र, त्या तळ्यांत, केवळ पांढरींशुभ्र बदकेंच स्वच्छंदानें संचार करीत. त्यांच्याकडे रविबाबू, घटकान्घटका, टक लावून पहात व त्यांच्याशीं तन्मय होत. त्या जलाशयांतील तरंगांचा अखंड खेळ पहाण्यांत ते दंग होत. त्या सरोवरांत पडलेलें शेजारच्या वटवृक्षांचें प्रतिबिंब अवलोकन करण्यांत ते गुंग होत. तें वडाचें झाड म्हणजे त्यांना एखाद्या ऋषीसारखेंच भव्य व पवित्र वाटे. आणि जमिनीपर्यंत लोंबणाऱ्या त्या

वडाच्या पारंब्या ! ऋषीच्या जणुं जटाच ! वाऱ्याच्या झुळकेबरोबर वडाचीं पानें हालत—त्यांच्या सांवल्या तळ्यांतील पाण्यावर हालत— आणि त्याबरोबरच रवींद्रांच्या हृदयांतील भावनाहि हालत.

त्या तळ्यापलीकडे, झाडापलीकडे, फळांची नि फुलांची जी एक सुंदर नि सुगंधी बाग फुललेली असे; ती पहातांना तर रविबाबूंचें भानच हरपे–नंदनवन पाहिल्याचें सुख त्यांना वाटे.

मधून मधून रविबाबू आकाशाकडे पहात—आणि त्या वेळीं त्यांचें अंतःकरण आकाशाइतकें विस्तीर्ण होई. त्या आकाशांतील ढगांची धांवपळ पहातांना त्यांची कल्पनाशक्तिहि धावूं लागे. ढगांचे निरनिराळे आकार दिसले कीं त्यांना वाटे, हे हत्ती आहेत का सिंह आहेत ? का माकडें आहेत ? वाऱ्यानें फडफडणारीं पानें पाहिलीं म्हणजे झाडेंच आपल्याला खेळावयास बोलावीत आहेत असें त्यांना वाटे. फुललेल्या फुलाफुलांत त्यांना सवंगड्यांचे हसरे चेहेरे दिसत. फार काय, पायाखालची खडबडीत जमीन पाहिली, तरी त्यांची कल्पना-शक्ति उड्या मारीत जाई.

“पृथ्वीचा हा नुसता पृष्ठभागच आपण पहातों, पण तिच्या पोटांत आपण कसें शिरूं ? ” असें त्यांच्या मनांत येई. घरांतील एखाद्या समारंभाच्या वेळीं, मंडपाचे खांब रोवण्यासाठीं, जमिनींत खड्डे पाडीत. तेव्हां रवींची कल्पनाशक्ति म्हणे, “ हे खड्डे आणखी खोल कां नाहीं खणीत ? म्हणजे आपण खोल खोल जाऊन धरणीमातेच्या हृदयाला बिलगूं. ”

धरित्रीमातेच्या कुशींत शिरण्यासाठीं एकाद्या इंजिनियराप्रमाणें रविबाबू शास्त्रीय योजना आंखीत. उंच उंच बांबू आणावे, ते एक-मेकांना जोडावे आणि पृथ्वीच्या पोटापर्यंत ते भिडवावे म्हणजे त्या बांबूंतून आपण तेथें जाऊं; अशी कल्पना त्यांच्या मनांत कधीं कधीं चमकून जाई; तर कधीं कधीं त्यांचें मन कल्पनेचे असे मनोरे उभे करी कीं, एकीवर एक शिड्या रचून, त्यांच्या पायऱ्यांवरून, आपण आभाळापर्यंत

गेलों आहोंत, चंद्राला स्पर्श करीत आहोंत, त्याच्या मांडीवरील हरिण खेळण्यासाठीं मागत आहोंत आणि—

असें हें चंचल व विशाल मन !—पण त्या बंदिस्त, तिमजली इमारतीच्या एका लहानशा खोलींत, कल्पनांचीं जाळीं विणीत, जागे-पणीं स्वप्नें पहात, पृथ्वी, जल, आकाश, वनस्पति अशा निसर्गापासून धडे घेत, रविबाबू आपले बालपणचे दिवस घालवीत होते; लौकिक दृष्टीनें वायां घालवीत होते; पण खऱ्या अर्थानें सार्थकीं लावीत होते.

खोलीच्या पिंजऱ्यांत अडकलेला हा पोपट वडाच्या व नारळाच्या फांद्या-फांद्यांवरून उड्या मारणाऱ्या स्वच्छंदी पोपटाकडे, आसुसलेल्या नजरेनें, पहात राही. दैवयोगानें एकदां तो स्वच्छंदी पोपट पिंजऱ्यांतील पोपटाला भेटला आणि म्हणाला, " चल, चल. माझ्याबरोबर चल आपण दोघे रानावनांत भराऱ्या मारूं. "

" नको, नको, तूंच पिंजऱ्याच्या आंत ये. येथें आपण दोघे मजेनें खेळूं. "

" अरे गड्या, तुझ्या त्या पिंजऱ्यांत आपले पंख पसरायला जागा कोठें आहे ? " रानांतील पोपटानें पृच्छा केली.

" पण दोस्ता, आपण आकाशांत गेलों तर आपल्याला बसाव-यास दांडा कोठें आहे ? " पिंजऱ्यांतील पोपटानें आपली अडचण सांगितली.

अशा काल्पनिक सुखसंवादांत बाल रवीचें मन रमून जाई. वायूच्या लहरींतून, जलाच्या तरंगांतून, गगनाच्या मेघांतून, वृक्षाच्या पर्ण-पुष्पांतून—निसर्गाच्या प्रत्येक हालचालींतून रविबाबू आनंदाचा मध शोषून घेत-आणि त्याबरोबरच, त्यांना नकळत, त्यांच्या बुद्धींत ज्ञानहि पाझरे. त्यांचें अंतःकरण आपोआप, सहजासहजीं, सुखासुखीं, उन्नत, उदात्त व उदार बनत चाललें.

● ● ● ●

## : २ : मनाची मशागत

एके दिवशीं संध्याकाळीं—

ईश्वर आला. "अरे रवि, अरे द्विजेन्द्र, अरे ज्योति, या, या, लवकर या. हातपाय धुऊन सत्वर या. मी आज तुम्हांला एक रोमांचकारक कथा निवेदन करणार आहें.—दोन शूर-वीर बालकांची कथा निवेदन करणार आहें. केवढे पराक्रमी पुत्र ! प्रत्यक्ष आपल्या पित्याशीं युद्ध करण्यास सज्ज ! "

ही गंभीर सुरांतील, प्रौढ भाषेंतील ईश्वराची हांक मुलांच्या कानांवर गेली आणि त्यासरशीं तीं मुलें ओट्यावर गोळा झालीं—जसे कांहीं फुलाकडे धावणारे भुंगे किंवा गुळाजवळ गोळा होणारे मुंगळे! त्या साऱ्या मुलांना ईश्वर फार आवडे—त्याच्या रसाळ वाणींतून निघणाऱ्या कथा तर फारच आवडत. कधीं रामायणांतल्या, तर कधीं महाभारतांतल्या कथा ईश्वर रंगवून सांगे; आणि त्या मुलांना त्यांत रंगवून सोडी.

श्रीरामाची सत्य-निष्ठा व सीतेची पति-निष्ठा, भरताचें बंधु-प्रेम व हनुमानाचा पराक्रम यांचा ठसा रविबाबूंच्या बाल मनावर उमटे. तसेंच श्रीकृष्णाचें चातुर्य, धर्मराजाचें शांति-प्रेम व भीमार्जुनांचें शौर्य यांचीं चित्रें त्याच्या कोंवळ्या चित्तावर कोरलीं जात.

ईश्वर हा एक खेड्यांतील शिक्षक होता. तो स्वच्छतेचा फार भोक्ता. पाणी, माती, हवासुद्धां स्वच्छ मिळविण्याचा तो प्रयत्न करी. एखाद्या पुराणिकासारखी प्रौढ व संस्कृतप्रचुर भाषा तो वापरी. टागोर-घराण्यांत मुलें फार. त्यांना निरनिराळे विषय शिकविण्यासाठीं वेगवेगळे शिक्षक येत. त्यांत ईश्वराकडे काम गोष्टी सांगण्याचें. किती गोड काम ! त्याच्या हाकेसरशीं मुलें धांवून जात, यांत नवल काय ? एक तेलाचा

दिवा प्रकाश पाडीत होता—आणि त्याहिपेक्षां अधिक धूर सोडीत होता. त्याच्या मंद प्रकाशांत मुलांच्या सावल्या मोठमोठ्या दिसत. मुलें सशाप्रमाणें कान टवकारून जवळ बसलीं. त्यांची उत्कंठा दांडगी! आणि त्यांत आज तर—

"तीं अरण्यवासी बालकें अंगावर वल्कलें धारण करून व हातांत धनुष्य-बाण घेऊन आश्रमाच्या बाहेर पडलीं. त्यांचें मुख चंद्रासारखें, नेत्र कमलासारखें आणि—

"पण गुरुजी, त्यांचीं नांवें काय? कोण ते?" मुलांनीं, कुतुहल न आवरून, विचारलें.

"अरे, ते आपले कुश अन् लव. प्रभु रामचंद्राचे पुत्रच ते! श्रीरामाच्या अश्वमेध-यज्ञांतील तो श्यामकर्ण अश्व सैन्यासहवर्तमान त्या आश्रमासमीप आला, तोंच........

कथा चालली—युद्धाची कथा चालली—मधाच्या ओघासारखी मधुर ती मुलांना वाटूं लागली. ते मिटक्या मारीत त्या कथेचें प्राशन करूं लागले. लव–कुशांचे एक एक पराक्रम ऐकतांना, आश्चर्यानें त्यांच्या भुंवया उंचावल्या आणि आ वासून ते ऐकूं लागले. ऐकतां ऐकतां वेळेचें भान कुणालाच नव्हतें–ना शिक्षकाला ना मुलांना. झोपेची वेळ झाली तरी तिची आठवण कोणासच नाहीं. मधून मधून काव्याच्या पंक्तिहि ईश्वर म्हणत असे. शेवटीं श्रीरामाची आपल्या मुलाशीं व पत्नीशीं भेट व मैत्री झाल्याचें सांगून ईश्वरानें तें आख्यान पुरें केलें, तेव्हांच ते चिमणे श्रोते उठले. स्वप्नांतहि तीच कथा मुलांना दिसूं लागली. रविबाबूंच्या मनाची मशागत अशा प्रसंगांनींच घडली. आणि एके दिवशीं संध्याकाळीं—

धो धो धो धो पाऊस पडत होता. रस्त्यावर घोटाभर पाणी सांचलें होतें, तळ्यांतील पाणी ओसंडून जात होतें, काळ्याकाळ्या

ढगांच्या पलटणी आकाशांत वेगानें दौडत होत्या, आणि विजांचा तोफखाना धूमधडाक्यानें चालला होता.

"पाऊस पडे टपाटपा। पान हालतें झपाझपा।" अशा शाळेंतील कविता ठेक्यावर गात गात टागोरांचीं मुलें, मौजेनें नाचत-बागडत होतीं. निसर्गाचीं नानाविध रूपें पहाण्यांत त्यांना किती आनंद वाटत होता! त्यांना भीति होती एकच. म्हणून ते दाराशीं येऊन, टांचावर उभें राहून, दूरवर नजर टाकीत आणि रस्त्यावरून येतांना कोणी दिसलें नाहीं, म्हणजे हर्षानें टाळ्या पिटीत. "सुटलों! सुटलों! आजचा दिवस तरी सुटलों!" कोणी ओरडत, तर कोणी अंदाज करीत, "अरे, या मुसळधार पावसांत घराबाहेर पडेल कोण? भीतिच नको त्याची!" पण—

मूर्तिमंत भीति उभी राहिली त्यांच्यापुढें! दुरून एक छत्री त्यांना दिसली-आणि त्यांच्या छातींत धस्स् झालें. ती काळी छत्री पुढें पुढें आली-घरांत शिरली-आणि त्या मुलाजवळ दत्त म्हणून उभी राहिली! पाण्यानें निथळणारी ती छत्री कोपऱ्यांत ठेवून अघोरबाबू आपल्या बैठकीवर बसले. हिरमुसलेलीं मुलें, बंदिवानाप्रमाणें, तेथें बसलीं. अघोर-बाबू हा एक वैद्यक-विद्यालयांतील विद्यार्थी. तो टागोरांच्या मुलांना, इंग्रजी शिकविण्यासाठीं, दररोज संध्याकाळीं येत असे-अगदीं नियमानें, न चुकतां.

कडाक्याची थंडी असो किंवा सोसाट्याचा वारा असो अथवा जोराचा पाऊस असो, ही स्वारी बिनचूक हजर! बंगाली भाषेंतून इंग्रजी विषय ते शिकवीत. शिकवीत चांगलें; पण मुलें दिवसभरच्या श्रमानें दमलेलीं! त्यांत त्यांना संध्याकाळीं बाहेर भटकण्याची हौस! आणि विषय पडला इंग्रजीसारखा परका. त्यामुळें त्यांना अघोरबाबू हे अघोरच वाटत.-ते स्वतः वर्तनानें देव-दूतासारखे असले, तरी मुलांना मात्र भासत यम-दूतासारखे! जांभया देत देत, मुलें त्यांच्यापासून

इंग्रजी शिकत. त्यांना त्याबद्दल मुळींच आस्था नसे. एकदां तर अघोर-बाबू इंग्रजी काव्यांतील सुंदर सुंदर वेचे गंभीरपणानें म्हणून दाखवूं लागले, आणि मुलें मात्र खो खो करून हासत सुटलीं !

ते कधीं त्या मुलांना शरीरशास्त्राची माहिती देत, तर कधीं वैद्यक-विद्यालयांत नेऊन कापलेले पाय, बाहेर काढलेलें आंतडें असे मानवी शरीराचे भाग दाखवीत. पण मुलांना त्याची काय गोडी ! अघोर-बाबूंचा इंग्रजीचा वर्ग सुरू झाला कीं, मुलें डुलक्या घेऊं लागत. विद्या-देवीपेक्षां निद्रा-देवीचीच कृपा-दृष्टि त्यांच्याकडे वळे. ती निद्रा पळवून लावण्यासाठीं, मुलें डोळ्यांना पाणी लावीत किंवा अंगणांत फिरून येत. कधीं कधीं तर इंग्रजीची ही सक्तमजुरी टाळण्यासाठीं रविबाबू डोके-दुखीची किंवा पोट-दुखीची सबब आपल्या आईला सांगत.

रविबाबूंना सूर्योदयापूर्वीं उठावें लागे-लंगोट कसून कुस्ती शिकावी लागे, आणि अंगावर तांबडी माती असतांनाच, शिकवणीला बसावें लागे. सकाळीं ६ ते ९॥ पर्यंत, भाषा, गणित, भूगोल, इतिहास-इत्यादि क्लिष्ट विषयांचे डोंगर त्यांना चढावे लागत. घाईघाईनें जेवण उरकलें कीं, शाळेंत धूम ठोकावयाची ! तेथें १० ते ४ वाजेपर्यंत त्यांच्या चिमुकल्या डोक्यांत प्रचंड ज्ञान कोंबलें जायचें. ती विद्येची वखार डोक्यावर घेऊन रविबाबू घरीं येतात न येतात, तोंच अघोर-बाबू दत्त म्हणून उभे ! रात्रीं ९ वाजले, म्हणजे मग या शिक्षणाच्या चरकांतून सुटका. रविवारींहि सुटका नाहीं कीं सुट्टी नाहीं !

रविबाबूंची पहिली शाळा म्हणजे ‘ ओरिएंटल सेमिनरी. ’ त्या शाळेंतील व्हरांड्यांत, एका कोपऱ्यांत, रविबाबू हातांत छडी घेऊन शाळामास्तरांची नक्कल करीत आणि कठड्याच्या खांबांना विद्यार्थी समजून झोडपून काढीत. त्यानंतर ते ‘ नॉर्मल स्कूल ’ मध्यें गेले. तेथें वर्ग सुरू होण्यापूर्वी रोज प्रार्थना चाले-पण इंग्रजी भाषेंतून, पाश्चात्य

31

संगीतांतून ! तेथील शिक्षक तुसडे व मुलें द्वाड ! एक शिक्षक तर इतकी घाणेरडी भाषा वापरीत कीं, त्यांच्या प्रश्नांना उत्तर देण्याचेंच रविबाबूंनीं बंद केलें. मधल्या सुट्टींत ते एकटे आकाशाकडे पहात चिंतनांत मग्न असत. अशा एकलकोंडेपणांत एक वर्ष गेलें आणि वर्षाचे शेवटीं—

वार्षिक परीक्षा आली. तींत रविबाबू उत्तीर्ण झाले, एवढेंच नव्हे तर, त्यांनीं पहिला क्रमांक पटकाविला. त्यांच्यावर त्या शिक्षकाचा घुस्सा होता. म्हणून त्यानें परीक्षकाविरुद्ध तक्रार केली कीं, " हा पक्षपात आहे.–वशिला आहे. रवीचा अभ्यास कच्चा आहे. तो कसचा पास होतो ? "

पुनः परीक्षा !–परीक्षकाजवळ शाळेचे प्रमुख येऊन बसले. आतां पक्षपात कोठला नि वशिला कोठला ? तरी रवि आला पहिला !

अशीच कठीण कसोटी, कवितेच्या बाबतींतहि, रविबाबूंना लागली. शाळेंतील पुस्तकांपेक्षां आकाशांतील तारकांचाच अभ्यास ते अधिक करीत. फळ्यावरील आंकड्यांपेक्षां तळ्यांतील कमळांकडे पहाणेंच त्यांना अधिक आवडे. ' कमळ ' या विषयावरच त्यांनीं आपलें पाहिलें काव्य केलें. ८–१० वर्षांचे असतांनाच, ते लहान–लहान काव्यें रचीत आणि आपल्या लहान–लहान सवंगड्यांना वाचून दाखवीत. त्यांच्या काव्य–कमळाचा सुगंध जातां जातां शिक्षकापर्यंत जाऊन पोहोंचला.

" अरे रवि, तूं कविता करतोस म्हणे. " एका शिक्षकानें विचारलें, " ठीक, ठीक. " असे संतोषाचे उद्गार त्यानें, रविबाबूंची बाल-वयांतील कविता वाचून, काढले. विद्यार्थ्यांकडून शिक्षकाकडे, तशीच शिक्षकाकडून शाला-प्रमुखाकडे, रविबाबूंच्या काव्याची कीर्ति गेली. सुपरिंटेंडेंट म्हणजे विद्यार्थ्यांना कृतान्त काळच वाटत होते. त्यांची काळ्या पोशाखांतील काळीलठ्ठ व ठेंगणी मूर्ति पाहिली कीं, विद्यार्थी चळचळा कांपत. कारण त्यांचा सारा भर हातांतील छडीवर असे.

एके दिवशीं त्यांनीं रवीला आपल्या कचेरींत बोलावून घेतलें, आणि दरडावून विचारलें, " काय रे, तूं कविता रचतोस ? "

" होय. " रवीनें भीत भीत उत्तर दिलें.

" सत्य-निष्ठा या विषयावर कविता रचशील ? "

" होय. " पुनः रवीनें भीत भीत उत्तर दिलें.

आणि दुसरे दिवशीं त्यानें त्या उच्च तत्त्वावरील आपली नवी कविता त्या प्रमुखांना दाखविली. कविता पाहिली मात्र, आणि स्वारी एकदम खूष झाली. पहाड पाझरला ! पोलाद वितळलें !—आणि ते प्रमुख आनंदानें हसूं लागले. त्यांनीं रविबाबूंच्या पाठीवर थाप मारून म्हटलें, " वा ! वा ! काय बहार केली आहेस तूं ! "

आणि त्यांनीं रविबाबूंना शाळेंतील सर्वांत वरच्या वर्गांत नेलें आणि फर्माविलें, " म्हण ती तुझी कविता; या विद्यार्थ्यांना म्हणून दाखव. " केवढें हें कौतुक ! केवढा हा गौरव ! रविबाबूंचें बाल-मन अभिमानानें फुगून गेलें. त्यांनीं त्या उच्च वर्गांत, उच्च स्वरानें, आपलें स्वतःचें काव्य गाऊन दाखविलें.

आपलें स्वतःचें काव्य ?

" छे ! हें कोठलें याचें स्वतःचें काव्य ? कोणाचें तरी चोरून आणलें असेल, झालें ? "

" कोणाचें कशाला ? नक्की मला ठाऊक आहे, कोणाचें तें. ज्यांतून हें काव्य यानें चोरून घेतलें तें पुस्तक मी पाहिलें आहे ना ? तें आणून दाखवितोंच उद्यां. "

मत्सरी विद्यार्थ्यांनीं एकच कोलाहल केला. पण त्या काळ्या पोशाखांतील काळ्या प्रमुखांनीं आपलें बोट वर उचलतांच सारें तुफान शांत झालें. " हें काव्य याचेंच आहे आणि तें उत्तम आहे. "

अखेरचा निर्णय प्रमुखांनीं दिला.

रविबाबूंच्या काव्याचें खरें कौतुक केलें त्यांच्या वडिलांनीं. ते स्वतः

भावनाशील, श्रद्धाशील, साधुशील होते. ईश्वराच्या प्रार्थनेंत ते तन्मय होत. ते वारंवार देवतात्मा हिमालयाकडे धाव घेत. त्यांचें मुलावर फार प्रेम—त्यांतहि रविबाबूंवर विशेष. शेंडेफळ ना तें ! आणि तें काव्य-रसानें गोडावलेलें ! कालिदासाचें 'कुमारसंभव', शेक्सपीअरचें 'मॅकबेथ' असे अभिजात काव्य-ग्रंथ ते रविबाबूंना देत. रविबाबूहि त्यांतील रस सेवन करण्यांत रमून जात. त्यांनीं 'मॅकबेथ' नांटकाचें बंगालींत भाषांतर केलें, आणि पंडित ईश्वरचंद्र विद्यासागर यांना दाखविलें. या बाल-लेखकाचें त्या महापंडितानें मोठें कौतुक केलें.

'नॉर्मल स्कूल' मधून रविबाबूंना 'बेंगॉल ॲकॅडमी' या युरोपिअन शिक्षण-संस्थेंत घातलें गेलें. पण उपयोग काय ? 'कडू कारलें, तुपांत तळलें, साखरेंत घोळलें, तरी तें कडू तें कडूच.' असें रविबाबूंच्या बाबतींत शिक्षकांना वाटे.शाळेंतील त्या भयाण भिंती व तें बंदिस्त वातावरण पाहून रविबाबूंना दवाखान्याची किंवा तुरुंगाचीच आठवण होई. पुढें 'सेंट झेविअर्स' या मिशनऱ्यांच्या विद्यालयांत रविबाबूंना दाखल करण्यांत आलें. तरी तेथेंहि त्यांचें मन कुचंबलेंच. जसें कांहीं कोंड-वाड्यांत कोंबलेलें कोकरूंच. त्यांचें खरें विद्यालय म्हणजे निसर्ग. आणि त्यांचे खरे गुरु म्हणजे नदी, पर्वत, वृक्ष, पांखरें इत्यादि.

या आपल्या नैसर्गिक गुरूकडे ते आनंदानें धांव घेत. एकदां त्यांच्या भेटीसाठीं रविबाबू एका खेड्यांत गेले. पण कसे ? अगदीं चोरून–मारून. त्यांचे दोन वडील भाऊ खेड्यांत निघाले होते, तेव्हां कोणाला न कळत, रविबाबू त्यांच्या पाठोपाठ निघाले. खेड्याचा रस्ता लागतांच त्यांचें मन प्रफुल्लित झालें. दोन्ही बाजूला गर्द झाडी ! मधून मधून पाण्याचीं तळीं ! त्यांत फुललेलीं कमळें ! त्या कमळांवर गुंजारव करणारे भुंगे ! चिमण्या, पोपट, फुलपांखरें-मजाच मजा !

ती मजा पहातांना रविबाबूंना आपल्या चोरट्या प्रवासाचें भान राहिलें नाहीं. "हो हो" करीत, दोन्ही हात वर उभारीत, ते एका

पोपटांच्या थव्याकडे पाहून ओरडले. आणि त्याबरोबर ओरडले त्यांचे दोघे वडील भाऊ. " अरे तूं ? आणि इथें ?—चल, चालता हो. घरीं जा परत. " अंगावर नीट कपडे नाहींत कीं पायांत जोडे नाहींत, अशा अवस्थेंत आलेल्या आपल्या लहानग्या भावाला त्या दोघां जमीनदार-पुत्रांनीं घरीं परत पाठविलें.

पण मानवानें नाकारली, ती संधि निसर्गानें रविबाबूंना दिली. निसर्ग रागावला तरी रविबाबूंना आनंद देऊनच गेला. एकदां कलकत्त्यांत तापाची सांथ आली, त्यामुळें टागोर-घराण्यांतील बऱ्याच मंडळींना एका खेड्यांत हलविण्यांत आलें. तेथें रविबाबूंचें मन मुक्त झालें—आनंदानें नाचूं लागलें. तेथें त्यांना पूर्वजन्मींची मैत्रीण भेटली—" ये, ये. " म्हणून हांक मारूं लागली. ती मैत्रीण म्हणजे गंगा नदी.

अथांग व अपार अशा त्या गंगामाईच्या नील जल-लहरींची सलील क्रीडा अष्टौप्रहर अखंड चाललेली ! ती अवलोकन करण्यांत रविबाबूंचे दिवसामागून दिवस गेले—कसे गेले हें न कळतां गेले. दररोज सकाळीं उठल्याबरोबर रविबाबू गंगाकांठीं धांवत जात—जणुं कांहीं परमेश्वरानें पाठविलेलें, आनंददायक वृत्तांताचें, पत्रच घेण्यासाठीं ते उत्सुकतेनें जात. कधीं ओहोटी असल्यामुळें गंगेचें पाणी दूर गेलेलें असे, तर कधीं भरतीमुळें तें समुद्राप्रमाणें खळाळत असे. त्याच्या लाटांचें नृत्य, फेसांचें हास्य व खळखळाटाचें संगीत, डोळ्यांनीं पहातांना व कानांनीं ऐकतांना, रविबाबू तल्लीन होऊन जात.

पुढें नदी, तर मागें बाग. घरापुढें ती विशाल गंगानदी पहाण्यांत रविबाबूंचे तासन् तास निघून जात; तसेंच घरामागील 'लहान-नटवी' फुलबाग पहातांनाहि ते तहान-भूक विसरत. त्या बागेकडे नजर टाकली म्हणजे त्यांना वाटे, आपल्या घरांतील कोणी तरुण स्त्री, दुपारच्या वेळीं, शांत वातावरणांत, रंगीबेरंगी कापडावर भरतकाम करीत, आपल्या हृदयींचे भाव गुणगुणत बसली आहे.

या सृष्टि-सुखाची परमावधि होण्याची सुसंधि लवकरच आली-या दृष्टि-सुखाची चमचमीत मेजवानी मिळण्याची वेळ रविबाबूंपुढें चालून आली. एके दिवशीं सकाळीं ते आंबट चेहेरा करून बसले होते. कारण शाळेला जाण्याची वेळ होत आली होती. त्यांना शाळेचा नेहमींच कंटाळा, त्यांतहि आतां विशेषच. कारण नुकतीच त्यांची मुंज झालेली होती. त्यामुळें त्यांच्या डोक्याचा चमनगोटा झालेला होता. त्याची टर शाळेंतील युरोपियन मुलें उडविणार, अशी त्यांना धास्ती. पण त्या गंडांतरांतून त्यांची सुटका केली त्यांच्या पिताजींनीं. त्यांनीं त्याला माडीवर बोलाविलें आणि प्रेमानें विचारलें, " रवि, मी उद्यां हिमालयाकडे जाणार आहें, तूं येतोस ? "

रविबाबूंना स्वर्गच हातीं आल्याइतका आनंद वाटला. " शाळेच्या तुरुंगांतून सुटायचें आणि त्या उंच उंच हिमालयावर जायचें अन् त्याच्या रुपेरी शिखरावरून उड्या मारावयाच्या ! छेः छेः, यापेक्षां अधिक सौख्य तें कोणतें ? " रविबाबूंच्या अंतःकरणाला गुदगुदल्या होऊं लागल्या. ' कुमारसंभवां ' त कालिदासानें केलेलें त्या नगाधिराजाचें मनोहर वर्णन त्यांच्या डोळ्यांपुढें नाचूं लागलें. त्यांनीं चटकन् ' हो ' म्हटलें, आणि जिन्यावरून खालीं धांवत जाऊन ज्याला त्याला हें आनंदाचें वर्तमान सांगत सुटले !

त्यांना रात्रीं झोंप येईना; आणि आली तेव्हां स्वप्नेंच स्वप्नें !— ते देवदार वृक्ष ! त्यांना पाणी घालणारी ती पार्वतीमाई ! आणि ते भगवान शंकर ! त्यांचा तो नंदी ! आणि यक्ष-गंधर्व-किन्नर यांच्या झुंडीच्या झुंडी ! तें दिव्य मानस-सरोवर ! त्यांतील ते सोनेरी पंखांचे राजहंस ! आणि ते प्रचंड गरुडपक्षी !—एक ना दोन ! हजारों-हजार सौंदर्य-स्थळें ! सौंदर्याचा दर्याच जणुं उसळलेला. आणि आपण एकाच आचमनानें तो पिऊन टाकीत आहोंत—अशीं रोमांचकारक

## : ३ : पहिलें पारितोषिक

ते पिता–पुत्र आगगाडींतून झपाट्यानें निघाले. कलकत्त्यांतील कृत्रिम बंगले व गिरण्यांचीं धुरांडें त्यांनीं मागें टाकलीं. त्यांच्या डोळ्यांपुढून भातांचीं हिरवींगार शेतें पळूं लागलीं—झाडांमागून झाडें मागें धावूं लागलीं. खरी ' सुजला–सुफला ' भूमि म्हणजे वंग–भूमिच. ठायीं ठायीं तीं तळीं आणि त्यांतील कमळें यांचा चित्तवेधक चित्रपट त्यांच्या डोळ्यांपुढून वेगानें सरकूं लागला. संध्याकाळीं ते बोलपूर स्टेशनावर आले. तेथून एका पालखींत बसून ते घरीं गेले.

दुसऱ्या दिवसापासून या बालकवीचे निसर्गाशीं खेळ सुरू झाले. रानावनांतून निरनिराळ्या रंगांचे दगड आणून त्यानें एक डोंगर रचला. त्याकडे बोट करून रविबाबूंनीं वडिलांना गंभीरपणें विचारलें,

" हिमालय एवढाच असेल काय हो ? "

देवेंद्रनाथांनीं स्मित केलें व कौतुकानें मान हालविली.

शेतांतून हिंडतांना या चिमण्या कवीला एक चिमणासा झरा झुळझुळ वहातांना दिसला. हा आपला शोध त्यांनीं आपल्या पिताजींच्या कानीं घातला; आणि सुचविलें, " आपण पिण्यासाठीं या झऱ्याचें पाणी रोज आणूं या का ? "

" अल्बत. " असें म्हणून पिताजींनीं त्या सूचनेला पाठिंबा दिला आणि नोकरांना त्या झऱ्याचें पाणी आणण्याचा हुकूम दिला. रविबाबू जें जें करीत, त्याला देवेंद्रनाथ संमति देत, त्याचें कौतुक करीत. आपल्या सोन्याच्या घड्याळाला किल्ली देण्याचें जबाबदारीचें काम त्यांनीं रविबाबूंवर सोंपविलें; फार काय, हिशेब लिहिण्याचेंहि काम दिलें. मुलाचा उत्साह मोठा ! त्यानें घड्याळाला सपाटून किल्ली दिली. त्यासरशीं तें

स्वप्नें त्यांना पडूं लागलीं. 'उद्यां उगवतें केव्हां ? आणि आपण प्रवासास निघतों केव्हां !' असें रविबाबूंना झालें.

'उद्यां' उगवली ! घरांतील सर्व मंडळी एकत्र जमली. ईश्वराची प्रार्थना झाली. वडील माणसांच्या पायां पडून रविबाबूंची स्वारी वडिलांबरोबर गाडींत जाऊन बसली. जरीचें काम केलेली, जांभळ्या मखमलीची टोपी डोक्यावर घालून व अंगावर उत्तम पोषाख चढवून, हा बालकवि हिमालयाच्या दर्शनास निघाला. घरांतील 'नोकरशाहीचा' सासुरवास चुकला, शाळेचा बंदिवास टळला आणि शिकवण्यांचा त्रास संपला–यामुळें विलक्षण उल्हास रविबाबूंच्या मनास वाटूं लागला. कोण ती अपेक्षा ! कोण ती उत्कंठा !

● ● ● ●

*" सुधारणा फार दूरवरची गोष्ट आहे. सुधारणेपेक्षांहि जास्त महत्त्वाची गोष्ट आहे. प्रेम-श्रद्धा ! आम्ही सगळें एक झालों म्हणजे आपोआपच आंतून सुधारणा होईल तुम्ही तुमच्या निराळेपणाच्या भावनेनें देशाचे तुकडे तुकडे करूं पहात आहांत. म्हणे देश अडाणी आहे, म्हणून तुम्ही सुसंस्कृतांचा एक निराळा गट बनविणार. मी म्हणतों, मी कुणापेक्षां श्रेष्ठ होऊनहि कुणापासून निराळा होणार नाहीं. "*

मोडलें. दुरुस्तीसाठीं तें कलकत्त्याला पाठवावें लागलें. पण देवेंद्रनाथांनीं रागाचा एक शब्द काढला नाहीं. आणि हिशेबाच्या बाबतींत तर काय ?

एके दिवशीं संध्याकाळीं हिशेबाची झडती घेतांना देवेंद्रनाथांना आढळून आलें कीं, शिल्लक वाढत आहे. रविबाबूंच्या लिहिण्यांत कांहीं चूक झाली होती. तरी पिताजी हंसत हंसत म्हणाले, " रवि, तुला माझ्या साऱ्या इस्टेटीचाच खजीनदार करून टाकतों. कारण तुझ्या हातांत गेले कीं, पैसे वाढतात असें दिसतें. " चुका करीत करीतच मुलें शिकणार, हें तत्त्व जाणून, ते आपल्या मुलाला पूर्ण स्वातंत्र्य देत.

बौद्धिक शिक्षणहि ते देत, पण मुलाच्या मनाला न कळेल अशा रीतीनें—फूल कुचंबूं न देणाऱ्या पांखरांप्रमाणें. देवेंद्रनाथांनीं आपल्या भगवद्गीतेच्या पुस्तकांत महत्त्वाच्या श्लोकावर खुणा केल्या होत्या. " अरे रवि, एवढे हे खुणा केलेले श्लोक मला लिहून देतोस कां ? " त्यांनीं विचारलें. रविनें चटकन् ' हो ' म्हटलें. त्याला हा मान वाटला. घरांत कधींच नव्हतें, एवढें महत्त्व त्याला येथें मिळालें. त्यानें गीता लिहिली—' गीतगोविंद ' हि लिहिलें. लिहितां लिहितां त्याच्या मनावर कितीतरी शुभ संस्कार झाले. त्याचीं फळें लवकरच दिसूं लागलीं.

दुपारच्या शांत वेळीं, त्या प्रशांत बागेंत, हातांत एक वही व पेन्सिल घेऊन, रविबाबू नारळाच्या झाडाजवळ जात. आणि तेथें पाय पसरून, आकाशाकडे—आणि त्यांतील पांखरांकडे–पहात पहात ते कवितेच्या ओळी रचूं लागत. ' पृथ्वीराजाचा पराभव ' हा पोवाडा त्यांनीं लिहिला तो येथेंच !—वयाच्या अवघ्या अकराव्या वर्षीं !

असें हें रम्य स्थळ सोडून जातांना रविबाबूंना खेदच वाटला. पण पुढें हिमालयाची ओढ. ते अमृतसरकडे निघाले. जातांना आगगाडींत एक चकमक उडाली. तिकिट-तपासनिसानें पिता-पुत्रांचीं तिकिटें तपासलीं, पण तेथून पुढें जातांना रविबाबूंकडे संशयी नजरेनें पाहिलें. तो तपासनीस परत आला, तों एका साथीदाराला

घेऊन. त्या दोघांनीं रविबाबूंकडे बारकाईनें पाहिलें. ते अंमळ घुटमळले–आणि परत गेले. नंतर स्टेशन-मास्तरांची स्वारी आली. त्यांनीं त्यांचें अर्धें तिकिट पाहिलें आणि कुत्र्यांत वडिलांना विचारलें,

"या मुलाचें वय १२ वर्षांहून अधिक नाहीं ?"

"नाहीं." देवेंद्रनाथांनीं ठासून सत्य सांगितलें.

रविबाबूंचें वय खरोखरच ११ वर्षांचें होतें. पण स्टेशनावर स्टेशन मास्तर म्हणजे एक सुलतान !—एक सम्राट् ! त्यानें हुकूम सोडला, "तुम्हांला पूर्ण तिकिटाचे पैसे भरावे लागतील."

देवेंद्रनाथांचें मुख आरक्त झालें, डोळे चंचल झाले; पण क्षण-मात्रच. ते 'प्रार्थना-समाजिष्ट' होते. त्यांनीं आपल्या संतापाचा संयम केला, व आपल्या पेटींतून एक नोट काढून, अवाक्षर न बोलतां, स्टेशन-मास्तराच्या हातावर ठेवली. स्टेशन-मास्तरानें पावती खरडली आणि नोटेपैकीं उरलेले पैसे परत केले. ते सारे पैसे देवेंद्रनाथांनीं तिरस्कारानें भिरकावून दिले. त्यांच्या सत्य वचनावर विश्वास न ठेवणारा तो स्टेशन-मास्तर 'आ' वासून पहातच राहिला.

अमृतसर येथें एक महिनाभर पिता-पुत्र राहिले. तेथील शीखांचें 'सुवर्ण-मंदिर' पाहून रविबाबूंना आनंद झाला. सरोवराच्या मध्यभागीं असलेलें तें गुरुद्वार–अन् तेथें चालणाऱ्या भजनांचे निनाद, हें पहाण्या-ऐकण्यासाठीं, ते बहुधा दररोज सकाळीं, आपल्या वडिलांबरोबर जात. तेथील भजनांत वडील भागहि घेत.

रविबाबू नवीं नवीं काव्यें रचीत आणि आपल्या वडिलांना वाचून दाखवीत. अवघा अकरा वर्षांचा मुलगा पण किती सुंदर काव्य करतो ! आणि किती मधुर स्वरानें म्हणतो !–याचें त्या वत्सल पित्याला मोठें कौतुक वाटे.

एके दिवशीं रात्रीं देवेंद्रनाथ अंगणांत बसले होते. समोर बाग फुललेली होती, त्यांतील सुगंध-लहरी मंद वायु-लहरींत मिसळून जात

होत्या. आकाशांत चंद्र-बिंब उगवलें होतें. त्याचे रुपेरी किरण झाडांच्या पानांच्या फटींतून अंगणावर पडत होते व विचित्र आकृति निर्माण करीत होते. सरोवरांतील पाण्यांत तर काय? असंख्य चंद्र-बिंबें आनंदानें नाचत होतीं. त्याकडे पहातां पहातां देवेंद्रनाथ म्हणाले, "अरे रवि, किती रम्य देखावा आहे हा बघ!"

"खरंच, अतीव रमणीय! चांदणं कसं दुधासारखं पांढरंशुभ्र पसरलं आहे."

"पण त्या दुधांत साखर पडायला पाहिजे."

"ती कोणती?"

"तुझ्या गोड गाण्याची."

आणि रविबाबूंनीं बिहाग रागांत एक भक्ति-गीत म्हणावयास सुरुवात केली. ते तल्लीन झाले–पिताजी तल्लीन झाले–सारें स्थिर-चर तल्लीन झालें! आणि गाणें संपल्यावर—

"पुनः म्हणतोस कां हें सुंदर गाणं?" देवेंद्रनाथांनीं गहिंवरलेल्या स्वरानें विचारलें.

मानेनेंच होकार देऊन रविबाबू तें गीत पुनः गाऊं लागले— घोळघोळून गाऊं लागले. आणि गाणें संपल्यावर—

"बाळा, खूप बहार केलीस. आपल्या देशचा राजा आपली भाषा जाणणारा असता अन् रसिक असता, तर तो तुला एक गांव तरी या काव्य-गायनाबद्दल खचित इनाम देता. पण आहे कोठें आपला राजा? तें राजाचें काम मीच करतों." असे कौतुकाचे उद्‌गार काढून, आपल्या 'राजाच्या' हातीं, देवेंद्रनाथांनीं मोठ्या रकमेचा एक चेक ठेवला. रविबाबूंना धन्य धन्य वाटलें! त्या चेकच्या पैशांतून 'नैवेद्य' हा आपला काव्य-संग्रह त्यांनीं छापून काढला–आणि तो अर्पण केला आपल्या पिताजींना!

देवेंद्रनाथ जितके देव-भक्त, तितकेच देश-भक्तहि होते. त्या काळीं राज्यकर्त्या इंग्रजासारखा पेहराव करणें, त्यांच्या भाषेंत लिहिणें-बोलणें हें सुशिक्षित मंडळींना मोठ्या अभिमानाचें वाटे, पण या मानसिक गुलामगिरीच्या पाशांत टागोर-घराणें कधींच सांपडलें नाहीं. स्वदेशाचा व स्वभाषेचा त्यांना मोठा अभिमान. रविबाबू इंग्रजी शिकले, तेहि बंगालींतून. देवेंद्रनाथांना एकदां एका नातलगानें इंग्रजींतून पत्र लिहिलें, तर तें त्यांनीं न वाचतां परत केलें ! परभाषेचा इतका तिटकारा ! कारण नसतां, मातृभाषेचा अव्हेर कां ?

अमृतसरहून हिमालयाकडे पिता-पुत्र गेले. त्या स्वर्गीय स्थानीं ते दोघे पूर्ण रंगले. लोखंडी दांड्याची उंच काठी हातांत घेऊन रविबाबू एकटेच कधीं दाट झाडींत शिरत, तर कधीं बर्फानें आच्छादिलेल्या शिखरावर धावत. वडिलांनीं त्यांना पूर्ण संचारस्वातंत्र्य दिलें होतें. मात्र बर्फासारख्या थंडगार पाण्याचें स्नान व धारोष्ण दुग्ध-पान, यांची सक्ती ते करीत. ते आपल्या प्रार्थनेस रविबाबूंना हजर रहावयास लावीत व सहजासहजीं उपनिषदांचें तत्त्वज्ञान त्यांच्या कानीं घालीत.

सौंदर्याच्या सुवर्ण-झारींतून, रविबाबूंच्या मुखांत, प्रेमळ पित्यानें जें ज्ञानामृत पाजलें, तेंच त्यांचें खरें शिक्षण ! अशा प्रकारें सृष्टि-सौंदर्यावर चरत, काव्य-सागरावर पोहत व आनंदाच्या राशीवर लोळत, रविबाबूंचा महिना दिवसासारखा व दिवस पळासारखा झटकन् निघून जाई. दोन-तीन महिने या गिरि-विहाराचें स्वैर-सुख मुक्त-छंदानें अनुभविल्यावर, रविबाबूंना वडिलांनीं घरीं पाठविलें.

घरीं रविबाबू आपल्या काव्य-संगीतांत पुन: रमले. बंकिमचंद्रांचें ‘ वंग-दर्शन, ’ ‘ अबोध बंधु ’ इत्यादि मासिकांची त्यांना गोडी लागली. विद्यापतीच्या काव्यांत त्यांचें मन गुंगून गेलें. हिमालयाहून परत आल्यापासून रविबाबूंचा घरांतील दर्जा वाढला होता. त्यांना

अधिक स्वातंत्र्य मिळूं लागलें. संध्याकाळच्या वेळीं, घरांतील बायका-मंडळी गच्चीवर बसली असतांना, रविबाबूंची आई शारदादेवी त्यांना बोलावी व गाणें म्हणावयास सांगे. त्यांचें काव्य-गायन ऐकून ती संतुष्ट होई, आणि आपल्या मोठ्या मुलाला म्हणे, " पहा, पहा, रवि कसा गातो तें ! वाल्मीकि रामायण ऐकावें तर रवीच्याच मुखानें. "

अशा वात्सल्य-मूर्ति मातेचा वियोग रविबाबूंना आपल्या वयाच्या १३ व्या वर्षीच घडला.

● ● ● ●

*निशादेवी रानांतहि वृक्ष-वल्लींवर फुलांचा साज गुपचूप चढवून जाते; पण पहांटे फुलें जागीं होऊन गुणगुणतात, ' आम्हीं उषादेवीचीं बाळें ! ' आणि बढाईखोर उषादेवीहि उद्गारते, ' अगदीं खरं आहे तुमचं म्हणणं. '*

★ ★

*" जो अन्याय सहन करतो तोहि गुन्हेगार असतो. कारण असा मनुष्य जगांत अन्याय निर्माण करतो. नुसता चांगुलपणा म्हणजे धर्म नव्हे; त्यानें दुष्टांना उत्तेजन मिळतें."*

## : ४ :    कवि-मनाची घडण

टागोरांच्या घरांतील सारें वातावरणच काव्य-शास्त्र-संगीतानें मोहोरलेलें असे. कोणी गणेंद्र ' विक्रमोर्वशीय ' या संस्कृत नाटकाचें भाषांतर बंगाली भाषेंत करीत आहे, तर कोणी गुणेंद्र आपण लिहिलेलें नवें नाटक बसवीत आहे; कोणी ज्योतींद्र संगीत-साधना करीत आहे, तर कोणी द्विजेंद्र स्वप्न-भूमीवर प्रबंध रचीत आहे. सारें टागोर-घराणें म्हणजे नाना कलांचें क्रीडांगण-विविध विद्यांचें उद्यान !

त्याच सुमारास ' ज्ञानांकुर ' नांवाचें मासिक कलकत्ता येथें अंकुरलें. त्यांत रवींद्रांच्या कविता नेमानें छापून येत; एवढेंच नव्हे तर, त्यांचा पहिला गद्य लेखहि प्रसिद्ध झाला, तो याच नवीन मासिकांत. तो एक टीका-लेख होता. टीकेची कुऱ्हाड चालविण्याइतका आनंद तरुण साहित्यिकाला दुसऱ्या कशांत असणार ?

' भुवन-मोहिनी प्रतिभा ' नांवाचा एक काव्य-ग्रंथ त्या वेळीं बंगाली भाषेंत प्रसिद्ध झाला होता. त्याचा गौरव बड्याबड्या साहित्यिकांनीं केला होता. पण रविबाबू तरुण. त्यांनीं त्या पुस्तकावर टीकेची झोड उठविणारा लेख लिहिला-आणि तो ' ज्ञानांकुरां ' त छापूनहि आला. तेव्हां त्यांना आपले हात गगनाला पोंचले असें वाटलें.

याच्या उलट अनुभव मिळण्याचें भाग्य रविबाबूंचें होतें. ' भानुसिंह ' या टोपण नांवानें ते आपलीं भक्ति-गीतें ' भारती ' या प्रतिष्ठित मासिकांतून प्रसिद्ध करूं लागले. हें मासिक ज्योतींद्रनाथांनीं काढलें होतें. प्राचीन वैष्णव कवींचा थाट त्या कवनामध्यें होता. त्या कवितांची वही घेऊन रविबाबू आपल्या एका मित्राकडे गेले. मित्राची गंमत करण्यासाठीं, ते त्याला म्हणाले, " गड्या, परवां मी ' आदिब्रह्म-

समाजाच्या ' ग्रंथालयांतील पुस्तकें उलथीं-पालथीं करीत होतों. त्यांत एक फाटकी पोथी सांपडली. तिच्यांत भानुसिंह नांवाच्या जुन्या कवींचीं काव्यें मला आढळलीं. तीं किती गोड आहेत म्हणून सांगूं !"

"मग म्हणून दाखीव ना मला." मित्र अधीरतेनें म्हणाला. रविबाबूंनीं आपली वही उघडली व आपलींच काव्यें म्हणावयास सुरुवात केली—पण जुन्या कवीचीं म्हणून ! तीं ऐकल्यावर तो मित्र एकदम उद्‌गारला, "छे, छे. कमालच केली रे या जुन्या कवीनें ! त्याची सर विद्यापति किंवा चंडीदास यांनाहि येणार नाहीं."

याहिपेक्षां मोठी फसगंमत एका बड्या विद्वानाची झाली. आणि ती रविबाबूंच्या गौरवाची ठरली. डॉ. निशिकांत चतर्जी हे जर्मनींत अभ्यास करीत होते. ' भारताचीं भावगीतें ' या विषयावर ते एक प्रबंध लिहीत होते. त्यांत त्यांनीं असें विधान केलें कीं, "भानुसिंह या प्राचीन कवीचें काव्य श्रेष्ठ दर्जाचें आहे. तसें काव्य आधुनिक कवींना कधींच लिहितां येणार नाहीं. " विचाऱ्याला कल्पना नव्हती कीं, एका आधुनिक कवीनेंच-त्यांतहि बाल-कवीनें-तें काव्य लिहिलें आहे. मौज अशी कीं, अशा संशोधनावर आधारलेल्या त्या प्रबंधावरून चतर्जींना पीएच्. डी. ही पदवी मिळाली. भल्याभल्यांनाहि भुलविण्या-जोगा भूलभुलैया निर्माण करणाऱ्या रविबाबूंची चातुरी खरी !

कवीच्या काव्याचें कौतुक करणारे आप्त व मित्र रविबाबूंना पुष्कळ मिळाले. ' कवि-कहानी ' या नांवाचें काव्य त्यांनीं रचलें. आणि ते आपल्या भावाबरोबर अहमदाबादेस गेले. तेथून परत येऊन पहातात तों, ' कवि-कहानी ' छापून प्रसिद्ध ! त्यांच्या एका चाहत्या मित्रानें, त्यांना न कळत, त्यांचा हा पहिला काव्य-ग्रंथ छापून, त्यांना चकित केलें. अवघ्या १६ व्या वर्षीं आपल्या काव्य-ग्रंथाला प्रकाशनाचें सिंहासन लाभलें, याचा रविबाबूंना केवढा हर्ष झाला !

त्या वेळीं ते ' भारती ' च्या संपादक-वर्गापैकींहि एक होते. बाल-वयांत प्रशंसेचीं व प्रतिष्ठेचीं छत्र-चामरें त्यांच्या शिरावर धरलीं गेलीं. यापेक्षां कवीला अधिक आनंददायक काळ कोणता असणार अन् स्थळ तरी कोणतें असणार ?

पण होतें—तेंहि रवींद्रांच्या भाग्यांत होतें. एके दिवशीं त्यांच्या वडील भावानें त्यांना विचारलें, " तूं माझ्याबरोबर येतोस का ? "

" कुठं ? "

" इंग्लंडला. "

" हो. " रवींद्रांच्या कल्पना-चक्षूंपुढें दूरदूरच्या इंग्लंडचे देखावे नाचूं लागले. वयाच्या १७ व्या वर्षी, काव्य व संगीत यांचे खजिने सांगातीं घेऊन, ते आपल्या भावाबरोबर इंग्लंडला निघाले. तेथें काय ? सारी नवी सृष्टि ! नवा समाज ! नव्या सुधारणा ! तेथील समुद्र बंगालच्या उपसागरापेक्षां वेगळा नव्हता, पण तेथील मानव-सागर मात्र अगदीं भिन्न होता !—स्वातंत्र्याच्या, साम्राज्याच्या, सौख्याच्या शिखरावर पोंचलेला होता !

ते दिवस हिंवाळ्याचे होते—कडाक्याच्या थंडीचे होते. एके दिवशीं आकाशांतून वर्फाचे कण जमिनीवर भुरुभुरु पडूं लागले. तें निसर्गाचें दृश्य रविबाबूंना नवीन होतें. तें अकस्मात् दृष्टीस पडतांच त्यांचें चित्र विस्मित झालें. एकादी स्वप्न-सृष्टिच आपण पहात आहोंत असें त्यांना वाटलें.

बॅरिस्टर होण्यासाठीं रविबाबूंना त्यांच्या भावानें एका शाळेंत घातलें. लॅटिन भाषा शिकविण्यासाठीं त्यांनीं एक शिक्षकहि नेमला. पण रविबाबूंचें मन नव्या नव्या निसर्ग-शोभेंत भराऱ्या मारी. एका वर्षाच्या आंतच त्यांच्या भावाला वडिलांचें पत्र आलें, " रवीला परत घेऊन ये. " बॅरिस्टरीच्या चक्रांतून सुटल्याचा आनंद रविबाबूंना झाला. पण इंग्लंडांतील मित्रांचा निरोप घेतांना त्यांना दुःख झालें.

आश्चर्य असें कीं, ते गोरे व जेते विद्यार्थी या काळ्या व जित मुलाला प्रेमानें व समतेनें वागवीत. रवींद्रांना न कळत त्यांच्या खिशांत तीं गोरी बाळें संत्रीं–सफरचंद कोंवीत.

लंडनमध्यें ते एका इंग्रज कुटुंबांत राहिले होते. तेथें तर त्यांना पोटच्या मुलासारखें ममतेनें वागविलें जाई. रविबाबू हिंदुस्थानला परत निघाले, तेव्हां ती घर–धनीण त्यांचा हात हातांत घेऊन, अश्रु ढाळीत म्हणाली, " तुला जर इतक्या लवकर परत जावयाचें होतें, तर तूं येथें आलासच कशाला ? तूं आम्हांला इतका चटका लावून आतां वियोगाचं दु:ख कां देत आहेस ? "

या प्रेमाप्रमाणेंच प्रामाणिकपणानेंहि इंग्रज लोकांनीं रविबाबूंना चकित केलें. एकदां रविबाबू घाईघाईनें चालले होते. रस्त्यावर त्यांना एक माणूस दिसला. त्याचे कपडे फाटलेले–बूट तुटलेले ! इंग्लंडांत भीक मागणें हा गुन्हा आहे. म्हणून तो केवळ केविलवाण्या नजरेनें रविबाबूंकडे पहात होता. त्या नजरेंतील कारुण्य कवि–मनानें जाणलें. रविबाबूंनीं खिशांत हात घातला आणि हातास आलें तें नाणें त्याला दिलें. ते पुढें झटकले, पण तो भीक न मागणारा भिकारी त्यांच्यामागोमाग धावत आला.

" आणखी कांहीं पाहिजे कां तुला ? " असें रविबाबू म्हणत आहेत, तोंच त्या इंग्रजानें तें नाणें परत केलें व म्हटलें, " हें नाणें सोन्याचें आहे—चुकून दिलें असेल आपण मला. "

अशीच सचोटी रेल्वेच्या पोर्टरनेंहि दाखविली. त्याच्या हातांत नाणें टाकून रविबाबू मोटारींत बसले, तर तेथें तो पोर्टर धावत आला व म्हणाला, " माझी हमाली फक्त एक आणा; ही अधेली मला नको. "

इंग्रजी समाजाचे गुण–दोष इंग्लंडांत राहून रविबाबूंनीं जसे प्रत्यक्ष पाहिले, तसेच आंग्ल साहित्याचें सूक्ष्म व चौफेर अवलोकन त्यांनीं तेथें केलें.

शेक्सपीअर, मिल्टन, बायरन्—इत्यादि कवींचा सखोल अभ्यास त्यांनीं तेथें केला. त्यामुळें त्यांच्या जागृत होणाऱ्या काव्य-शक्तिला चैतन्य प्राप्त झालें. " तुम्ही बंगालचे ' शेले ' आहांत. " त्यांची स्तुति त्यांचे तेथील मित्र करूं लागले. ' भग्न हृदय ' नांवाचें काव्य लिहिण्यास त्यांनीं तेथेंच प्रारंभ केला. १८ वर्षांच्या तरुणानें रचलेलें हें काव्य पाहून रसिक-वर्ग मुदित झाला, एवढेंच नव्हे तर, स्वदेशीं परत आल्यावर, रविबाबूंना एका संस्थानच्या दिवाणानें मुद्दाम भेटून सांगितलें कीं, " आमच्या राजेसाहेबांना तुमची ही कविता फार फार आवडली. "

काव्याप्रमाणें संगीताचेहि रविबाबू उपासक; त्यांनीं इंग्लंडांत राहून पाश्चात्य संगीताचा अभ्यास केला. भारतीय व युरोपीय—अशा दोन्ही संगीत-कलांचा संगम त्यांच्या ठायीं झाला. त्याचें पहिलें फल म्हणजे ' वाल्मीकि प्रतिभा '. स्वदेशीं परत आल्यावर, या संगीतिकेचें वाचन, रविबाबूंनीं आपल्या घरांतील मंडळींस करून दाखविलें. कवि, कलावंत, लेखक, पंडित—अशा आपल्या मित्रांना घरीं बोलवावें, काव्य व संगीत गाऊन दाखवावें, आणि गप्पांवर व खाद्य पदार्थांवर ताव मारावा—असा टागोर-घराण्याचा शिरस्ताच होता. अशा एका घरगुती संमेलनांत ' वाल्मीकि-प्रतिभा ' ही संगीतिका नाट्यरूपानें करून दाखविण्यांत आली. त्यांत वाल्मीकीचें काम केलें रविबाबूंनीं. त्यांच्या ठिकाणीं अभिनय-कलाहि असल्याची साक्ष प्रेक्षकांना पटली.

दुसरी संगीतिका त्यांनीं रचली व अभिनयली, ती म्हणजे ' काल-मृगया '. राजा दशरथानें श्रावणाची हत्या केली, या करुण कथानकावर या संगीतिकेची उभारणी केली होती. टागोरांच्या वाड्याच्या प्रशस्त गच्चीवर रंगभूमि तयार करण्यांत आली होती. या संगीतिकेचा प्रयोग पहातांना प्रेक्षकांचें हृदय द्रवलें व डोळे पाणावले.

इंग्लंडची दुसरी सफर करण्याचा योग रविबाबूंना लवकरच आला. बॅरिस्टरीच्या अभ्यासाचा तुटलेला धागा पुनः जोडण्यासाठीं, एका नातलगाबरोबर ते इंग्लंडला निघाले. कलकत्त्याहून मद्रासला बोटीनें जाऊन ते पोंचले. बोटीवर न्या. आशुतोष चौधरी होते. त्यांच्याशीं त्यावेळीं झालेली मैत्री पुढें वाढतच गेली. मात्र, त्यांचा एक नातलग आजारी पडल्यानें, रविबाबूंना मद्रासहूनच परतावें लागलें. बॅरिस्टरीच्या मार्गानें लक्ष्मीच्या मंदिरांत प्रवेश करण्याची, रविबाबूंची दुसरीहि संधि हुकली. ते उपजत भक्त होते सरस्वतीचे— लक्ष्मीचे नव्हे.

मद्रासला जाण्यापूर्वी कलकत्त्याच्या मेडिकल कॉलेजमध्यें रविबाबूंनीं एक निबंध वाचला. हें त्यांचें पहिलें सार्वजनिक भाषण. विषय होता संगीत—आणि व्याख्यान झालें तेंहि संगीतच. आपला विषय स्पष्ट करण्यासाठीं त्यांनीं मधून मधून पदें गाऊन दाखविलीं. त्यांचा आवाज मोठा मधुर. त्यांचें काव्य-गायन ऐकण्यासाठीं त्यांचे आप्तेष्ट उत्सुक असत. कधीं दुपारच्या शांत वेळीं, तर कधीं चांदण्या रात्रीं, गंगा नदीवर, नावेंतून, त्यांची मंडळी सहल करीत; त्यावेळीं रविबाबू आपलीं मधुर गीतें, आपल्या मधुरतर स्वरानें, आपल्या नातलगांना म्हणून दाखवीत. त्यावेळीं त्यांचे बंधु ज्योतींद्र हे व्हायोलिनची साथ करीत. त्यामुळें तें संगीत मधुरतम वाटे.

काव्य हें केवळ आनंदासाठीं आहे, असें रवींद्रनाथांचें मत होतें. त्यापासून बोध निघावा किंवा प्रचार व्हावा असा त्यांचा आग्रह नसे. काव्यानंदापासून व्यावहारिक लाभ मिळवूं पहाणें म्हणजे क्रीडा-नौकेला मच्छिमारीच्या होडग्याचें स्वरूप देणें होय, असें ते म्हणत. जल-क्रीडा ही जशी निर्हेतुक आनंदासाठीं, तशीच काव्य-क्रीडाहि. कला म्हणजेच क्रीडा. मानवी मनाचा यथार्थ आविष्कार म्हणजे कला. तो आविष्कार सत्य असला, संपूर्ण असला, म्हणजे कलेचें काम संपलें.

माणूस जेव्हां हास्य करतो किंवा अश्रु ढाळतो, तेव्हां त्यापासून तो कांहीं लाभाची अपेक्षा करतो काय ? त्याच्या अंतःकरणांतील हर्ष-शोकादि विकारांचें दर्शन होतें एवढेंच. तेंच कार्य काव्याचें. आंतरिक सृष्टीचें बाह्य चित्र म्हणजे काव्य, असा रवींद्रनाथांचा दृष्टिकोन होता. या केवल व शुद्ध काव्य-भक्तिमुळें, त्यांचें काव्य रसिकजनांना मान डोलावयास लावी.

पूर्वीं एका संस्थानच्या राजानें जशी स्तुति केली, तशी बंगाल-मधील कथाकारांच्या राजानेंहि रवींद्रांच्या प्रतिभेचें पूजन केलें. बंगाली कादंबरीकारांचे राजे म्हणजे बंकिमचंद्र. ते डेप्युटी मॅजिस्ट्रेटच्या हुद्यावर होते. एकदां सर रमेशचंद्र दत्त यांच्या वडील बहिणीचें लग्न होतें. थोरामोठ्यांच्या घरचें लग्न, म्हणून कलकत्त्यांतील बडी बडी मंडळी येत होती आणि त्यांचें स्वागत थाटामाटानें होत होतें. बंकिमबाबू आले--दाराशीं उभे राहिले, तोंच यजमान त्यांच्या स्वागतास पुढें झाले. बंगालमधील रीतिरिवाजाप्रमाणें, त्यांनीं बंकिमबाबूंच्या गळ्यांत हार घातला. इतक्यांत रविबाबू तेथें आले.

त्यांना पहातांच बंकिमबाबूंनीं आपल्या गळ्यांतील हार काढला आणि रविबाबूंच्या गळ्यांत घातला व हास्यमुद्रेनें ते म्हणाले, " रमेश-बाबू, ही पुष्पमाला योग्य रवींद्रांनाच ! त्यांचें ' संध्यासंगीत ' वाचलें आहे ना आपण ? काय बहार केली आहे त्यांत या तरुण कवीनें ! " रविबाबूंना आपल्या अंगावर मूठभर मांस चढल्यासारखें वाटलें.

काव्य, संगीत, नाट्य व चित्रकला अशा चारहि कलांची उपासना रवींद्रनाथांनीं चालविली होती. कलेची ही चतुरंग सेना पाठीशीं घेऊन, त्यांनीं वयाच्या २२ व्या वर्षीं संसार-दुर्गांत प्रवेश केला. १८८३ सालीं डिसेंबर महिन्यांत त्यांचा विवाह झाला. त्यांना संसार-सुख फक्त १९ वर्षें लाभलें. १९०२ सालीं त्यांची पत्नी मृत्यु पावली. त्यामुळें त्यांचें कवि-मन भग्न झालें. चित्तशांतीसाठीं ते हिमालयांत

अलमोरा गांवीं गेले. बरोबर एक मुलगा व एक मुलगी. दोन वर्षांनीं त्यांचा लाडका मुलगाहि निधन पावला.

असलीं प्रापंचिक दुःखें त्यांना लहानपणापासूनच गिळावीं लागलीं. ते लहान होते तेव्हांच त्यांची माता मृत्यूच्या स्वाधीन झाली. परंतु त्यांचें खरें जीवन म्हणजे काव्य. त्यांत ते सदैव रंगून जात. आणि त्यापासून त्यांना जो आनंद लाभे तो अखंड, अक्षय्य व अनिर्वचनीय ! जणुं ते सदासर्वकाळ काव्य-सृष्टींतच वास्तव्य करीत होते, आणि तेथून आपल्या कवनांचीं रत्न–माणकें सत्य–सृष्टीवर उधळीत होते. या रत्न–माणकांचें तेज व मोल इतकें विलक्षण असे कीं, साऱ्या रसिक जगाला त्यांतील एक एक रत्न मस्तकीं घेऊन नाचावें, असेंच वाटे.

● ● ● ●

*मृत्यु म्हणतो, ‘ मी तुझा मुलगा हिरावून नेतों. ’*
*चोर म्हणतो, ‘ मी तुझें सोनें चोरून नेतों. ’*
*दैव म्हणतें, ‘ मी तुझें सर्वस्व छिनावून नेतों. ’*
*निंदक म्हणतो, ‘ मी तुझी कीर्ति पळवून नेतों. ’*
*कवि म्हणतो, ‘ पण माझा आनंद कोण घेऊन जातों ! ’*

★ ★

*“ श्रम व विश्रांति यांचें नातें निकटचें आहे.*
*श्रमाच्या नेत्रावर विश्रांतीची पापणी विसावते.”*

## : ५ : काव्याचा कोहिनूर

रवींद्रनाथांच्या सर्व काव्य–रत्नामधील कोहिनूर हिरा म्हणजे ‘ गीतांजलि ! ’ या काव्य–कृतीचा जयजयकार सर्व जगानें केला. नाना भाषांमध्यें गीतांजलीचीं भाषांतरें झालीं, आणि नाना देशांतील रसिकांनीं गीतांजलीवर प्रशंसेची पुष्पांजलि वाहिली. अकस्मात् रवींद्रनाथांना जगांत उच्च स्थान लाभलें–आणि तसेंच तें लाभलें त्यांच्या भरत–भूमिलाहि. या सर्व कीर्ति–किरीटावर मोत्यांचा तुरा चढला १९१३ सालीं. त्या वर्षीचें, जगांतील उत्कृष्ट साहित्याचें ‘ नोबेल पारितोषिक. ’ अर्पिलें गेलें “ गीतांजलीला ! ”

साऱ्या जगाचे डोळे वळले भारताकडे. साऱ्या लोकांनीं कान लावले गीतांजलीकडे—साऱ्या जनतेनें हात जोडले रवींद्रनाथांना ! गीतांजलि वाचण्यासाठीं सर्वत्र कोण उत्सुकता ! पहिल्या वर्षांतच एकट्या इंग्रजी भाषेंत १४ आवृत्त्या निघाल्या ! आणि आत्तांपर्यंत ९० वर आवृत्त्या निघाल्या आहेत. रवींद्रांच्या काव्याची सुवर्ण–मूर्ति, ‘ नोबेल पारितोषिकाचा ’ झगझगीत प्रकाश पडल्यावरच, जगाच्या नजरेस पडली—किंबहुना, हिंदी लोकांच्याहि नजरेंत भरली त्यानंतरच !

केवढे उपकार आहेत त्या गुणज्ञ, उदार व विश्वबंधु नोबेलचे ! आमची आम्हांला ओळख पटण्यास त्याचा प्रकाश उपयोगीं पडला. नोबेल हा स्वीडनमधील एक शास्त्रज्ञ. स्फोटक द्रव्याच्या शोधावर त्यानें द्रव्याच्या राशि जोडल्या. त्यानें एक संस्था स्थापून तिला एका मोठ्या द्रव्य-निधीची जोड दिली. त्यांतून दरवर्षीं पांच पारितोषिकें देण्याचा उपक्रम १९०१ सालापासून सुरू झाला. पदार्थ-विज्ञान, रसायन, वैद्यक, या शास्त्रांमध्यें शोध लावणें किंवा ध्येयवादी साहित्य निर्माण

करणें वा जागतिक शांतता स्थापण्यास साहाय्य करणें, यांपैकीं कोणतेंहि एक कृत्य करण्यास हें सुमारें सव्वा लक्ष रुपयांचें पारितोषिक देण्यांत येतें. तें देतांना तो शास्त्रज्ञ वा कलावंत कोणत्या राष्ट्राचा आहे, याचा विचार केला जात नाहीं. मानवजातीचा हितकर्ता तो आहे कीं नाहीं, एवढेंच पाहिलें जातें.

पण योग असा विलक्षण कीं, १९१३ सालापर्यंत एकाहि आशियावासी माणसाला हें बक्षीस मिळालें नाहीं; अर्थात् कोणा भारतीयाच्याहि भाग्यांत तें आलें नाहींच. तो मान स्वतःला, भारताला व आशिया खंडाला प्रथम मिळवून देण्याचें श्रेय रवींद्रनाथांचेंच. जगाच्या वाङ्मयांत उत्कृष्ट भर घातल्याबद्दल ‘ गीतांजली ’ ला हें बक्षीस देण्यांत आलें. आणि त्यासरशीं पृथ्वीतलावरील सर्व रसिक–वृंदांचीं नेत्र–कमलें या ‘ रवि ’ कडे एकदम वळलीं !

अवघ्या जगानें मस्तकीं धारण केलेलें हें काव्य आहे केवढें ? अवघ्या १०० पृष्ठांचें–आणि सुमारें तितक्याच कवितांचें ! आणि हें दिव्य काव्य जन्मास आलें, तें कसें व केव्हां ? वयाच्या सतराव्या वर्षापासून ते काव्य लिहीतच होते–गंगेच्या कांठीं, हिमालयाच्या शिरीं, प्रशांत वातावरणांत, प्रसन्न मनःस्थितींत ! तारुण्याचा भर ओसरल्यावर त्यांना ईश्वरी साक्षात्कारासारखा अनुभव आला, आणि सर्व विश्वाकडे मंगल दृष्टीनें पहाण्याचा त्यांचा स्वभावधर्मच बनला. ईश्वर व निसर्ग यांच्याविषयींचीं गीतें त्यांच्या प्रतिभेंतून एकसारखीं फुलूं लागलीं. पण जगप्रसिद्ध गीतांजलीचा जन्म मात्र अगदीं वेगळ्या परिस्थितींत झाला.

१९१२ साल होतें तें. रवींद्रांना ५० वर्षे पूर्ण झालीं होतीं. त्यांचा सुवर्ण–महोत्सव ‘ शांति-निकेतनां ’ त साजरा झाला. ती तपोभूमि, तर कलकत्ता ही त्यांची जन्मभूमि. तेथेंहि त्यांचा मोठा सत्कार झाला. तेथील साहित्य-परिषदेनें त्यांना मानपत्र अर्पण केलें. त्यानंतर आला

‘ माघोत्सव ’—‘ ब्राह्मो समाजाचा ’ वार्षिक उत्सव. त्या उत्सवांत रवींद्रांनीं खूप श्रम केले; पण विशेष म्हणजे त्यांनीं स्वतः रचलेलें एक नवें राष्ट्र-गीत म्हणून दाखविलें. तें इतकें उज्ज्वल, प्रेरक व आशादायक होतें कीं, तें ऐकतांना सर्व श्रोते थरारून गेले—आणि त्यानंतर शेंकडों-हजारों सभांतील श्रोत्यांनाहि तोच अनुभव आला. पुढें स्वतंत्र झालेल्या भारत-मातेनें तर, आपल्या शिरोरत्नाप्रमाणें, तें गीत, आपलें ‘ राष्ट्रगीत ’ म्हणून मस्तकीं धारण केलें. असें तें माननीय गीत म्हणजे–

**“ जन–गण–मन–अधिनायक जय हे । भारत–भाग्यविधाता ! ”**

आपल्या सुवर्ण–महोत्सवाची ही देणगी देशाला देऊन, रवींद्रनाथ युरोपला प्रयाण करणार होते. परंतु ते अतिश्रमानें आजारी पडले. म्हणून विश्रांतीसाठीं ते आपल्या शेतीवर रहावयास गेले. तेथें त्यांची प्रकृति सुधारली, पण अशक्तता राहिली. अशा विकल अवस्थेंत, रिकामा वेळ घालवावा म्हणून,त्यांनीं आपल्या पूर्वींच्या कवितांतील कांहीं कविता निवडल्या व त्यांचें इंग्रजींत भाषांतर करण्याचा चाळा चालू ठेवला. त्याचें फळ म्हणजे ‘ गीतांजली ! ’ एक विरंगुळा म्हणून सुरू केलेलें हें भाषांतराचें काम, त्यांनीं पुढें इंग्लंडमध्यें गेल्यावरहि चालू ठेवले. एकूण १०३ गीतांपैकीं ५३ गीतें मूळ बंगाली ‘ गीतांजलीं ’ तील आहेत. बाकीचीं ५० त्यांच्या इतर दोन काव्य–संग्रहांतील आहेत.

लंडनमध्यें रॉथेनूस्टीन नांवाचा त्यांचा एक मित्र होता. त्याला त्यांनीं आपलीं हीं भाषांतरित गीतें वाचून दाखविलीं. त्यांतील प्रतिभेचें तेज पाहून त्या कलावंताचे तर डोळे दिपले. त्यानें आपल्या एका आयरिश मित्राला हीं गीतें वाचून दाखविलीं. त्याचें नांव यीट्स ! त्यांनाहि पुढें १९२३ सालीं नोबेल पारितोषिक मिळालें. कवीनें कवीस ओळखलें. ‘ असें हृदयंगम काव्य मी कैक वर्षांत ऐकलें नव्हतें. ’ असे धन्योद्गार त्यांनीं काढले.

पुढें एका मित्र-मंडळींत रवींद्रनाथांनीं काव्य-गायन केलें. गायन संपलें पण कोणी हूं कीं चूं करीना. सारे स्तब्ध ! रवींद्रांचें मन पार खचलें. " या रत्न-पारखी रसिकापुढें मी गारगोट्यांची रास तर नाहीं ना ओतली ? " या शंकेनें ते घाबरे झाले.

पण परिणाम घडला होता उलट ! विद्वानांच्या परितोषाचा पेला कांठोकांठ भरून गेला होता—आणि म्हणून तो आवाज करीत नव्हता. तें रसिकांचें मौन म्हणजे रवींद्रांच्या काव्यानें त्यांचें भान हरपून घेतल्याचें चिन्ह. त्यांना जो आनंद व विस्मय वाटला, तो शब्दा-पलीकडे होता; आणि म्हणून ते आश्चर्यानें स्तब्ध राहिले होते. नंतर या त्यांच्या गीतांचा सुगंध दशदिशा दरवळला.

त्यांच्या सन्मानासाठीं जागोजाग सभा भरूं लागल्या. नंतर कोणी म्हणाले, " भारतांतील नवचैतन्याचा हा विलास अपूर्व आहे. " तर कोणी गुणगुणलें, " जगांतील सर्व दुःखावर मात्रा म्हणजे टागोरांच्या काव्याची एक ओळ तरी वाचणें. " ज्ञानेश्वरांच्या वाङ्मयाची थोरवी वर्णितांना नामदेवांनीं अशीच प्रशस्ति केली—

" एक तरी ओवी अनुभवावी. "

रवींद्रनाथांच्या या 'गीतांजलि' मध्यें प्राचीन कालांतील उपनिषदांचें अद्वैत तत्त्वज्ञान ओतप्रोत भरलेलें आहे, मध्य-युगीन कालांतील संतांचें भक्ति-प्रेम ओसंडत आहे आणि अर्वाचीन काळांतील निसर्ग-प्रेम तर अणु-रेणूंत नाचत आहे. त्यांत भक्ताची आर्तता आहे; कवीची रम्यता आहे आणि विज्ञानवादीची बुद्धिमत्ता आहे. मानव-धर्म हाच खरा धर्म, अशा नव-विचाराची शिकवण त्यांत आहे.

गीतांजलि म्हणजे रवींद्रनाथांनीं ईश्वराचा केलेला धावा आहे, त्यांनीं आपल्या भाव-पुष्पांची मानवतेला वाहिलेली माला आहे, त्यांच्या अंतःकरणांतील तळमळीचे, व्याकुळतेचे व आनंदाचे उद्‌गार त्यांत सांठविलेले आहेत. राधेला श्रीकृष्णाच्या मुरलीची जितकी ओढ, तितकी

या भक्त-कवीला ईश्वरी साक्षात्काराची ! तुलसीदास-तुकारामादि संतांना रात्रन्दिवस जसा एकच ध्यास, तसाच रवींद्रांनाहि. आपल्या आत्म्याची ओळख पटावी आणि त्याचें परमात्म्याशीं मीलन व्हावें, हीच एक त्यांना भूक.

आपल्या मनाची ही तळमळ त्यांनीं सौंदर्य-संपन्न भाषेनें व्यक्त केली आहे हें विशेष. कधीं निरनिराळ्या ऋतूंतील सृष्टीचीं रूपें रंगवून, तर कधीं वृक्षावरील पक्ष्यांचे व समुद्रावरील जहाजांचे खेळ वर्णन करून आणि कधीं बालकांच्या नानाविध क्रीडा चित्रित करून, त्यांनीं आपली ईश्वरी साक्षात्काराची आस प्रगट केली आहे.

निसर्ग-प्रेम व मानव-प्रेम हे दोन गुण त्यांच्या भक्ति-गीतांत विशेष आहेत. त्यांची भक्ति दारिद्र्याला विटलेली व जगाला आंबलेली नाहीं.-ती भणंगभिकारी नाहीं व निराशेचे सुस्कारे टाकणारी नाहीं. ती सौंदर्याचा साज-शृंगार अंगाखांद्यांवर घालून, आनंदी वृत्तीनें, सस्मित मुद्रेनें, ठुमकत-मुरडत, पैंजणें वाजवीत व कंकणें नादवीत चाललेली, रूप-संपन्न राजकन्या आहे. ईश्वर हा प्रियकर मानून प्रेमाचे आलाप काढणारी ' मधुरा-भक्ति ' तिच्या हृदयांत खेळत आहे. फार काय, सर्वनाशक व भयंकर मृत्यूचेंहि प्रियकरासारखें प्रेमानें स्वागत करण्यास ती सिद्ध आहे—मातेप्रमाणें मृत्यूला मानण्याची प्रेमळ दृष्टि तिची आहे.

रवींद्रनाथांच्या भक्तहृदयाला कधीं मुरलीचा मधुर सूर ऐकूं येतो, तर कधीं श्रीकृष्णाच्या कर-कमलांतील कमल-पुष्पाचा सुगंध जाणवतो, तर कधीं सोन्याच्या रथांत बसून चाललेल्या राजाधिराजाचें साक्षात् दर्शनहि होतें. साफल्याची-सार्थक्याची-सांगतेची संतृप्त भावना त्यांच्या कवनांतून ओसंडून वहात आहे.

त्यांच्या भक्तीच्या निरनिराळ्या अवस्था त्यांच्या काव्यांत प्रति-बिंबित झालेल्या आहेत. बद्ध, मुमुक्षु, साधक व सिद्ध या चारहि

अवस्थांचीं प्रतिबिंबें त्यांच्या काव्यांत विलोल नर्तन करीत आहेत. हिमालयावरील मानस-सरोवराच्या प्रशांत जलाशयांत, कधीं प्रतिपदेची चंद्ररेखा तरंगत असते, तर कधीं चतुर्थीची चंद्रकोर हेलावत असते आणि कधीं अष्टमीचें इंदु-खंड प्रतिबिंबित होतें व शेवटीं पौर्णिमेचा गोल गरगरीत चंद्रमा राज-हंसाप्रमाणें पोहत असतो. पण या सर्व वेळीं तें सरोवर स्वर्गीय सौंदर्यानें नटलेलें दिसतें. रवींद्रांची ' गीतांजलि ' हि तशीच मन-जिंकी आहे. त्यांच्या कोणत्याहि भावनांचें प्रतिबिंब पडलेलें असो, तें तें गीत रम्य-मधुरच असतें.

एका गीतांत कवि प्रार्थना करतो,

" हे जीवींच्या जीवना, माझें अंतःकरण विकसित कर,
निर्मल कर, उज्ज्वल कर, सुंदर कर, जागृत कर,
उद्यत कर, निर्भय कर, मंगल कर,
तूं मला आनंदित कर. "

कवीची भक्ति रंगेल पण आहे. तो देवाला म्हणतो, " प्रभो, या जन्मीं तुझी भेट होणें माझ्या नशिबीं नसेल तर नसो, पण तुझ्या भेटीचा विसर मला न पडावा-तुझ्या विरहाच्या वेदना मला रात्रंदिवस होत रहाव्यात. जगन्माते, मी माझ्या दुःखाश्रूंची मौक्तिक-माला गुंफीन आणि ती तुझ्या कंठांत घालीन. होय, तुझ्या कंठांत घालीन-आकाशांतील नक्षत्रांनीं आपल्या तेजाचीं वलयें करून त्यांचीं नूपुरें तुझ्या पायांत घातलेलीं असलीं तरी ! संपत्ति वा कीर्ति देणें न देणें तुझ्या हातीं. पण पण माझें दुःख हें मात्र खास माझ्या मालकीचें आहे. त्याचा नैवेद्य मी तुला दाखवीन. आशा आहे कीं, तूं मला आपल्या कृपेचा प्रसाद देशील. "

जगाचा संन्यास घेऊन मग मोक्षाचे अधिकारी व्हावयाचें, ही विरक्त कल्पना रवींद्रनाथांची नाहीं. " प्रभो, माझ्या इंद्रियांचीं द्वारें मी बंद करणार नाहीं. माझे डोळे, माझे कान हे सारे तुझ्या आनंदानेंच भरून जातील. प्रभो, तुझ्या दिव्य तेजावर मी माझे शेंकडों दिवे लावून

घेईन आणि ते तुझ्या मंदिरांत ठेवीन." अशी त्यांची कर्मयोगी भूमिका आहे. ते ऐहिकाचा कंटाळा करीत नाहींत–जीवनाचा वीट मानीत नाहींत. सारें जीवनच ईश-प्रेमानें आनंदमय करून सोडण्याची त्यांची वृत्ति आहे.

त्यांनीं ईश्वराजवळ जें वरदान मागितलें आहे, तें मोक्षाचें, कीर्तिचें वा सुखाचें नाहीं. दुःख, संकटें, विपत्ति यांना ते भीत नाहींत. ते देवापाशीं एवढेंच मागणें मागतात, "प्रभो, माझीं सुख–दुःखें सहन करण्याचें मला सामर्थ्य दे. दीन–दलिताला कधींहि दूर न लोटण्याचें सामर्थ्य मला दे. उन्मत्त सत्ताधाऱ्यापुढें गुडघे न टेकण्याचें सामर्थ्य मला दे. रोजच्या क्षुद्र जीवनांतून मन वर काढून, तुझ्या इच्छेला शरण जाण्याचें सामर्थ्य मला दे."

आणि आपल्या राष्ट्रासाठीं आपल्या प्रभूजवळ कोणतें पसाय-दान त्यांनीं मागितलें आहे? भौतिक उत्कर्षाचें नव्हे, तर आत्म-विकासाचें. ते प्रार्थना करतात,"

"हे परमात्मन्! जेथें न शिवे भीति मनाला कांहीं,
डोळे करुनी वर चालाया शंका वाटत नाहीं.
जेथें असती मार्ग मोकळे ज्ञानाच्या प्राप्तीचे,
संकोचानें तुकडे तुकडे झाले नच जनतेचे.
शुद्ध अशा त्या, सत्यावांचुनि शब्द न जेथें वाया,
हात पसरितो उद्यम संतत पूर्णतेस मिळवाया.
मृत रूढीच्या भयाण पुलिनीं पावुनिया लोपाला,
प्रज्ञेचा तो निर्झर निर्मल लुप्तप्राय न झाला.
कृपाप्रेरणा तुझीच कारण ज्या आचारविचारा,
होउनि तद्विस्तार मनाच्या प्रगतिस मिळतो थारा.
प्रभो! अशा या स्वतंत्रतेच्या स्वर्गामाजीं ताता!
होवो माझा देश निरंतर जागृत सत्वर आतां."

ईश-प्रेमाच्या स्पर्शामुळें, भासामुळें, नव्हे नुसत्या ध्यासामुळें आपलें जीवन पावन, मंगल व आनंदमय होईल अशी त्यांची श्रद्धा आहे. ते ईश्वराला कळवळून म्हणतात, " माझ्या जीवींच्या जीवना, तुझा संजीवक स्पर्श माझ्या अंगाअंगावरून होत आहे, याची जाणीव असल्या-मुळें मी माझें शरीर शुद्ध ठेवीन, मी माझें मन सत्यानें प्रकाशित करीन आणि पापाची वासना माझ्या हृदयांतून निपटून काढीन. मी माझ्या साऱ्या कृति अशा करीन कीं, त्यांतून तुझा–आणि तुझाच–आविष्कार होत राहील. हे कवीश्वरा, मी तुझ्या चरणापाशीं बसलों आहें–आणि माझें जीवित साधें व सरळ बनवीत आहें. हेतु हा कीं, त्या जीवनाचा पावा बनावा व त्यांतून तुझें संगीत उमटावें. "

ईश्वराकडे धांव घेणें म्हणजे जगाकडे पाठ फिरविणें नव्हे; हा विचार प्रगट करतांना रवींद्रनाथ म्हणतात, " हे जगन्माते, तूं मला आपल्या प्रेम-पाशांत बांधून घे. पण त्यामुळें सर्वसामान्य मानवाच्या जत्रेंत जाण्याची मला बंदी होतां कामा नये–पृथ्वीवरील धुळींत खेळण्याची मनाई होतां कामा नये. "

जीव, जगत् व जगदीश्वर या तिन्ही धाग्यांचा सुंदर गोफ म्हणजे गीतांजलि. व्यक्ति, समाज व ईश्वर–यांपैकीं कशाचाहि रवींद्रनाथांना विसर पडत नाहीं. किंबहुना, गीतांजलीचें एक लक्षणीय वैशिष्ट्य सृष्टि-प्रेम हें जसें आहे, तसेंच कर्म-योग हेंहि पण आहे. " जेथें हीन–दीन, त्यक्त–बहिष्कृत रहातात तेथें, देवा, आपलीं पद-कमलें स्थिरावोत. " अशी प्रार्थना ते करतात.

आपल्या प्रासादांतील सुंदर देवघरांत, उंची पीतांबर नेसून, सोन्या–रुप्याच्या पात्रामध्यें धूपदीप दाखवून व घंटा वाजवून, रुद्राक्ष-माळा चाळवीत, एकांतांत पूजा करीत बसलेल्या, श्रीमंत भक्ताला हांक मारून रवींद्रनाथ सांगतात, " ये, भक्ता बाहेर ये. सारीं दारें लावून व आपले डोळे मिटून अंधारांत तूं कोणाची पूजा करतोस ? अरे, पहा, देव

तुझ्यापुढें नाहीं. तो तेथें आहे कीं, जेथें शेतकरी खडकाळ जमिनींत नांगर चालवीत आहेत ! जेथें पाथरवट कठीण खडी फोडीत आहेत ! जेथें कामकरी उन्हांत तापत व पावसांत भिजत, श्रमत आहेत ! अरे, पहा तो प्रभूचा पीतांबर धुळीनें किती मळला आहे ! मग तुझ्या अंगावर हें रेशमी वस्त्र कशाला ? दे तें फेकून आणि ये या धुळींत प्रभूच्या सांगातीं. अरे, प्रभु स्वतः सृष्टि निर्माण करण्याच्या कर्मानें जखडलेला आहे. मग तूं कसा कर्मापासून अलिप्त रहाशील ? निढळाच्या घामानें भिजलेल्या मातींत, मळक्या–फाटक्या कपड्यानिशीं तूं उभा रहा म्हणजे ईश्वर तुझ्या सन्निधच आहे. ”

ईश्वर–प्राप्तिची तळमळ आणि त्या प्राप्तिनंतरचा आनंद–या दोन्ही अवस्थांचीं चित्रें वाचकांच्या डोळ्यांपुढें मूर्तिमंत उभीं रहावींत, अशीं नाट्यमय रूपकें, रवींद्रनाथांनीं आपल्या गीतांजलींत मधून मधून गुंफलीं आहेत. कधीं ते ईश्वराला रानावनांतून एकटा हिंडणारा वाटसरू समजतात आणि आपल्या घरांत बोलवितात; तर कधीं दुरून, थकून–भागून आलेला, तहानलेला, मुशाफर मानून, त्याच्या ओंजळींत आपल्या कलशांतील पाणी ओततात. “ बाबारे, तुझें नांव काय ? ” तो तहान शमलेला मुशाफर कृतज्ञतेनें विचारतो—आणि कवि लाजतो—स्तब्ध बसतो.

“ नांव सांगण्यासारखें केलें आहे मीं काय ? ” कवि मनांतल्या मनांत पुटपुटतो. इतक्यांत, पानें फडफडतात,–सुगंध दरवळतो आणि कोकिळेचें कूजन कानीं पडतें.

आपल्या हळुवार भावना ते किती कोमल कल्पनेनें मांडतात पहा:—

“ सकाळ सरली, दुपार ओसरली आणि संध्याकाळची सावली पडूं लागली. लोक घरीं जाऊं लागले, आणि जातां जातां माझ्याकडे पाहून खिदळूं लागले. मी लज्जित झालों. डोक्यावरून पदर घेऊन,

रस्त्याच्या कांठावर बसलेल्या भिकारणीसारखी माझी अवस्था झाली. " तुला काय हवें ? " त्या लोकांनीं मला विचारलें. मी उत्तर काय देणार ? माझी दृष्टि खालीं वळली. कसें सांगूं मी त्यांना, ' मी तुझी वाट पहात आहें, अन् तूं मला येण्याचें अभिवचन दिलें आहेस. अन् दारिद्र्याचा नैवेद्य मी तुला दाखविणार आहे म्हणून ? '

आणि हें काय ?

आकाशांतून एकदम सोनेरी प्रकाश झगमगला. रथ-चक्रांचा गडगडाट ऐकूं येऊं लागला. सुवर्णपताका फडकूं लागल्या आणि तूं रथांतून उतरलास अन् धुळींत बसलेल्या, फाटके कपडे पेहेरलेल्या मला उचलून, रथांत ठेवून आपल्याजवळ बसवून घेतलेंस, तेव्हां रस्त्यावरील सारे लोक टकमकां पहात राहिले—असें स्वप्न माझ्या दृष्टिपुढें तरळत आहे. "

आतां स्वप्न नव्हे—सत्यच ! प्रत्यक्ष ईश्वर आपल्या झोपडींत आला—आपल्याला भेटला—आपल्याजवळ बसला—आपला पावा वाजवूं लागला, या अनुभूतीचें वर्णन तर रवींद्रनाथांनीं अतीव माधुर्यानें केलें आहे. ते म्हणतात,

" रात्र पडली. घराचीं दारें लागलीं. कोणीसें कुजबुजलें, " आज राजाची स्वारी येणार आहे. "

पण सारे म्हणाले, " छे, तें शक्य नाहीं. "

आणि दार वाजलें. कोणीसें कुजबुजलें, " राजाचा दूत पुढें आला. " बाकीचे सारे म्हणाले, " छे, तें शक्य नाहीं—हा वारा असेल. "

आणि गडगडाट ऐकूं येऊं लागला. धरणी हादरली. भिंती कंपित झाल्या. कोणीसें कुजबुजलें, " त्याच्या रथाच्या चाकांचा हा आवाज !" बाकीचे सारे झोपेंत पुटपुटलें, " छे, असें होणें शक्य नाहीं. हा ढगांचा गडगडाट असेल. "

आतां मात्र भेऱ्या—तुताऱ्या वाजूं लागल्या. " उठा ! उठा ! राजाधिराज येत आहेत. " सारेजण झोपेंतून खडबडून जागे झाले—

अंथरुणावरून उठले-भीतीनें थरथरां कांपूं लागले-आणि म्हणूं लागले, " राजाधिराज आले. पण त्यांना बसावयास जागा कोठें आहे ? त्यांना आपण सिंहासन कोणतें देणार ? त्यांची पंचारती करण्यास निरांजनें कोठें आहेत ? पुष्पमाला कोठें आहेत ? गंध ? धूप ? तोरणें ? छे-छे, कांहींच नाहीं. किती लज्जास्पद गोष्ट ही ! "

पण कोणीसें कुजबुजलें, " कां व्यर्थ चिंता करतां ? रिकाम्या हातानेंच त्याला भेटा-रिकाम्या घरांतच त्याला बसवा-फाटकी चटईच अंथरा. पण पंचप्राण फुंकून शंख वाजवा, भक्तीचीं गीतें गा. "

निराकाराचें दर्शन झालें. आनंदाचें आवार लोटलें. ब्रह्मानंदाची गंगा दुथडा वाहूं लागली; आणि कणाकणांत आनंद कोंदून गेला.- अशा समाधि-सुखाचें, साक्षात्काराचें वर्णन रवींद्रनाथांनीं इतक्या बहारीनें केलें आहे कीं, बोली अरूपाचें रूप दिसूं लागतें. तें वाचतांना तुकोबा-ज्ञानोबांचे अशाच अनुभवाचे अभंग कोणाला आठवणार नाहींत ? तुकोबा म्हणतात,

" स्थिरावली वृत्ति पांगुळला प्राण । अंतरींची खूण पावूनियां ॥
शशिसूर्य जाली जीवें ओवाळणी । आनंदा दाटणी आनंदाची ॥ "

तसेंच, ज्ञानोबा सांगतात,

" चित्त चाकाटलें आटु घेत । वाचा पांगुळली जेथिंची तेथ ।
आपाद कंचुकित । रोमांच आले ॥
अर्धोन्मीलित डोळे । वर्षताति आनंदजळें ।
आंतुलिया सुखोर्मीचेनि बळें । बाहेरी कापे "

' हें विश्वचि माझें घर ' अशी आकाशासारखी व्यापक वृत्ति रवींद्रनाथांनीं एका गीतांत प्रगट केली आहे. ते गातात, " माझ्या नसानसांतून रात्रन्दिवस जें चैतन्य वहात आहे, तेंच सर्व विश्वाच्या अणु-रेणूंमध्यें खेळत आहे-तेंच असंख्य पानांफुलांतून नाचत आहे-तेंच सागराच्या भरती-ओहोटीच्या लाटांमध्यें उसळत आहे. "

शेवटीं आपल्या उपासनेची सांगता झाल्याचें समाधान ते व्यक्त करतात. “ खेळ संपला, प्रवास सरला, दीप विझला; तसें आयुष्य समाप्त झाल्यावर साफल्याचा आनंद मला होत आहे.” अशी भैरवी गीतांजलीच्या शेवटीं रवींद्रनाथांनीं गायली आहे. ‘ हें सर्व ज्ञान माझ्या काव्यानेंच मला शिकविलें असा आत्मानुभव ते निवेदन करतात. या अलौकिक काव्य-बळावरच ते अशा एका प्रदेशांत उड्डाण करूं शकतात कीं, “ तेथें दिवस नाहीं आणि रात्र नाहीं. रंग नाहीं आणि रूप नाहीं. सर्वत्र स्वच्छ, निर्मल प्रकाश पसरलेला ! ” गीता म्हणते, ‘ न तद्भासयते सूर्यो न शशांको न पावकः ’

अशा दिव्य प्रकाशांत न्हाऊन निघालेली रवींद्रनाथांची प्रतिभा सर्व विश्वाला सहजच कवळून धरणारी आहे. “ महामानवाच्या सागर-तीरावर तूं जागा हो. ” अशी हांक ते सर्व मानव-जातीला देत आहेत.

गीतांजलींतील प्रत्येक गीत वाचतांना सहृदय वाचकाच्या चित्ताच्या तारा कंपित झाल्याशिवाय रहात नाहींत. भक्तीच्या, ज्ञानाच्या व आनंदाच्या प्रसन्न व प्रकाशपूर्ण अशा आकाशांत संचार केल्याचें सुख गीतांजलि वाचतांना होतें. त्यामुळें मन मुदित व हृदय उन्नत झाल्याविना रहात नाहीं. कमळाची एक एक पाकळी उकलावी, त्याप्रमाणें आपलें अंतःकरण उमलत जातें आणि त्यामध्यें विश्वात्मक प्रभूची रमणीय मूर्ति उभी रहाते.

गीतांजलीनें रवींद्रनाथांना एकदम जागतिक कीर्तीच्या शिखरावर नेऊन बसविलें. १९१३ सालीं ते अमेरिकेस गेले, तेव्हां त्यांच्यावर स्तुति-स्तोत्रांचा वर्षाव झाला, आणि तेथून ते हिंदुस्थानास परत आले तेव्हां तर त्यांची चांगलीच फसगंमत झाली. मुंबई बंदरावर ते बोटींतून उतरतात, तोंच शेंकडों लोक हातांत पुष्पहार घेऊन उभे असलेले त्यांना आढळले. तो काळ ब्रिटिश राजवटीचा होता. त्यामुळें त्यांना वाटलें, “ आला असेल कोणी तरी गोरा अधिकारी ! त्याच्या स्वागत-

समारंभासाठीं असेल ही सारी तयारी !" पण कवि-राजाची कल्पना साफ चुकली.

एकेक पुष्प-माला त्यांच्या स्वतःच्याच गळ्यांत पडली ! तेथून ते ज्या ज्या शहरीं गेले, तेथें तेथें त्यांचा मोठा गौरव झाला. पण त्या सर्वांवर कडी केली त्यांच्या 'शांति-निकेतन ' नें.

तें तर त्यांचें स्वतःचेंच घर ! तेथें कसला सत्कार नि कसला समारंभ ?

पण नाहीं. हा प्रसंगच अपूर्व. नोव्हेंबर महिन्यांतील एक संध्याकाळ. 'शांति-निकेतनांत' सर्वत्र शांतिचा सागर पसरलेला. पण त्या शांति-सागरावर उत्साहाच्या, उल्हासाच्या, उतावळीच्या लाटा उसळूं लागल्या. विद्यार्थी व शिक्षक यांची एकच गडबड उडून गेली. टागोरांना नोबेल पारितोषिक मिळालें, ही तार नुकतीच तेथें येऊन थडकली होती. हें पारितोषिक म्हणजे काय ? याची कल्पना आश्रमांतील चिमण्यांना कोठली ? पण तीं आपलीं चिवचिवत होतीं. "आपले गुरुदेव नेहमीं कांहीं ना कांहीं अद्भुत करीत असतात. आजहि सर्वांना थक्क करण्यासारखें त्यांनीं कांहीं केलें असलें पाहिजे." असें म्हणून त्या मुलांनीं आपल्या रांगा केल्या आणि "आमादेर शांति-निकेतन" हें गीत गात गात सर्व आश्रमाभोंवतीं त्यांनीं फेरी घातली.

नंतर ते सर्वजण गुरुदेवांच्या खोलींत गेले. आणि त्यांच्या पायांवर एकेकानें आपलें मस्तक ठेवलें. गुरुदेव आपल्या दोन्ही तळहातांनीं आपलें तोंड झाकून उभे राहिले. त्यांना तो सत्कार नकोसा वाटला. पण तो थांबणार कसा ? नंतर एकेक शिक्षक येऊन त्यांना वंदन करूं लागले—जयघोष करूं लागले—आनंद-गीत गाऊं लागले. रवींद्रांचें हृदय भरून आलें.

यानंतर 'गीति-माला,' 'गीतालि' असे त्यांचे अनेक काव्य-संग्रह प्रसिद्ध झाले. वयाच्या ११ व्या वर्षापासून अशा काव्याच्या माला

त्यांनीं असंख्य गुंफल्या. १८ व्या वर्षापर्यंत ७००० ओळींचीं काव्यें त्यांनीं रचलीं. ११ ते १९ या वर्षांच्या दरम्यान या बालकवीनें लिहिलेलीं भावगीतें ' वन-पुष्प ' या नांवानें प्रसिद्ध झालीं. ' भानुसिंगाचीं गाणीं ' याच सुमाराचीं. त्यांच्या एकूण सर्व काव्यांच्या ओळींची संख्या १॥ लक्षावर भरेल. आणि केवळ ही संख्याच नव्हे, तर त्या काव्यांचीं गुणवत्ताहि सर्व जगांत अलौकिक आहे.

' संध्या-संगीत ' व ' प्रभात-संगीत ', ' शिशु ' व ' शैशव-संगीत ', ' मानसी ' व ' नैवेद्य ', ' सोनेरी नांव ' व ' सोनेरी बंगाल', ' बलाका ', ' वैतालिका ', ' लिपिका ', ' बालक '—असे किती तरी काव्य-ग्रंथ जगांतील रसिकांच्या मान्यतेस प्राप्त झाले आहेत. गमतीनेंच सांगावयाचें तर, कथा, काहिणी, कल्पना, काणिका व क्षणिका—अशा पांच ' क ' कारांनीं नामांकित केलेले त्यांचे कविता-संग्रह काव्य-गिरीवर कायमचे कोरले गेले आहेत. हीं त्यांचीं कलेचीं कोरीव लेणीं वेरूळच्या कैलास-लेण्यांइतकींच कौशल्यपूर्ण व आश्चर्यकारक आहेत. जागतिक वाङ्मयांत तीं अजरामर झालीं आहेत.

● ● ●

*" आतां माझें काम कोण करील ? ' मावळत्या सूर्यानं पृच्छा केली. पृथ्वी चित्रासारखी तटस्थ राहिली. पण पणती बोलली, ' देवा, मला जमेल तेवढ अल्पसं कार्य मी करीन. "*

## : ६ : पंच–कलांच्या परिसरांत

रवींद्रनाथांचें साहित्य जितकें विपुल, तितकेंच विविध, आणि तितकेंच संपन्नहि आहे. एकाद्या बादशहाच्या जामदारखान्यांत नानाविध रत्नांच्या राशी असाव्यात, तशी त्यांच्या साहित्य–भांडारांत विविध कलाकृति सांठविलेल्या आहेत. त्यांची दीड लाख पंक्तींची काव्य-सृष्टि म्हणजे तर जणु हिऱ्यांची खाणच ! आणि त्यांत ' गीतांजलि ' ही कोहिनूर हिऱ्याप्रमाणें तेजःपुंज ! पण या काव्य–हीरकाशिवाय, कथा, कादंबरी, नाटकें, संगीतिका, प्रबंध इत्यादि मोती–माणिकें, पाचू–पावेळे, नीळ–पुष्पराग इत्यादि रत्नांची रेलचेल आहे. त्यांची अचूक मोजदाद करणेंच कठीण. तथापि सामान्यतः, ३००० कविता, १९ कथा–संग्रह, ९ कादंबऱ्या, ३८ नाटकें आणि ८९ प्रबंध त्यांनीं रचल्याचें दिसून येतें. यांतील एकेक साहित्य–शाखाच त्यांनीं पल्लवित केली असती, तरी त्यांना साहित्यांत उच्च–स्थान प्राप्त झालें असतें; पण या कलांच्या पंचनद्यांचा संगम त्यांच्या साहित्य–सागरांत झालेला आढळतो.

रवींद्रांचें वाङ्मय म्हणजे एक मोठें कुटुंबच आहे.—अगदीं टागोर–घराण्यासारखें-एकत्र, संपन्न, कलाप्रिय व ध्येयवादी. एखाद्या एकत्र कुटुंबांत, आजा-आजी, आई-बाप, भाऊ-बहिणी, जावा-जावा, मुलें-बाळें, नातवंडें-पणतवंडें आणि गडी-माणसें, पशु-पक्षी—या सर्वांचा मेळावा प्रेमानें, एकोप्यानें, आनंदानें नांदत असतो, तसा भास रवींद्रनाथांच्या लहान-मोठ्या, निरनिराळ्या जातींच्या साहित्य–कृति वाचतांना रसिकाला लाभतो, आणि तो संतुष्ट मनानें व उल्हसित वृत्तीनें त्यांतून बाहेर पडतो. कणिका-क्षणिकापासून, नाटिका-संगीतिकापर्यंत त्यांनीं किती विविध, विपुल व विमल रचना केली आहे !

संध्याकाळची वेळ. सर्वत्र शांतता. टागोर घराण्यांतील सर्व माणसें एका प्रशस्त दिवाणखान्यांत जमलेलीं. रसिक-मित्रमंडळीहि आलेली. इतक्यांत दिवे मालविले गेले आणि फक्त रंगभूमि दिसूं लागली. त्या रंगभूमिवर रवींद्रनाथांनीं प्रवेश केला–पण वाल्मीकि ऋषीच्या वेषांत. त्या वेळीं त्यांचें वय ऐन पंचविशीचें; पण त्यांनीं डोक्यावर जटा धारण केल्या होत्या, हनुवटीवर किंचित् दाढी उगवलेली होती आणि अंगावर पायघोळ झगा घातलेला होता. कंठांत दोन रुद्राक्षांच्या माळा होत्या आणि कमेरला उत्तरीय वस्त्र कसलेलें होतें.

वाल्मीकीची मुद्रा उग्र होती व दृष्टि क्रूर होती. त्याचे हस्तक दरोडेखोर होते. त्यांच्या एका टोळीनें एक तरुण कन्यका पकडून वाल्मीकिपुढें आणली. ती इतकी सुंदर व कोमल होती कीं, आपल्या कालि-मातेला तिचा बळी देणें वाल्मीकीच्या जिवावर आलें. "सोडून द्या हिला." त्यानें आपल्या अनुयायांना हुकूम सोडला. वाल्मीकीच्या चित्तांत परिवर्तन होऊं लागलें. आपल्या चित्तांत अस्वस्थता कां निर्माण होत आहे, हें त्याला कळेना. बैचेन अवस्थेंत, रानावनांतून तो एकटाच भटकूं लागला. भटकतां भटकतां त्याला एक क्रौंच पक्षी ठार मारलेला आढळला. तो पहातांच त्याचें हृदय कळवळलें आणि त्याच्या मुखांतून सहज-स्फूर्त काव्य बाहेर पडलें.

> **मा निषाद प्रतिष्ठां त्वमगमः शाश्वतीः समाः ।**
> **यत्क्रौंच–मिथुनादेकमवधीः काममोहितम् ॥**

सर्व जगाच्या वाङ्मयांतील हा आद्य श्लोक ! त्यांतील कोमल भावना व मधुर शब्द-रचना ऐकून, खुद्द वाल्मीकीलाच नवल वाटलें आणि साक्षात् सरस्वती त्याच्यापुढें अवतीर्ण झाली. तिनें आपली वीणा वाल्मीकीला बक्षीस दिली आणि आशीर्वाद दिला, "वत्सा, अशींच काव्यें करीत जा."

टागोरांचें घरीं जमलेला तो सारा सुशिक्षित श्रोतृ-वृंद भारला

गेला—थरारून गेला. त्यांपैकीं वाल्मीकीची कथा माहीत नव्हती कोणाला? वाल्या कोळी आधीं दरोडेखोर होता, पण निष्पाप पक्ष्याची हत्या पाहून त्यानें हिंसा सोडली व तपश्चर्या सुरू केली. आणि शेवटीं वाल्मीकि ऋषी बनून रामायणासारखें अजरामर महाकाव्य त्यानें रचलें; ही गोष्ट भारतांतील पोराबाळांनाहि ठाऊक असते. पण रवींद्रनाथांनीं तिला कलेचा असा कांहीं विलक्षण साज चढविला कीं, त्यामुळें तें नाटक पहातांना आपण आज कांहीं नवीनच पहात आहोंत, असा सुखद अनुभव प्रेक्षकांना आला.

'वाल्मीकि-प्रतिभा' हें नाटक म्हणजे एक संगीतिका आहे. त्यांत रोमांचकारक घटना आहेत, संघर्ष आहेत, रसपूर्ण स्थळें आहेत. दरोडखोरांचें संघ-गीत, वन-देवींचें नृत्य-गीत आणि खुद्द वाल्मीकीचें काव्य-गीत—यामुळें ही संगीतिका माधुर्यानें ओतप्रोत भरलेली आहे. त्यांतील पदें बंगाली संगीताचे पद्धतिप्रमाणें तर होतींच, पण त्याशिवाय त्यांना इंग्रजी व आयरिश स्वरपद्धतीचीहि जोड रवींद्रनाथांनीं दिली होती, कारण ते नुकतेच युरोपमध्यें जाऊन संगीत शिकून आले होते.

"प्रकृतेर प्रतिशोध" ही त्यांची संगीतिकाहि अशीच रसिकांचें हृदय जिंकणारी ठरली. त्यांचे बंधु न्यायाधीश होते व त्यांची बदली कारवारला झाली होती. तेथें रवींद्रनाथ गेले आणि तेथील अलौकिक समुद्र—किनारा पाहून आनंदानें वेडे झाले. त्यांना एक नवीच दृष्टि प्राप्त झाली.

"My life is awaked and stirred." असा जागृतीचा, साक्षात्काराचा अनुभव त्यांना तेथें आला. त्या तंद्रींत, मध्य-रात्रीच्या चंद्र-प्रकाशांत, त्या निःशब्द किनाऱ्यावरून, ते एकटे संचार करूं लागले—मनाशीं बोलूं लागले—निसर्गाशीं आलाप करूं लागले. त्यामुळें त्यांच्या प्रतिभेला नवे नवे पंख फुटूं लागले—नव्या नव्या आकाशांत त्यांची कल्पना-शक्ति उड्डाण करूं लागली. रसिकांच्या हृदयाचा ठाव

घेणारीं कथानकें त्यांना सुचूं लागलीं—उदात्त भावना स्फुरूं लागल्या. त्याचें पहिलें फळ म्हणजे 'प्रकृतेर प्रतिशोध' ही हृदयस्पर्शी संगीतिका. 'निसर्गानें घेतलेला सूड' हा त्या नांवाचा अर्थ.

जगाला विटलेला एक संन्याशी आपल्या गुहेपुढें बसलेला आहे, असें दृश्य या संगीतिकेंत प्रथम दाखविलेलें आहे. "आतां मी माझ्या वासना जिंकलेल्या आहेत. इच्छा व भीति यांचें धुकें माझ्या मनांतून निघून गेलें आहे आणि माझी बुद्धि सूर्यासारखी तळपत आहे. आतां मी जगाच्या बाजारांत जाऊन उभा राहिलों, तरी त्याचा लेप माझ्या मनाला होणार नाहीं आणि माझ्या भावना क्षुब्ध होणार नाहींत." अशा अहंकारी विचारानें तो संन्याशी एका नगरामध्यें येतो व रस्त्याच्या कडेवर बसतो.

"अरे हाकला तिला, पिटाळा तिला." असा ओरडा करीत लोक येतात—आणि मागून येते एक लहानगी मुलगी. तिचें नांव वासंती. तिच्या वडिलांनीं कांहीं रूढि मोडली, म्हणून या मुलीवर सर्वांचा दात! तिला तो संन्याशी आपल्याजवळ बसवून घेतो. ती त्याच्याकडे कृतज्ञ नजरेनें पहाते, आणि तेथेंच ती निजते. त्या श्रांत चिमण्या जीवाकडे पाहून संन्याशाच्या अंतःकरणांत मानव-प्रेम जागृत होतें—वाढत जातें; इतकें कीं, संन्याशाला भीति वाटूं लागते, 'या प्रेम-भावनेच्या भोवऱ्यांत आपण सांपडतों कीं काय!'

तो उठतो आणि तेथून जाऊं लागतो. मुलगी जागी होते व विनविते, "बाबा, मला सोडून जाऊं नका. तुमच्याशिवाय मला कोणाचा आधार नाहीं. तुमच्याशिवाय मी जिवंत राहूं शकणार नाहीं." पण छे, संन्याशी कठोर बनला. त्यानें मनाचा संयम केला. आणि तो तेथून निघाला. निघाला तो थेट एका निर्जन पर्वतावर गेला.

पण त्या पर्वतावरहि एक रानवट मुलगी आपल्या बापाला हांक मारीत तेथें आली. तिला पाहून त्याला वासंतीची आठवण झाली.

" उगाच त्या निष्पाप जीवाला आपण सोडलें." अशी रुखरुख त्याच्या चित्ताला लागली. तो परत त्या गांवीं गेला. त्यानें आपला कमंडलु फोडला-संन्याशाचा दंड मोडला व रस्त्यावरून जाणाऱ्या-येणाऱ्या प्रत्येकाला तो विचारूं लागला, " वासंती कोठें आहे हो ? " पण तिचा पत्ता कोणीच सांगेना. अखेर एकानें सांगितलें, वासंती देवाघरीं गेली !

" आपणच तिच्या मृत्यूला कारण झालों का ? " हा प्रश्न संन्याशाच्या चित्ताला सारखा दंश करूं लागला. जगावर प्रेम करणें हाच सत्यशोधनाचा मार्ग आहे, असें त्याला पटलें. अनंताची ओळख सान्तांत राहिल्यानेंच होते, अशी खूणगांठ त्यानें आपल्या मनाशीं बांधली.

१९११ सालीं, रवींद्रनाथांनीं ' प्रायश्चित्त ' नांवाचें नाटक लिहिलें. त्यांतील धनंजय हा शिवाचा भक्त असतो. तो अहिंसेचा उपासक बनतो. धनंजयाची भूमिका रवींद्रनाथांनीं केली होती.

' मुक्त-धारा ' हें नाटक रवींद्रनाथांनीं १९२२ सालीं लिहिलें आणि तेव्हांपासून आतांपर्यंत तें रसिक-जनांवर मोहिनी घालीत आलें आहे. त्यांतील भाषा मंजुळ व कल्पना मधुर तर आहेतच; पण त्याशिवाय त्याचें कथानक कल्पकतापूर्ण असून त्यांतील दृश्यें मनावर छाप पाडणारीं आहेत. आणि रूपकांच्या द्वारें त्यांतून जो संदेश नाटक-कारानें दिला आहे, तो अखिल मानवजातीला चिरकाल मार्गदर्शक व आशादायक वाटणारा आहे.

दोन राजांची ही कथा आहे. त्यांपैकीं मांडलिक राजाच्या व्यापाराला खीळ घालून आपण श्रीमंत होण्याचा प्रयत्न उत्तर-कूटचा राजा करतो. त्याचा प्रतिनिधि असलेला व्हॉईसराय त्या मांडलिक राजाला सांगतो, " यंदा दुष्काळ आहे, तर तुम्ही आम्हांला कर न दिले

तरी चालेल. " पण कर मिळाले नाहींत म्हणून उत्तरकूटचा राजा संतापतो. कर-बंदी करणाऱ्या मांडलिक राजाला शासन करण्यासाठीं तो एक क्रूर क्लृप्ति काढतो. ती म्हणजे त्या मांडलिक राजाच्या प्रजेला पाणी-पुरवठा ज्या नदींतून होतो, ती मुक्तधारा नदी, धरण बांधून अडविणें. राजाचा एंजिनिअर तेथें जातो व धरणाचें काम झटपट पुरें करतो.

धरणाच्या उद्घाटनाचा दिवस आला. त्यासाठीं मोठा समारंभ साजरा होत आहे. देवळामध्यें उत्तरकूटचा राजा आपल्या दरबारीं लोकांसह आला आहे. कांहीं लाळघोटे प्रजाजनहि जमले आहेत. देवळाच्या पाठीमागें, धरण बांधण्यासाठीं आणलेलें यंत्र ठेवलेलें आहे. " तेंच आपलें पाणी तोडणारें आहे—जीविताचा कोंडमारा करणारें आहे." असें मानून त्या मांडलिक राज्यांतील जनता दंगा करण्यास तयार होते. पण तेथें धनंजय नांवाचा एक साधु भक्ति-गीतें गात गात येतो आणि तो लोकांना उपदेश करतो, " तुम्ही अन्यायाचा प्रतिकार करा, पण अहिंसेनें व शांततेनें—तरच तुम्हांला अखेरपर्यंत धैर्य टिकवितां येईल. "

साधूच्या या उपदेशाचा परिणाम जसा प्रजाजनावर होतो, तसाच तो उत्तरकूटच्या राजावरहि होतो, तो इतका कीं, तो स्वत: तें यंत्र मोडतो, धरण फोडतो आणि अडविलेल्या पाण्याला मार्ग मोकळा करून देतो. त्या पाण्याच्या धबधब्याच्या तालावर भगवान शंकर तांडव-नृत्य करतात. या सूचक व क्षोभक प्रसंगानें हें नाटक समाप्त होतें. समाप्ती-नंतरहि प्रेक्षकांच्या डोळ्यांपुढें ते दोन राजे, ती कर-बंदी, प्रजेची कोंडी करण्यासाठीं बांधलेलें तें धरण आणि धनंजयाचा अहिंसक लढ्याचा आदेश—हीं दृश्यें नाचत रहात. आणि तीं पहातां पहातां, त्यांच्या दृष्टि-पुढें हिंदुस्थान व इंग्लंड यांचें जितजेतेपणाचें नातें उभें राही. मराठींतील ' कीचकवध ' नाटकानें जशी कर्झनशाही रंगभूमीवर उभी केली, तशी ' मुक्तधारेनें ' भारताची स्वातंत्र्य-लालसा नाट्याच्या कोंदणांत बसवून दाखविली.

केवळ हास्यरसानें थबथबणारें नाटकहि रवींद्रनाथ लिहूं शकत. ‘ फाल्गुनी ’ हें त्यांचें विनोदी नाटक असें आहे. त्यांतील पहिल्या प्रवेशांतच एक राजा येतो आणि तो आपल्या कानाजवळील दोन पांढरे केस पाहून उद्गारतो, “ अरेरे ! मी म्हातारा झालों. ” शास्त्री-पंडित येतात आणि त्याला उपदेश करतात, “ महाराज, आतां आपण संन्यास घ्या. ” राजा राज्य-कारभार पहाण्याचें सोडतो. मग एक कवि येतो आणि म्हणतो, “ महाराज, मी एक गंमतीचें नाटक लिहिलें आहे, तें पहावें. ”

नाटकांत नाटक सुरू होतें. गुहेंत एक म्हातारा रहात असतो. त्या ‘ दादाला ’ शोधण्यासाठीं मुलांची धांवपळ सुरू असते. तीं मुलें गेलीं कीं, वसंत ऋतूंतील देवता हसत-हसत, गात-गात, नाचत-नाचत रंगभूमीवर येतात. त्यांचें तें संगीत-नृत्य पहाण्यासाठीं व ऐकण्यासाठीं गुहेंतील ‘ दादा ’ आपल्या अंगावरील पांघरूण फेकून देतो आणि साक्षात् वसंतऋतूप्रमाणें तो स्वतः गाऊं-नाचूं लागतो.

या नाटकाचा प्रथम प्रयोग १९१६ सालच्या प्रारंभीं टागोरांच्या घरींच झाला. रवींद्रनाथांनीं ‘ दादा ’ ची भूमिका केली. दहा दहा रुपयांचीं तिकिटें घेऊन आलेल्या मोटारवंत प्रेक्षकांनीं साऱ्या जागा भरून गेल्या होत्या. रवींद्रनाथांनीं आपला अभिनय व संगीत यांनीं प्रेक्षकांवर चांगलीच छाप पाडली. खेळाचें सारें उत्पन्न दुष्काळग्रस्त बंगाली बांधवांना देण्यांत आलें.

‘ चित्रांगदा ’ हें नाटकहि असेंच रूपकात्मक व रमणीय आहे. त्यांत प्रथम एक शिकारी अरण्यामध्यें शिकारीचें गाणें म्हणत येतो. तो निघून गेल्यावर राजपुत्र अर्जुन प्रवेश करतो. त्याला बारा वर्षें तपश्चर्या करावयाची असते आणि त्यासाठीं तो निर्जन अरण्य शोधीत असतो. या अरण्यांत तो ध्यान करतो आणि जमिनीवर निजतो. अशा वेळीं राजकन्या चित्रांगदा आपल्या मैत्रिणीसमवेत तेथें येते आणि नृत्य करते.

ती आपल्या वडिलांची एकुलती एक कन्या. तिला राजपुत्रासारखेंच शिक्षण मिळालेलें. तिचा वेषहि राजपुत्रासारखाच. पण निद्रिस्त अर्जुनाला पाहिल्यावर तिचें मन मोहित होतें. आणि ती स्त्री-जातीचा आकर्षक वेष धारण करून त्याच्यापुढें उभी रहाते व त्याच्याशीं प्रेमालाप करते. पण तो तपस्वी अर्जुन तिचा तिरस्कार करून तेथून निघून जातो.

चित्रांगदा निराश झाली. ती मदनाला आळवूं लागली. वसंत ऋतूसह मदन अवतीर्ण झाला. " मला एक दिवस तरी सुंदर कर-अर्जुनाला वश करण्याइतकें सुंदर कर. " ती प्रार्थना करूं लागली. कामदेवानें तिला वर दिला, " मी तुला अत्यंत सुंदर करतों. आणि तेंहि एक वर्षभर-एक दिवसभर नव्हे. " अप्सरेप्रमाणें चित्रांगदा लावण्य-संपन्न दिसूं लागली. तिला पहातांच अर्जुन मोहित झाला. मेनकेनें विश्वामित्राचा जसा तपोभंग केला, तसा चित्रांगदेनें अर्जुनाचा केला. चित्रांगदा व अर्जुन दोघेहि प्रणय-लीलामध्यें रममाण झाले. हां हां म्हणतां वर्ष सरलें. चित्रांगदेनें आपल्या उसन्या लावण्याची कथा अर्जुनाला निवेदिली. पण आतां अर्जुनाला अंतर्दृष्टि आलेली होती. लावण्य ओसरलें, तरी तो चित्रांगदेवर प्रेमच करीत राहिला.

' राजा ' हें नाटक १९१० सालीं प्रसिद्ध झालें. त्याचे बंगाली भाषेंतील प्रयोग तर यशस्वी झालेच, पण पुढें १९२२ सालीं, त्याचीं भाषांतरें झालीं आणि फ्रान्स व जर्मनी यांमध्यें त्याचे जे प्रयोग झाले, तेहि युरोपिय रसिकवर्गामध्यें लोकप्रिय झाले. या नाटकांतील राजा आपले राजेपणाचे अधिकार वापरूं इच्छित नाहीं. याचा अर्थ रवींद्र-नाथांना प्रजासत्ताक राज्याची थोरवी, कलेच्या द्वारें, जनमनावर बिंब-वावयाची होती. पण त्याहिपेक्षां एक व्यापक व चिरंतन तत्त्व या नाटकांत गोवलेलें आहे. तें म्हणजे, " व्यक्तीचा जीवात्मा परमात्म्याचा शोध सर्व विश्वांत करतो. पण शेवटीं तो त्याला आपल्या हृदयांतच सांपडतो ! "

हेंच आध्यात्मिक तत्त्व 'डाकघर' या लहानसर पण अतीव रमणीय नाटकांत रवींद्रनाथांनीं गोवलेलें आहे. एक पांगळा मुलगा दररोज टपालवाल्याची वाट पहातो, पण त्याला टपालवाला परमेश्वराचें पत्र आणून देत नाहीं, आणि त्यामुळें त्याला हळहळ वाटूं लागते. या त्याच्या कोमल मनोभावांचें हळुवार चित्रण रवींद्रनाथांनीं केलेलें आहे.

हें नाटक जितकें वाचनाला, तितकेंच प्रयोगालाहि फार चांगलें आहे. त्याला स्वदेशांत तर खूपच लोकप्रियता मिळाली; पण इंग्लंड–जर्मनींतहि तें विलक्षण यशस्वी झालें. त्यांत खुद्द रवींद्रनाथ तर इतकी उत्तम भूमिका करीत कीं, ती एकदां पाहिली म्हणजे जन्मभर विसरली जात नाहीं, असा अनुभव अनेक रसिकांना आला. त्याची भाषा तर इतकी साधी व सरळ आहे कीं, तिला तुलनाच नाहीं, असें टीकाकार म्हणतात.

ग्रंथ-निष्ठ भाषा वगळून व्यवहारांतील चलनी बोली वापरण्याची प्रथा रवींद्रनाथांनीं पूर्वीपासूनच पाडली आहे. पण 'डाकघरां'तील भाषा-शैलीची सूचकता कांहीं विशेषच ! हिंदुस्थानांतील कोणत्याहि खेडवळाला ऐकतांक्षणींच कळावी, अशी सुगम–सुरस भाषा या नाटिकेची आहे–आणि तसाच तिचा विषयहि !

'मालिनी' नाटकांत, प्रेम हें सर्व विश्व जिंकूं शकतें, हें तत्त्व गुंफलेलें आहे.

'अचलायतन' या नाटकांत रवींद्रनाथांनीं हिंदु-समाजांतील मूर्ख व दुष्ट रूढींवर उपहासाचे रेशमी चाबूक ओढले आहेत. समाजांतील निरुपयोगी रूढि अचल रहातात. त्यांचा फोलपणा, किंबहुना दुष्टपणा, दाखविण्यासाठीं नाटककारानें एक वेड्याचें इस्पितळ उभें केलें आहे. हें नाटक प्रेक्षकांच्या हसून हसून मुरकुंड्या वळवितें, आणि त्याबरोबरच न कळत, समाज–सुधारणेचें तत्त्वज्ञान त्यांच्या गळीं उतरवितें.

हिंदूंच्या पौराणिक कथा घेऊन, त्या कलात्मक रीतीनें मांडून, त्यांतून सद्यःकालाला अनुकूल असा संदेश काढण्याचें रवींद्रनाथांचें कौशल्य अलौकिक आहे. कच-देवयानीची कथा कोणा भारतीयास माहीत नाहीं ? पण रवींद्रनाथांनीं तिला मनोहर नाट्याचा साज चढवून, " प्रयाणाचे वेळचा शाप " या नांवाचें इंग्रजी नाटक लिहिलें. त्यांतील देवयानीच्या स्वभावाचें चित्रण अत्यंत मनोवेधक झालें आहे.

' कालमृगया ' या नाटकांत दशरथानें श्रावणाचा चुकून वध केल्याची हृदय-द्रावक कथा रंगविली आहे. ' बलिदान ' नाटकांत देवांना बळी देण्याच्या चालीवर त्यांनीं टीकास्त्र सोडलें आहे. तोच विषय ' नरकवास ' या नाटकांतहि त्यांनीं रंगविला आहे. सोमक नांवाचा पुण्यशील राजा शत-पुत्रांचा लाभ व्हावा, म्हणून आपल्या एकुलत्या एक व लाडक्या मुलाची आहुति यज्ञांत देतो, हें कथानक कोणाच्याहि चित्ताला चटका लावणारें आहे.

अशीं रूपकात्मक नाटकें रचून रवींद्रनाथांनीं अध्यात्माचा संदेश सर्व जगाला दिला. त्यांचीं नाटकें गूढ-गुंजनात्मक वाटलीं, तरी तीं स्वदेशांत व परदेशांत आकर्षक व लोकप्रिय झाल्याशिवाय राहिलीं नाहींत, हें त्यांच्या असामान्य प्रतिभेचें लोकोत्तर फल होय. त्यांचें स्वतःचें सर्व जीवन, प्राचीन कालांतील ऋषि-मुनीप्रमाणें, ईश्वराच्या शोधाला, आध्यात्मिक चिंतनाला वाहिलेलें असे. आणि त्याचें प्रतिबिंब म्हणजे त्यांचें अष्टपैलु साहित्य !

काव्यापेक्षां नाटकें कमी, आणि नाटकापेक्षां कादंबऱ्या कमी, असा रवींद्रनाथांचा साहित्यसंसार आहे. त्यांची पहिली कादंबरी ' बाई ठाकोराणीर हाट ' ही १८८४ सालीं प्रसिद्ध झाली. वसंत-ऋतु आला म्हणजे झाडावर फुलें येतात व फुलांवर फुलपांखरें उड्या मारतात, तसा तारुण्यांतील आपला कल्पना-विलास रवींद्रनाथांनीं या कादंबरींत दाखविला आहे. " घरे बाहेर " या दुसऱ्या कादंबरींत कौटुंबिक जीवन

त्यांनीं रंगविलें आहे. त्यांतील संदीपबाबू या पात्राचें चित्रण वास्तववादी आहे. ' चोखेरबाली ' या कादंबरींतहि घरगुती वातावरण आहे. नवरा-बायकोच्या प्रेमी संसाराला सासू सुरुंग कसा लावते, हें यांत दाखविलें आहे. ' दो भगिनी ' या कादंबरींत त्यांनीं स्त्रीवर्गाच्या दोन प्रवृत्ति रंगविल्या आहेत. शशांकाचें प्रेम आपल्या मेहुणीवर बसतें, व त्यामुळें त्याच्या संसारसुखाचा विध्वंस होतो, असें यांत दाखविलें आहे.

' नौका डुबी ' ही कादंबरी रवींद्रनाथांच्या सर्व वैशिष्ट्यांनीं नटलेली आहे. समुद्रांत वादळ झाल्यामुळें दोन लग्नांचीं वऱ्हाडें उध्वस्त होतात, आणि नायकाच्या गळ्यांत भलतीच वधू येऊन पडते. त्याची अवस्था दुष्यंत राजाप्रमाणें " नच खलु परिहातुं नैव शक्नोमि भोक्तुम् " अशी होते. आर्य संस्कृतिला शोभेशा संयमानें तो वागतो. शेवटीं सर्वांच्या गांठी पडून योग्य वधू-वरांचें मीलन होतें; असें उत्कंठा वाढविणारें कथानक या कादंबरीचें आहे. ही कादंबरी तर लोकप्रिय झालीच, पण तिच्यावर आधारलेला ' मीलन ' हा बोलपटहि चांगलाच गाजला; एवढेंच नव्हे तर त्या कादंबरीवर आधारलेलें ' गंगेची कन्या ' या नांवाचें नाटक, १९५७ सालच्या जानेवारी महिन्यांत, रशियांत मॉस्कोच्या रंगभूमीवर करून दाखविण्यांत आलें; तेव्हां त्यानें रशियन प्रेक्षकांच्याहि चित्तवृत्ति काबीज केल्या.

' गोरा ' ही रवींद्रनाथांची कादंबरी सर्व-श्रेष्ठ मानली जाते. ती विचाराला धक्के देणारी आहे. ' गोरा ' च्या मुखानें रवींद्रनाथ स्वतःच बोलत आहेत असें वाटतें–किंबहुना, पारतंत्र्याच्या दडपणामुळें विव्हळणारा भारत-मातेचा आत्माच बोलत आहे असें वाटतें. ब्रिटिश अधिकाऱ्यांचा उन्मत्तपणा व हिंदी प्रजेचा अपमान यांचा संघर्ष या नाटकांत तीव्रतेनें दाखविला आहे. त्याच्या अनुषंगानें मातेच्या त्यागाची महतिहि रवींद्रनाथांनीं गाइली आहे, तशीच हिंदु-स्त्रीची होणारी अवहेलनाहि त्यांनीं मूर्तिमंत उभी केली आहे. जातिभेदावरहि त्यांनीं

जोराचा हल्ला केला आहे. " माणसाचा माणसाकडून इतका अपमान करणारें हें जातीचें वंड मोडलेंच पाहिजे. " असा संदेश त्यांनीं जळजळीत भाषेंत दिला आहे.

गोराचें स्वभाव-चित्रण स्वाभाविक दिसावें म्हणून नाटककारानें असें दाखविलें आहे कीं, त्याचा जन्म १८५७ सालीं, पहिल्या स्वातंत्र्य-युद्धाचे धामधुमींत झालेला आहे. एका हिंदु कुटुंबांत तो वाढत असला, तरी त्याचा जन्म आयरिश बापाच्या पोटीं झालेला आहे. हें जन्म-रहस्य गोराला कळतें नाटकाच्या अगदीं शेवटीं. त्याची हिंदुस्थानावर मातृ-भूमि म्हणून गाढ भक्ति असते. तो एक राष्ट्रीय वृत्तिचा कडवा पुढारी बनतो. त्याचे विचार ध्येयवादी आहेत. पाश्चात्य संस्कृति स्वीकारलेल्या एका ब्राह्मो समाजिस्ट कुटुंबाबद्दल त्याला तिटकारा वाटतो; पण त्या कुटुंबांतील साधुशील वृद्धाबद्दल आदरहि वाटतो. ही भावनांची रस्सी-खेच प्रेक्षकांचीं अंतःकरणें खेचून घेते.

रवींद्रनाथांचे देशभक्तीचे विचार अशाच प्रकारें प्रगट करणारी दुसरी कादंबरी म्हणजे, " दि होम ॲन्ड दि वर्ल्ड." तिच्यांतील नायक निखिल हा स्वदेशीचा पुरस्कर्ता असतो, तर त्याचा मित्र संदीप हा विदेशी कापडाची होळी करण्याचा प्रचार करतो. निखिलची पत्नी संदीपाच्या झगझगीत प्रचाराला भाळते. या तीन पात्रांच्या विरोधांतून जें नाट्य निर्माण होतें, तें रसिकांचें अंतःकरण अंकित करूं शकतें.

' चार अध्याय ' या कादंबरींतहि हिंदुस्थानांतील निरनिराळ्या राजकीय चळवळींचें चित्र रवींद्रनाथांनीं रंगविलें आहे.

रवींद्रनाथांच्या लघुकथाहि अशाच एकएका उदात्त तत्त्वाभोंवतीं गुंफलेल्या आहेत. त्यांतहि गूढ-गुंजन आहे, रूपक आहे, आध्यात्मिक संदेश आहे. ' काबुलीवाला ' सारख्या गोष्टींत बाल-मनाचें हृद्य स्वरूप दृष्टीस पडतें. ' गल्पगुच्छ ', गल्पदशक ', ' छोटा गल्प ' अशा निर-निराळ्या नांवांनीं त्यांच्या लघुकथा प्रसिद्ध झालेल्या आहेत.

● ● ●

## : ७ : देशभक्तीची ज्योत

तो काळच असा होता कीं, जेव्हां या देशांतील कोणताहि माणूस राजकारणापासून अलग राहूं शकत नसे. तो काळच असा होता कीं, जेव्हां हिंदुस्थानांतील प्रत्येक जाणता तरुण पारतंत्र्याला विटलेला व स्वातंत्र्य-भावनेनें रसरसलेला असे. तो काळच असा होता कीं, जेव्हां मातृभूमीच्या हाता-पायांतील शृंखला तोडण्यासाठीं, प्रत्येक भारतीय कांहीं ना कांहीं करीत असे. तो काळ होता त्यागाचा--कष्टाचा-हालांचा-देशासाठीं वेडे होण्याचा-देशाच्या स्वातंत्र्यासाठीं प्राण अर्पण करण्याचा !

अशा या तप्त वातावरणाची झळ कोणाला लागणार नाहीं ? अगदीं निवांत ठिकाणीं, पूर्ण एकांतवासांत, काव्य-संगीताच्या शीतल छायेखालीं, रम्य-रम्य कल्पनांचीं जाळीं विणत बसलेल्या रवींद्रनाथांनाहि पारतंत्र्याचे चटके बसल्याशिवाय राहिले नाहींत. समाधिस्थ मुनीनेंहि खडबडून जागें व्हावें, अशा घटना त्यावेळीं घडत होत्या. आणि टागोर-घराणें कितीहि वैभवसंपन्न व कलासंपन्न असलें, तरी देश-प्रेमाची ज्योत तेथें तेवत होतीच. खुद्द देवेंद्रनाथांना इंग्रजी राज्याचाच काय, पण इंग्रजी भाषेचाहि तिरस्कार वाटे. आपल्या एका व्याह्यानें इंग्रजींत लिहिलेलें पत्र त्यांनीं परत केलें. त्यांचे चिरंजीव ज्योतींद्रनाथ यांचें तर स्वदेशीकडे विशेषच लक्ष. त्यांनीं काड्याच्या पेटीचा एक कारखाना काढला होता; तसेच यंत्र-माग सुरू करण्याचाहि प्रयत्न केला होता. आणि एके दिवशीं त्यांच्या कानीं आलें—

" जहाजाचा लिलाव ! " एक जहाज लिलावांत निघाल्याचें ऐकतांच ज्योतिबाबूंना हर्ष झाला. हिंदुस्थानच्या किनाऱ्यावर इंग्रज

कंपन्यांचीं जहाजें वावरतात, हें त्यांना एक शल्य वाटे. कलकत्ता येथील हुगळी नदीच्या पात्रांतून अशीं परकीं जहाजें जातांना दिसलीं म्हणजे त्यांना वाटे, या आपल्या पारतंत्र्याच्या पताकाच आहेत ! स्वदेशीच्या भावनेनें प्रेरित होऊन, त्यांनीं तें जहाज विकत घ्यावयाचें ठरविलें, आणि लिलावांत शेवटचा आंकडा ते बोलले–" ७००० रुपये ! "

वर आंकडा चढेना. त्यांच्या गळ्यांत पडलें तें जहाज !–जहाज कसलें ? एक पोलादी भांडें ! त्याला खालीं एक एंजिन बसवावयाचें होतें व वर खोल्या बांधावयाच्या होत्या ! बाकी सब ठीक !

ज्योतिबाबूंची हिंमत मोठी. त्यांनीं तें मोडकें होडगें दुरुस्त करून चांगलें जहाज बनविलें–आणि 'स्वदेशी' असें नांव देऊन समुद्रांत लोटलें. पहिल्यानंतर दुसरें–व दुसऱ्यानंतर तिसरें–अशा स्वदेशी जहाजांचा ताफा त्यांनीं तयार केला. पण उपयोग काय ? त्यांना सामना देण्यास एक प्रबल युरोपिअन कंपनी सज्ज होती. तिचीं साधनें विपुल, तिचा अनुभव पुष्कळ आणि शिवाय राज्यकर्त्यांचा आश्रय पाठीशीं ! त्यांनीं उतारूंना आपल्या जहाजाकडे ओढण्यासाठीं चुरशीची स्पर्धा सुरू केली. ते त्यांना फुकट नेऊं लागले.–एवढेंच नव्हे तर, चहापाणीहि फुकट देऊं लागले.

या पारतंत्र्याच्या माया-जालांतून हिंदी उतारूंनीं सुटावें, म्हणून ज्योतिबाबूंनीं स्वयंसेवकांचीं पथकें उभारलीं. हातांत निशाण व तोंडांत देशभक्तीचें गान–अशा थाटांत हे स्वयंसेवक बंदरावर जात आणि आपल्या गाण्यांनीं हिंदी उतारूंना हिंदी जहाजांतून प्रवास करण्यासाठीं आवाहन देत. पण सर्वसामान्य अडाणी जनतेला देशापेक्षां पैशाची ओढ अधिक. ते विलायती जहाजांतूनच फुकट प्रवास करूं लागले, त्यामुळें स्वदेशीं जहाजें पाण्यांतच पडून राहिलीं. ज्योतिबाबूंच्या स्वदेश–सेवेवर पाणी पडलें. लाखों रुपयांचें नुकसान त्यांना सोसावें लागलें.

या सर्व घडामोडींचा परिणाम रविबाबूंच्या संवेदन-क्षम मनावर झाल्याशिवाय कसा राहील ? संगीताची सतार वाजवितांना त्यांचा लय कसा लागेल ? काव्याच्या कमळावर रुंजी घालतांना त्यांचें मन शांत कसें बसेल ? नाट्याची कल्पना-सृष्टि उभारतांना त्यांचें चित्त चलित कसें होणार नाहीं ? हिमालयाचीहि शांतता भंगावी व शीतलता पाझरूं लागावी, असा वणवा देशांत पेटत होता; त्याची उष्णता रविबाबूंना जाणवल्याशिवाय कशी राहील ? ते विश्वबंधु होते, अखिल मानवतेचे भक्त होते, शुद्ध ध्येयवादाचे उपासक होतें, हें सारें खरें; पण त्यांना त्या अंतराळांतून खालीं खेचून आणून, राजकारणाच्या खडबडीत जमिनीवर उभे करण्यास, क्रूर व कराल पारतंत्र्य समर्थ होतें.

१८८६ सालीं कलकत्ता येथें राष्ट्रीय काँग्रेस भरली; तेव्हां तेथें राष्ट्रगीत म्हणण्याचा मान त्यांना मिळाला. बंकिमबाबूंनीं आपल्या ‘ आनंदमठ ’ कादंबरींत रानावनांतून भटकणाऱ्या संताळ लोकांच्या तोंडीं जें एक पद घातलें होतें, तेंच रविबाबूंनीं कलकत्ता काँग्रेसमध्यें जाहीर रीतीनें प्रथम गाइलें. गाइलें तें इतक्या तन्मयतेनें, मधुरस्वरानें व परिणामकारक रीतीनें कीं, सारी सभा तल्लीन झाली, प्रभावित झाली, रोमांचित झाली ! आणि तें कादंबरींतील गीत आमचें राष्ट्रगीत म्हणून मान्यता पावलें !–स्वातंत्र्यानंतरच्या राज्यघटनेंतहि मान्यता पावलें ! तें गीत म्हणजे–‘ वंदे मातरम् ! ’

“ त्रिंशत्कोटिकंठकलकलनिनादकराले
द्विंत्रिंशत्कोटिभुजैर्धृत-खर-करवाले ”

अशा भारत-मातेच्या हांका रविबाबूंच्या कानांवर वारंवार पडूं लागल्या. ते आपल्या काव्याच्या ‘आकाश-मंदिरांत’ स्वस्थ राहिले, तरी राजकीय चळवळीच्या लाटा चोहोंबाजूंनीं त्या मंदिरावर येऊन आदळत.

आणि १९०५ सालीं तर कळसच झाला ! ब्रिटिश सरकारचा अेराव व्हॉईसराय लॉर्ड कर्झन यानें काँग्रेसची व स्वातंत्र्य-प्रेमाची वाढती

ज्योत विझवून टाकण्याचा विडाच उचलला. त्यानें बंगाल प्रांताचे दोन तुकडे केले. आपल्या मातृ-भूमीच्या काळजांत कट्यार खुपसलेली पाहून सारे बंगाली तरुण डिवचलेल्या वाघाप्रमाणें एकजात खवळून उठले. रवींद्रहि आपल्या गुहेंतून बाहेर आले. आपल्या राष्ट्रीय पदांनीं यांनीं विद्यार्थ्यांत विलक्षण चैतन्य निर्माण केलें. हा कवि देशभक्तीचीं जळजळीत व्याख्यानें देतहि फिरला. ‘ भांडार ’ नांवाच्या आपल्या नव्या मासिकांत त्यांनीं स्वदेशीवर लेख लिहिले. स्वदेशीची प्रचंड लाट उसळली. कलकत्ता येथें तर एका प्रचंड मिरवणुकीचें नेतृत्व त्यांच्याकडे होतें. तेथील एका सभेंत, त्यांनीं हांक देतांच, जागच्या जागीं, ५०,००० रुपयांचा निधि जमला. त्या सभेंत त्यांनीं सरकारशीं असहकारिता करण्याचा आदेश दिला !

१९०८ सालीं बंगाल प्रांतिक परिषदेचें अध्यक्षपद त्यांना देण्यांत आलें. तेव्हां त्यांनीं बंगाली भाषेंत भाषण करून हिंदु-मुस्लिम ऐक्याचा उपदेश केला. याशिवाय केवळ भूत-दयेनें जन-सेवा करण्यासाठींहि ते धांवून जात. १८९९ सालीं कलकत्ता येथें प्लेगची सांथ पसरली, तेव्हां पीडित लोकांच्या साहाय्यासाठीं त्यांनीं फार कष्ट केले. बंगालमध्यें नद्यांना महापूर वारंवार येत-आणि दुष्काळहि वारंवार पडत. अशा आपत्काळीं रंजल्या-गांजलेल्यांना रवींद्रनाथ सर्व तऱ्हेची मदत करीत. बिहार व क्वेट्टा येथील भूकंप-ग्रस्तांनाहि त्यांनीं उदार हातांनीं मदत केली.

या वंग-भंगाच्या निषेधार्थ कॉंग्रेसनें चौधारी हत्यार उचललें. तें म्हणजे स्वराज्य, स्वदेशी, बहिष्कार व राष्ट्रीय शिक्षण. राष्ट्रीय शाळा-कॉलेजें उघडण्यासाठीं बंगालमध्यें “ नॅशनल कौन्सिल ऑफ एज्युकेशन ” नांवाची संस्था स्थापन झाली. या संस्थेंत रवींद्रांनीं भाग घेतला. त्यांनीं त्यासाठीं व्याख्यानेंहि दिलीं. तसेंच, स्वदेशीच्या प्रचारासाठींहि तनमनधनानें ते झिजले. स्वदेशी मागावर खेड्यापाड्यांत कापड तयार

व्हावें, यासाठीं त्यांनीं पुष्कळ पैसा खर्च केला. पण तो काळ प्रयोगाचा होता. आणि सरकारचा विरोध भयंकर ! ‘ स्वराज्य ’ म्हणण्याची चोरी ! ‘ वंदे मातरम् ’ गाणें हा गुन्हा ! स्वदेशी वस्तु वापरणें म्हणजे पोलिसांच्या डोळ्यावर येणें ! पोलिसांच्या ‘ काळ्या यादींत ’ रवींद्रांचें नांव नोंदलें गेलें. सरकारी दडपशाहीमुळें वंग-भंगाची चळवळ दबली गेली—निदान कांहीं काळ तसें वाटलें.

त्या अपयशानें कैक तरुण निराश झाले, तर कैक युवक ‘ गुप्त मंडळ्या ’ स्थापून, रक्ताच्या शपथा घेऊन, बाँब-पिस्तुलें जमवून, क्रांतिकारकांचा माग आक्रमूं लागले. त्या मार्गावर ज्योतींद्रांच्या पाठोपाठ रवींद्रांनींहि कांहीं पाऊलें टाकलीं. ते एका क्रांतिकारक संस्थेचे सभासद झाले. पण त्या गुप्त व हिंस्र मार्गावर त्यांचा विश्वास जडला नाहीं. ते त्यापासून विन्मुख झाले—किंबहुना, चळवळीची लाट उसळल्यावर, राजकारणाच्या रणांगणापासून ते परावृत्तच झाले आणि आपल्या काव्याच्या गुहेंत जाऊन शांतपणें पहुडले. अरविंदबाबूंसारखा अग्नि ओकणारा तेजस्वी तरुणहि वंग-भंगानंतर राजकारणाला पाठमोरा झाला व पांडिचरी येथें योगमार्गांत मग्न झाला. तसाच प्रकार रवींद्रांचाहि. त्यांनीं आपल्या कांहीं कादंबऱ्यांतून तर क्रांतिकारकांच्या गुप्त संस्थांची चेष्टाच केली आहे. त्यांतील दिव्य-दाहक तेज ओळखण्याची दृष्टि जशी शरद्बाबूंजवळ होती, तशी रविबाबूंना नव्हती.

मात्र याचा अर्थ असा नव्हे कीं, रवींद्रांनीं राजकारणाकडे पाठ फिरविली, देशाभिमानाचा संन्यास घेतला, स्वातंत्र्यभक्तीला विराम दिला. १९१८ सालीं पंजाबमध्यें ब्रिटिश सरकारनें दडपशाहीचें थैमान घातलें. १९१९ सालीं अमृतसर येथें जालियनवाला बागेंत जमलेल्या बायाबापड्यांवर व मुलाबाळांवर जनरल डायरनें अमानुष गोळीबार केला. त्यामुळें सारें राष्ट्र संतप्त होऊन उठलें. ‘ नको हें सरकार ! ” असें सर्वांना वाटूं लागलें. निषेधाच्या सभा गांवोगांव भरूं लागल्या.

रवींद्रांना आपला जळजळीत निषेध आपल्या रोकड्या कृतीनें व जळत्या शब्दांनीं प्रगट केला.

त्यांच्या अलौकिक काव्य-कृतीचा जयजयकार साऱ्या जगानें केला; आणि नोबेल पारितोषिकाचा सुवर्ण-मुकुट मस्तकीं चढवून रवींद्रनाथांना कवींद्र बनविलें. तेव्हां, लाजेकाजेनें का होईना, सरकारनें त्यांना १९१४ सालीं, ' सर ' ही पदवी अर्पण केली. ही पदवी केवढी बहुमानाची ! ' सर ' म्हणजे ' सरदारच ' (Knight). या पदवीसाठीं कैक राजे-महाराजे, श्रीमंत-बुद्धिमंत तळमळत-धडपडत; :पण रवींद्रांनीं सरकारच्या पंजाबांतील अत्याचारांच्या निषेधार्थ, ही सन्मानाची पदवी सरकारच्या तोंडावर फेंकून परत केली !-आणि तीहि कपड्यावर पडलेल्या धुळीप्रमाणें, सहज लीलेनें ! एखाद्या क्रांतिकारक तरुणानें एखाद्या गव्हर्नरवर गोळी झाडली असती, तरी झाला नसता इतका गवगवा, रवींद्राच्या या पदवी-त्यागानें जगभर झाला. आणि ही पदवी भिरकावून देतांना त्यांनीं लॉर्ड चेम्सफर्ड या व्हॉइसरायला जें सण-सणीत पत्र लिहिलें, त्यांत त्यांची जशी देशभक्ति, तशीच निर्भयताहि दिसून येते.

त्यांनीं आपल्या पत्रांत सरकारला निःसंदिग्धपणें बजाविलें कीं, " सरकारची ही दंडपशाही कोणत्याहि सुसंस्कृत व सुधारलेल्या सरकारला काळिमा लावणारी आहे-अत्यंत लाजिरवाणी आहे. याला तोड जगाच्या इतिहासांत सांपडणें कठीण. याचें समर्थन काडीमात्रहि कोणाला करतां येणार नाहीं. लोकक्षोभाकडे लक्ष न देऊन सरकारनें कमालीची बेपर्वाई दाखविली आहे. नोकरशाहीच्या मुत्सद्देगिरीचें दिवाळेंच निघालें आहे. सरकार हिंदी जनतेची सर्व बाजूंनीं अशी मानखंडना करीत असतांना, ' सर ' या पदवीचें सन्मान-चिन्ह मी धारण करणें हें अत्यंत लज्जास्पद आहे—निंद्य आहे. यावेळीं, ज्यांचा पाशवी छळ होत आहे; अशा माझ्या देशबांधवांच्या शेजारीं, पदवीरहित अवस्थेंत, मी उभें

रहाणें हेंच मला भूषणास्पद वाटतें. म्हणून मी आपली पदवी परत पाठवीत आहें. ”

पदवी परत करून रवींद्रांनीं सरकारशीं असहकारिताच पुकारली. पण काय गंमत पहा, पुढें १९२० सालीं, ता. १ ऑगस्ट रोजीं, म. गांधींनीं असहकारितेची चळवळ पुकारली, तिला मात्र रवींद्रांनीं विरोध केला. वास्तविक टागोर व गांधी हीं नर-रत्नें एकाच खाणींतील. भारत-मातेचे हे दोन सुवर्णालंकार एकाच मुशींतील ! रोमांरोला या ग्रंथकारानें वर्णिल्याप्रमाणें, “ सिंधु व गंगा या दोन महानद्यांप्रमाणें, टागोर व गांधी या दोघांनीं भारताची भूमि अध्यात्म-विचारानें सिंचिली, शांति-प्रेमानें भिजविली आणि तींतून सेवेचें व त्यागाचें पीक तरारविलें. ”

साऱ्या जगांत हिंदुस्थानचें नांव गाजविण्यांत हे दोघे अग्रेसर. पण गांधीजींनीं आपल्या असहकारितेच्या चळवळींत शाळा-कॉलेजा-वर बहिष्कार घातला; तो रवींद्रांच्या दृष्टीला पाश्चात्य ज्ञानावरचाच बहिष्कार असा भासला. गांधीजींचा चरखा हा तर त्यांना जीर्ण युगाचा प्रतीक वाटला. “ त्यामुळें शेतकरी शेतीपासून परावृत्त होईल आणि सारा देश स्वराज्यापासून निवृत्त होईल. ” अशी टीका रवींद्रांनीं केली. त्यांना अशी भीति वाटूं लागली कीं, सूत कातणारा माणूस स्वतःपुरतेंच पाहील व देशाला विसरेल. त्यांनीं गांधीजींना नम्र-भावानें व आदरभावानें सूचना केली कीं, “ असहकारितेचें तत्त्वज्ञान निराशेचें व निष्क्रियतेचें आहे, म्हणून तें आपण सोडून द्यावें. किंबहुना, या राजकारणाच्या राम-रगाड्यांतून आपण बाहेर पडावें आणि सर्व जगाला शांति-प्रेमाचा मंत्र सांगत, आकाशांतील पांखराप्रमाणें, स्वच्छंदानें संचार करावा. ”

रवींद्रांना गांधीजींच्या चारित्र्याविषयीं व कर्तृत्वाविषयीं अपार आदर असे. दक्षिण आफ्रिकेंत गांधीजींनीं केलेल्या सत्याग्रह—संग्रामाचें त्यांना मोठें कौतुक वाटे. आफ्रिकेंतून आपले शिष्य घेऊन गांधीजी

हिंदुस्थानांत १९१५ सालीं आले; तेव्हां त्यांना थारा दिला रवींद्रांनीं, आपल्या ‘ शांति–निकेतनांत ’. परंतु ते गांधीजींची भूमिका इतकी मोठी मानत कीं, त्यांचे विचार व कार्य एका देशापुरतें व एका काला-पुरतें मर्यादित रहावें, हें त्यांना योग्य वाटत नव्हतें. सर्व जगासाठीं व सर्व कालासाठीं गांधीजींनीं आपलें तत्त्वज्ञान प्रगट व प्रसृत करावें, अशी त्यांची प्रेम–मूलक महत्वाकांक्षा.

पण गांधीजी जितके ध्येयवादी; तितकेच वास्तववादीहि. आध्या-त्मिक क्रांतीला भौतिक क्रांतिची जोड देण्यावर त्यांचा भर. मनःस्थिति व परिस्थिति या दोहोंची सुधारणा करण्यास ते प्रवृत्त. कल्पनेला कृतीचे पाय जोडण्यास ते समर्थ. त्यांनीं आपल्या बॅरिस्टरी बुद्धिनें, कविवर्यांच्या एकएका आक्षेपाचें खंडन करणारा, लेख लिहिला. शाळा–कॉलेजवर बहिष्कार हा ज्ञानावर बहिष्कार नसून परक्या सरकारच्या आधारस्तंभा-वर तो आघात आहे, आणि शुद्ध ज्ञानार्जनासाठीं, राष्ट्रीय शाळा–कॉलेजें उघडण्यांत येत आहेत, असें रोकडें उत्तर गांधीजींनीं दिलें.

चरख्यावरील आक्षेप तर त्यांनीं नाना दिशांनीं उडवून लावला. “ पारतंत्र्यामुळें अन्नान्नगत झालेल्या हिंदी शेतकऱ्याला तो उत्कृष्ट जोडधंदा आहे–शेतीला पोषक आहे–आणि सूत काततां कातता नागरिकाच्या मनांत स्वदेशप्रेम जागृत करणारा आहे. चरख्यावरील सुताचा धागा, शहरें व खेडीं यांना एकत्र बांधणारा आहे. ” असे परोपरीनें युक्तिवाद करून गांधीजींनीं एकदम काव्याच्या अंतराळांत उड्डाण केलें. कवीला कवीचीच भाषा कळेल, असें मानूनच कीं काय, गांधीजी अलंकारिक भाषेंत लिहितात,

“ आमच्या देशाला आग लागलेली आहे. अशा वेळीं कवीनें आपली वीणा व विद्यार्थ्यांनीं आपले ग्रंथ बाजूस ठेवले पाहिजेत व सर्वांनीं आग विझविण्यास धांवलें पाहिजे. चरख्याचें संगीत हें सध्यां सारंगीच्या निनादापेक्षां मधुर वाटलें पाहिजे. कविवर्यांनीं आपली

सतारहि क्षणभर बाजूला ठेवून चरखा चालविण्यास पुढें यावें. फार काय, प्रत्यक्ष परमेश्वर या वेळीं भारतांत अवतरला, तर तोहि कष्ट व भाकरी याच रूपांत अवतेरल. कोट्यवधि उपाशी हिंद बांधवांना एकच काव्य कळतें–आणि तें म्हणजे सकस अन्न. ”

आपल्या लेखाच्या शेवटीं गांधीजी गुरुवर्यांना आळवून लिहितात, “ कविराज, तुम्ही म्हणतां प्रातःकालच्या समयीं पक्षी घरट्यांतून बाहेर पडून आकाशांत उंच उंच भराऱ्या मारतो आणि भराऱ्या मारतां मारतां परमेश्वराचें गुणगान करतो, त्याकडे पहा. पण माझ्या डोळ्यांपुढें हिंदुस्थानांतील हे करोडों पक्षी दिसत आहेत. त्यांना अन्न नाहीं आणि म्हणून उडण्याची शक्तीहि नाहीं. दिवसभर थकून रात्रीं जेव्हां हे पक्षी निजतात, त्यापेक्षां अधिक थकवा ते दुसऱ्या दिवशीं उठतात तेव्हां त्यांच्या अंगीं असतो. एक प्रकारच्या मूर्च्छेंत ते सतत रहातात. अशा लोकांना स्वकष्टानें, आपल्या घरीं बसून, अल्पस्वल्प तरी पैसा देणारा चरख्याशिवाय दुसरा कोणीहि त्राता नाहीं. ”

या आपल्या काव्यमय वाणीशीं कृतीची सांगड गांधीजींनीं इतक्या प्रचंड प्रमाणावर घातली कीं, त्यामुळें त्यांचे आक्षेपक हे प्रचारक बनले आणि विरोधक हे साहाय्यक झाले. रवींद्रनाथ तर त्यांना आपल्या भावासारखेच मानूं लागले. निरनिराळ्या प्रसंगीं त्यांनीं आपल्या प्रतिभा–संपन्न वाणीनें गांधीजींचें माहात्म्य बहारीनें वर्णिलें. एकदां त्यांनीं एका अमेरिकन पत्र–पंडिताला सांगितलें, “ यज्ञाला वाटलें, आपण मनुष्य–रूप घ्यावें, आणि तो अवतरला गांधींच्या रूपानें. तुम्ही अमेरिकन लोकांनीं आपली सारी संपत्ति गांधीजींस देऊं केली; पण त्यांना तिचा विनियोग मानवजातीच्या हितार्थ करतां येण्यासारखा नसेल, तर ते त्यांतील फुटक्या कवडीलाहि शिवणार नाहींत. उद्यां त्यांना भारत–भूमीचें सिंहासन कोणी दिलें, तर ते त्यावरील रत्न–माणकें काढून त्यांतून आलेला पैसा दरिद्री-नारायणाला वांटून मोकळे होतील. ”

गांधीजींच्या माहात्म्याचें बीज जसें या त्यागांत आहे, तसें त्यांच्या धैर्यांतहि आहे, हें तत्त्व रवींद्रनाथांनीं किती कौशल्यानें पटविलें आहे, पहा ! ते म्हणतात, " मला उद्यां कोणी गळफांस लावला तर ' धांवा हो धांवा ' असा टाहो मी फोडीन, पण अशा स्थितींत गांधींच्या मुखावाटें दुःखाचा सुस्काराहि निघणार नाहीं, अशी माझी खात्री आहे. उलट, गळफांस लावणाऱ्यांकडे पाहून त्यांना खरोखरच हसूं येईल. मरतांनासुद्धां हंसतमुखानें ते प्राण सोडतील. "

कवीची ही भविष्य-वाणी पुढें खरी ठरली !

१९३२ सालीं, हरिजनांचा वेगळा मतदार-संघ रद्द व्हावा म्हणून, गांधीजींनीं येरवड्याच्या तुरुंगांत प्राणांतिक उपोषण केलें. तेव्हां गुरुदेव कलकत्त्याहून येरवड्याला गेले आणि प्रेमाश्रूंचा वर्षाव त्यांनीं गांधीजींवर केला. उपोषणाच्या समाप्तीचें गीत त्यांनींच म्हटलें.

जसें गांधीजींवर, तसेंच पंडित जवाहरलालांवरहि रवींद्रनाथांचें गाढ प्रेम असे. देश-भक्ति व विश्व-संस्कृति या दोन गुणांमध्यें या तीनहि विभूतींचीं चरित्र-रत्नें गोंवलीं आहेत. रवींद्रनाथ पंडितजींचें वर्णन करतांना म्हणतात,

" जवाहरलाल हे ऋतुराज वसंत आहेत—यौवन व विजयानंद यांचें प्रतीक आहेत. अन्यायाशीं अदम्य युद्ध करून स्वातंत्र्यावर निःशेष निष्ठा ठेवणारे ते आहेत. त्यांचा अढळ निर्धार, अचल धैर्य, अव्यभिचारी सत्य-निष्ठा व नीतिशुद्ध हेतु या गुणांनीं त्यांनीं उच्च स्थान कमावलेलें आहे. तरुण भारताच्या सिंहासनावर खरोखर जवाहरलालांचाच हक्क आहे. "

कविराजांचें हेंहि भविष्य खरें ठरलें.

असा केवळ गुण-गौरव करूनच रवींद्रनाथ थांबत नसत. जरूर तेव्हां, सरकारच्या अन्यायावर सडेतोड टीकाहि ते निर्भयपणें करीत. १९३१ सालीं बंगालमधील हिजलीच्या तुरुंगांत राजबंद्यांवर गोळीबार करण्यांत आला. तेव्हां त्यांनीं सरकारचा निषेध जळजळीत शब्दांनीं

केला. कलकत्ता येथें ' नगर-भुवनां 'त भरलेल्या सभेच्या अध्यक्ष-स्थानावरून त्यांनीं सरकारला असा इशारा दिला कीं, " ब्रिटिशांच्या नैतिक सत्तेला ओहोटी लागत चालल्याचें हें चिन्ह आहे. सरकार कितीहि बलाढ्य असलें, तरी त्याला न्याय किंवा सत्य पायांखालीं तुडवितां येणार नाहीं." पुढें गांधीजींनीं वारंवार जे स्वातंत्र्य-संग्राम केले, तेव्हां सरकारनें केलेल्या अन्यायाचा समाचार रवींद्रनाथांनीं अशाच कडक शब्दांनीं घेतला.

राजकारणाच्या नेहमींच्या धकाधकींतून रवींद्रांनीं आपलें अंग काढून घेतलें असलें, तरी राष्ट्रांतील तेज व चैतन्य कायम रहावें आणि त्याचें महत्त्व व श्रेष्ठत्व सर्व जगाला पटावें, याचा निदिध्यास त्यांना असे. ही त्यांची राष्ट्रीय वृत्ति म. गांधींनींच काय, पण लो. टिळकांनींहि पूर्वीपासून ओळखली होती. रवींद्रनाथ एकदां अमेरिकेच्या दौऱ्यावर निघाले असतांना लोकमान्यांनीं त्यांना ५०,००० रुपयांचा चेक पाठवून दिला. मागितला नसतां, कोणतीहि अट न घालतां, विशिष्ट कार्याचा उल्लेखहि न करतां ! रवींद्रनाथांची मूर्ति जगाला दिसणें म्हणजेच भारताची कीर्ति पसरणें होय, हें ते जाणून होते.

एक जपानी कवि मि. नोगुची ' शांति-निकेतन'ला गेले होते— भारतांत फिरले होते, पण जपानला परत जातांच त्यांनीं भारतीय लोकांची नालस्ती करणारा एक लेख लिहिला. तेव्हां त्यांची खरपूस हजेरी घेणारा लेख या वृद्ध कविवर्यानें लिहिला. ' शांति-निकेतनच्या ' आश्रमांत शांतपणें कालक्रमणा करणाऱ्या वाल्मीकि ऋषीचा हा सात्त्विक संताप पाहून त्यांच्या भक्तांनाहि विस्मय वाटला.

कॅनडा देशांतून या कवि–रायाला एकदां निमंत्रण आलें–मोठ्या गौरवानें बोलावणें आलें. पण तें त्यांनीं झिडकारिलें. का ? तर त्या देशांत हिंदी बांधवांना मज्जाव असे ! असा तीव्र देशाभिमान या विश्व–बंधु कविवर्याच्या नसांत खेळत असे.

शाळा खरी, पण ती चार भिंतींत भरलेली नाहीं.

शाळा खरी, पण तिला वेळा-पत्रकानें बांधलेलें नाहीं.

शाळा खरी, पण तीं क्रमिक पुस्तकें नि त्या बांधीव वह्या नि त्या यांत्रिक परीक्षा-यांचा जंजाळ नाहीं.

रवींद्रनाथांच्या शाळेला कोणतेंहि तारेचें कुंपण नाहीं, कोणतीहि ठरीव चौकट नाहीं कीं कोणताहि नियमांचा पिंजरा नाहीं. ' आकाश मंडप । पृथिवी आसन । ' हीच त्या शाळेची चतुःसीमा. आकाशांत पांखरें भराऱ्या मारतात ना? पृथ्वीवर हरिणें उड्या मारतात ना? समुद्रांत मासे पोहतात ना? तशा स्वतंत्रतेनें, स्वच्छंदानें, स्वानंदानें रवींद्रनाथांच्या शाळांतील मुलें व मुली बसतात-बोलतात, गातात-नाचतात, खेळतात-बागडतात-आणि त्यांतूनच ज्ञान ग्रहण करतात.

स्वतः रवींद्रनाथांना आपल्या बालपणीं शाळेचा कोण कंटाळा ! तो दवाखाना आहे-नव्हे कैदखाना आहे, असें त्यांना वाटे. ' अंदमानचा बंदिवास ' असेंच नांव ते आपल्या वेळच्या विद्यालयाला देत. पण त्यांनीं कलकत्त्याजवळ, बोलपूर येथें, शांतिनिकेतन नांवाच्या आपल्या शेतीवाडींत, ' विश्वभारती ' नामक जी शिक्षण-संस्था स्थापन केली, ती सर्व देशांत अपूर्व होती, पूर्वीच्या ' गुरुकुला ' ची स्मृति करून देणारी होती आणि देव-मंदिराप्रमाणें पवित्र होती. तींत घराचा कौटुंबिक जिव्हाळा ओतप्रोत भरलेला होता, हें विशेष. पूर्वीं कारा-गृह वाटणारें शाला-गृह रवींद्रनाथांनीं देव-गृह बनविलें. ही त्यांची कामगिरी चिरंतन स्वरूपाची आहे.-शिक्षण-क्षेत्रांत क्रांति करणारी आहे. त्यांच्या प्रतिभेचें हें एक साकार काव्यच होय !

" शिक्षणाचा हेतु काय ? मुलाच्या मनांत शब्दांचें अर्थ कोंबणें हा नव्हे, तर त्या बाल-मनाचें दार ठोठावणें. आणि तें दार उघडल्यावर, त्यांतून आंतील ज्ञान बाहेर आणणें. " असें आपलें शिक्षणाविषयींचें मत रवींद्रनाथांनीं आपल्या ' आठवणींत ' लिहून ठेवलें आहे.

मुलाची जिज्ञासा जागृत करणें, त्याची स्वतंत्र प्रज्ञा मोकळेपणीं खेळूं देणें, हेंच शिक्षणाचें खरें ध्येय. त्याच्या फुललेल्या अंतःकरणांतून विद्येचा सुगंध आपोआप सुटला पाहिजे. त्याचीं साधनें म्हणजे पुस्तकें–परीक्षा–पदवी ! पण आजच्या शिक्षण-क्रमांत साधनांनाच साध्यापेक्षां अधिक महत्त्व आलें आहे.

मुलांच्या प्रवृत्ति एकीकडे, तर आमचें शिक्षण भलतीकडे ! मुलाला मोकळ्या हवेंत, हिरव्यागार रानांत, नदीच्या कांठीं, उंच टेकडीवर, स्वच्छंदानें हिंडावें, फुलें–पांखरें पहावींत, अशी लालसा ! तर—

" पुष्प–वर्ण नटला पळसाचा " म्हणजे काय ? शिक्षक विचारतो. मुलें गप्प.

" अर्जुन आणि भीष्म हे दोघे वीर लढत होते–एकमेकांवर बाण टाकीत होते. दोघेहि जखमी झाले होते–त्या जखमांतून लाल लाल रक्त वहात होतें–त्यामुळें त्या जखमा पळसाच्या फुलासारख्या— "

" पण गुरुजी, पळस कसा असतो ? " शहरी विद्यार्थ्यांनीं विचारलें. त्यांनीं जन्मांत कधीं पळस पाहिलेला नव्हता. आणि गुरुजींनीं ? त्यांनींहि नाहीं !

तसाच मोर ! पावसाळ्यांत आकाशामध्यें, काळेसावळे ढग धावूं–पळूं लागले कीं, जमिनीवर गर्द निळ्या रंगाचा व बांकदार मानेचा मोर आपला भव्य पिसारा पसरून थयथया नाचूं लागतो, असें वर्णन शाळांतील शिक्षक करतात–आणि विद्यार्थींहि डोळे मिटून ते ऐकतात. पण दोघांनींहि कोंबडा पाहिलेला नसतो, मग मोर कोठला ?

अशी विसंगति, अशी निर्जीवता आपल्या विद्यालयांत नसावी, यावर रवींद्रनाथांचा कटाक्ष. अशा कृत्रिम व वंदिस्त शाळांमध्यें, विद्यार्थ्यांचें बाल-मन कसें कुचंबलें—कुस्करलें जातें याचा त्यांना स्वतःला अनुभव होता. त्यामुळें ते दोष टाळून, त्यांनीं आपलें विद्यालय चालविलें. त्यांत पूर्ण स्वातंत्र्य ! नियमांचें, वेळेचें, पुस्तकांचें बंधन तर नाहींच, पण जातीचें, धर्माचें, रूढीचें असलें कसलेंहि बंधन नाहीं. निसर्गाच्या सान्निध्यांत, विश्व-बंधुत्वाच्या भावनेनें, साहित्य–संगीत–नाट्य–चित्रादि कलांच्या द्वारा, मुलांना न कळत, हसत–खेळत, शिक्षण घेण्याचें पूर्ण स्वातंत्र्य. त्यांच्या मनोभूमींत ज्ञानाचा पारिजातक वृक्ष बाहेरून कोठून आणून लावावयाचा असें धोरण नाहीं. माळ्यानें खत–पाणी घालून फुलाला निसर्ग–क्रमानें सहजगत्या उमलूं द्यावें, तसें धोरण रवींद्रनाथांच्या विद्यालयाचें आहे.

रवींद्रनाथांच्या विद्यालयाचें नांव, ‘ विश्व–भारती ’. तिचें ध्येयच मुळीं,

यत्र विश्वं भवत्येकनीडम् ।

‘ विश्वाचि माझें घर ’ अशी मति स्थिर करणें हें ध्येय.

हें विद्यालय १९०१ सालीं ‘ शांति-निकेतन ’ येथें उघडलें गेलें. त्याचें औपचारिक उद्घाटन मात्र ता. २३ डिसेंबर १९२१ रोजीं झालें. शांति-निकेतनाची स्थापना महर्षि देवेंद्रनाथांनींच करून ठेवली होती.

कलकत्त्याजवळ बोलपूर नांवाचें खेडें आहे. तेथून दोन मैलांवर एक टेकडी आहे. त्या टेकडीवर गर्द झाडी आहे. असें रम्य व एकांत स्थान देवेंद्रनाथांनीं ‘ तपोभूमि ’ म्हणून निवडलें व तेथें एक लहानसा आश्रम बांधला.

देवेंद्रनाथ आपल्या या ‘ शांति–निकेतनांत ’ ध्यान–धारणा करीत. तेथें दोन वृक्ष जवळ जवळ उभे आहेत. त्यांच्या छायेखालीं

ते प्रातःकाळीं ध्यानस्थ बसत. त्या जागीं, त्यांच्या निधनानंतर रवींद्रबाबूंनीं महर्षींचीं पुढील वचनें कोरलेलीं शिला बसविली—

" देव माझ्या जीवींचा विसांवा आहे—माझ्या चित्ताचा आनंद आहे—माझ्या आत्म्याचें शांतिस्थान आहे. "

त्याच पवित्र वास्तूमध्यें रवींद्रनाथांनीं आपली विश्वव्यापी व सर्वतंत्र-स्वतंत्र अशी शिक्षणसंस्था उघडली. पुराणकालांतील ऋषिमुनींच्या 'गुरुकुलाची' आठवण व्हावी, अशी व्यवस्था ' विश्वभारती'ची आहे.

जगांतील नाना देशांतील विद्यार्थी तेथें येतात; तसेच, विद्वान् शास्त्रज्ञहि. जगांतील नाना धर्म, नाना भाषा, नाना विद्या, नाना कला-यांचा मधुर संगम तेथें झालेला असतो. दाराशींच अशा पाट्या लावलेल्या आहेत.—" प्राणि-हिंसा करूं नका. अस्वच्छ राहूं नका. कोणत्याहि देवतेला कमी लेखूं नका. आश्रमांत मांसाहार वर्ज्य—मूर्ति-पूजाहि वर्ज्य. "

या विद्यालयांत आपण पाऊल टाकलें, तर सर्वत्र शांतता, शीतलता व रम्यता आढळते. कोठें आम्र-वृक्षाखालीं एक शिक्षक ५-७ मुलांना कांहीं माहिती सांगत आहे, तर कोठें संगीताचा वर्ग चाललेला आहे. एकीकडे नदीच्या कांठावर बसून मुलें चित्रें काढीत आहेत, तर दुसरीकडे टेकडीवर चढून पांखरें पहात आहेत. कधीं झाडाखालींच नव्हे तर, झाडावर बसूनहि मुलें काव्य म्हणत आहेत, तर कधीं, खुद्द रवींद्रनाथांनीं लिहिलेल्या नाटकांत मुलें काम करीत आहेत. पण हें सारें शिक्षणच !—ज्ञानार्जनच ! मात्र तें मिळतें क्रीडांगणावर—कलांगणावर ! कधीं भाताच्या शेतावर तर कधीं पावसाच्या वर्षावांत, कधीं रात्रीच्या चांदण्यांत तर कधीं उषःकालच्या प्रकाशांत. गवताच्या हिरव्या पात्यावरील शुभ्र दंव-बिंदूंच सौंदर्य मुलें निरखून पहातात, तर रात्रींच्या आकाशांत चम्‌चम् करणाऱ्या तारकांचा खेळहि तीं न्याहाळतात. आकाशांत निळे ढग भरून आले आणि विजा चमकूं लागल्या कीं, शाळेला सुट्टी !

पुस्तकें फेकून मुलें पटांगणावर नाचूं लागतात. मुलें व मुली–दोघांना शिक्षण एकत्र. आपल्या वडील बहिणीला शिक्षण घेतांना किती त्रास सहन करावा लागला, याची आठवण रवींद्रनाथांना होती. त्या काळीं स्त्रिया शिकत नसत. कलकत्ता शहरांत शाळेंत जाणाऱ्या पहिल्या मुलींमध्यें रवींद्रनाथांची बहीण होती. ती पालखींत बसून शाळेंत जाई. एके दिवशीं पोलिसांनीं पालखी अडविली. कारण त्यांना संशय आला, ही इंग्रज मुलगी असावी आणि तिला कोणी तरी पळवून नेत असावें. हिंदी मुलगी शाळेंत जात असेल, ही कल्पनाच कोणास येत नसे.

'विश्व-भारती'मध्यें पहिल्या वर्षीं, फक्त ९ मुलें होतीं.–त्यांत एक रवींद्रनाथांचा मुलगा. थोड्याच वर्षांत ही संख्या दीडशेंवर गेली. शिक्षण व निसर्ग यांची जशी सांगड तेथें घातली जाते, तशीच शालेय जीवन व सामाजिक जीवन यांचीहि जोड जमविली जाते. वसंत, वर्षा, हेमन्त–या एकेका ऋतूचें आगमन झालें कीं, त्या त्या वेळीं त्यांचे त्यांचे उत्सव तेथें साजरे केले जातात. तसेंच जवळच्या खेड्यांतील शेतांत नांगरट सुरू झाली, तर त्या प्रसंगाचाहि उत्सव साजरा केला जातो. आणि पुढें धान्य खळ्यावर आलें म्हणजे तोहि सण साजरा केला जातो.

विश्व-भारतीमध्यें 'मुलांचें स्वराज्य' केव्हांच चालू झालें आहे. मुलें आपले प्रतिनिधि निवडतात, आणि हे प्रतिनिधि आश्रमाची व्यवस्था व स्वच्छता ठेवतात, खेळ व उत्सव पार पाडतात, भोजनाची व्यवस्थाहि तेच ठेवतात. मुलांच्या खेळांत, गाण्यांत, नाटकांत रवींद्रनाथ स्वतः समरस होत.

अशा आनंदी वातावरणांत पावित्र्य भरून रहावें, म्हणून सर्व मुलें, सूर्योदयाच्या व सूर्यास्ताच्या वेळीं एकत्र जमतात, पंधरा मिनिटें मौन पाळतात आणि नंतर प्रार्थना करतात. मग जो तो आपल्या आवडीच्या विषयाकडे धांव घेतो. विद्यार्थ्यांना आरंभीं फी अजिबात नसे. त्यांची रहाण्याची, खाण्याची, शिक्षणाची–सारी व्यवस्था मोफत ! सारा खर्च रवींद्रनाथांच्या तिजोरींतून.

पण दिवसेंदिवस खर्च वाढूं लागला व तिजोरी रिती पडूं लागली. तेव्हां फी ठेवण्यांत आली. तरी तोटा येऊं लागला, तो इतका कीं, रवींद्रनाथांसारख्या श्रीमंत जमीनदारालाहि असह्य व्हावा. म्हणून त्यांनीं सर्व देशभर हिंडून, आपलीं नाटकें करून, त्यांत स्वतः सोंग घेऊन लाखों रुपये जमविले; एवढेंच नव्हे तर, इंग्लंड–अमेरिका इत्यादि मातबर राष्ट्रांत जाऊनहि, नाटकें करून, त्यांनीं तेथून पैसा ओढून आणला; फार काय, स्वतःच्या काव्यासाठीं मिळालेले नोबेल-पारितोषिकाचे सव्वा लक्ष रुपये या ज्ञानगंगेलाच त्यांनीं अर्पण केले !

तरीसुद्धां सालोसाल तूट येई. ती भरून काढण्यासाठीं हा वृद्ध कवि शहरोशहरीं हिंडे. हें कळल्यावर एकदां गांधीजींनीं त्यांना एका धनिकाकडून एका मुठीनें ६०,००० रुपये देवविले. आणि आतां स्वतंत्र भारताच्या सरकारनें या अद्वितीय शिक्षणसंस्थेचा बराचसा आर्थिक भार उचलला आहे.

आपल्या राष्ट्राची प्रगति खेड्यांचा उद्धार झाल्याशिवाय होणार नाहीं, हें तत्त्व रवींद्रनाथांना पूर्णपणें पटलेलें होतें. म्हणून त्यांनीं १९२२ सालीं ‘ श्रीनिकेतन ’ नांवाची शाखा ‘ शांतिनिकेतनां ’ त उघडली. आजूबाजूच्या खेड्यांतील मागासलेल्या लोकांसाठीं या शाखेनें रात्रींच्या शाळा काढल्या. त्यासाठीं रवींद्रनाथांनीं आपला मोठा मुलगा रथींद्रनाथ यास अमेरिकेस पाठविलें; आणि तेथें तीन वर्षें शेती–शास्त्राचें शिक्षण घ्यावयास लावलें. आधुनिक विज्ञानाचें स्वागत रवींद्रनाथ करीत. शास्त्रीय खतें, भात लावण्याच्या नव्या पद्धती, शेतीचीं आधुनिक अवजारें यांचा उपयोग ‘ श्रीनिकेतन ’ मध्यें होई. त्यांचे प्रयोग पाहून खेड्यांतील शेतकऱ्यांनीं आपलें भाताचें व उसाचें उत्पादन वाढविलें, पूर्वीं नव्हतीं तीं फळझाडें लावलीं; आणि पावसानें होणारी जमिनीची धूप थांबविली.

खेडुतांच्या आरोग्याचें कार्यहि ‘श्री निकेतन’ नें आपल्या अंगावर घेतलें आहे. त्यासाठीं खेड्यापाड्यांत ‘ आरोग्य सहकारी संस्था ’

उघडलेल्या आहेत. त्या संस्थेला प्रत्येक कुटुंब अल्पशी वार्षिक वर्गणी देत असतें. त्या वर्गणींतून डॉक्टरचा पगार भागतो. तो डॉक्टर खेड्यांतच रहातो आणि गांवकऱ्यांना मोफत सल्ला व उपचार सांगतो; आणि औषधें मूळ किंमतीस आणून देतो.

मुलांचा सर्वांगीण विकास व्हावा म्हणून त्यांना निरनिराळ्या व्यवसायांचेंहि शिक्षण देण्यांत येतें. ‘ व्रती बालक ’ नांवाची स्कॉउटची संस्था तेथें आहे. ते खेडुतांच्या सेवेस जातात. खेडयांत आग लागली तर ते विझवतात. दुष्काळ पडला तर ते धान्याची मदत करतात. ते स्वतः भाजीपाला पिकवितात. आजारी माणसांची शुश्रूषा ते करतात. घाण पाण्याचीं डबकीं स्वच्छ करून ते मलेरिया हटवितात. सुतार-काम, कुंभार-काम, लोहार-काम, विणकाम, पुस्तक-बांधणी इत्यादि व्यवसायांचें शिक्षण ग्रामीण शाळांतून दिलें जातें. त्यांतून तयार होणाऱ्या वस्तूंची विक्री करण्यासाठीं, कलकत्ता येथें ‘ शिल्प–भवन ’ उघडलेलें आहे.

‘ विश्व-भारती ’ ही संस्था नांवाप्रमाणेंच विश्वात्मक आहे. तिचें ध्येय “ सत्याचा शोध विविध मार्गांनीं करीत असलेल्या मानवी मनाचा अभ्यास करणें ” हें आहे. त्यासाठीं जगांतील सर्व संस्कृतींचा तेथें व्यासंग चालू असतो. ‘ चीन-भवन ’ या शाखेंत चिनी-संस्कृतीचें परिशीलन चालू आहे, तर जपानी विद्या-कलांचें अध्ययन दुसऱ्या ‘ कला-शाखेंत ’ चालू आहे. युरोप-अमेरिका या खंडांतील बहुतेक सर्व राष्ट्रांतून अध्यापक व विद्यार्थी–दोघेहि ‘ विश्व-भारती ’मध्यें येऊन गेलेले आहेत. जगांतील सर्वविद्योपासकांचें वकलोपासकांचें तें तीर्थक्षेत्र बनलें आहे. तेथें सण साजरे केले जातात ते म्हणजे बुद्ध, चैतन्य, ख्रिस्त, महंमद, राम-मोहन रॉय, महर्षि देवेंद्रनाथ-इत्यादि विभूतींच्या पुण्यतिथि. तेथें सर्व धर्म, सर्व ज़ाति, सर्व वंश, यांचें माहेर आहे-लोभानें व भयानें जगभर भराऱ्या मारीत सुटलेल्या मानवतेला आसरा व विसांवा देणारें तें एक घरटें आहे–किंबहुना एकमेव घरटें आहे.

● ● ● ●

## : ९ :  ' जगीं हो जयजयकार '

हिमालयाचीं उंच उंच शिखरें ! त्यावर पांढरें शुभ्र बर्फ अंथरलेलें ! त्यावर पौर्णिमेचा धवल चंद्रमा डौलानें वर येत आहे–आणि चांदण्याची स्वच्छ चादर पृथ्वीवर पसरत आहे ! पूर्ण शांतता ! संपूर्ण शीतलता !– तसें प्रसन्न व संपन्न साहित्य रवींद्रनाथांचें !–आणि तसेंच त्यांचें समग्र जीवनहि ! त्यांचें काव्य जितकें उच्च व उदात्त, तितकेंच त्यांचें आयुष्यहि !

आपल्या ऐंशी वर्षांच्या दीर्घ आयुष्यांतील बालपणींचीं आठदहा वर्षें सोडलीं, तर हा अभिजात कवि सदासर्वदा एकांतांत रमला, मनांत खेळला, निसर्गांत विहरला, विश्वांत संचरला–आणि शेवटीं विश्वेश्वरांत समरसला, असेंच दिसून येतें. वंग-भूमीचे एक सुपुत्र डॉ. जगदीशचंद्र बोस यांनीं वनस्पतींना वाचा दिली आणि आपल्या सुखदु:खांचे लेख लिहावयास त्यांना लावलें–त्यामुळें विश्वांतील नानात्वामध्यें एकत्व असल्याचें सिद्ध झालें. तेंच कार्य बंगालचे दुसरे सुपुत्र डॉ. रवींद्रनाथ यांनीं काव्याच्या द्वारें करून दाखविलें. आपल्या प्रतिभेच्या दुर्बिणींतून त्यांनीं 'विश्वात्मक देवा'ची ओळख स्वत: करून घेतली-आणि आपल्या असंख्य, वाचकांना करून दिली.

भारतीय संस्कृतीचे रवींद्रनाथ हे एक मूर्त प्रतीक होते–जिवंत स्मारक होतें–चालतेंबोलतें भांडार होतें. मानवजातीच्या ऐक्यभावाचें ते एक समर्थ प्रवर्तक व महान् प्रचारक होते. ते जेथें जेथें जात, तेथें तेथें आपल्या विश्व-प्रेमाची ज्योत पाजळीत. त्यांच्या भाषणांतून व लेखांतून, नाटकांतून व कादंबऱ्यांतून, काव्यांतून व संगीतांतून–सृष्टिप्रेम, मानवप्रेम, ईशप्रेम यांचा एकच एक सूर निघे. एका फ्रेंच कवीनें तर त्यांच्या काव्याचा गौरव पुढील शब्दांनीं केला आहे–

"His lines are philosophy, his ideas sculptures.
He builds with dreams and teaches with silence."

पंक्तींतूनि पाझरे तत्त्वज्ञानाचे झरे।
लेणीं तीं सांठवितीं कल्पनेचे हिरे॥
स्वप्नांचीं मंदिरें उभविलीं त्यानें।
ज्ञानाचीं सदावर्ते तयाचीं मौनें॥

* * * *

१९२० सालची गोष्ट. गुरुदेव हॉलंडमध्यें गेले होते. त्यांच्या कांहीं चहात्यांनीं त्यांना घरीं संध्याकाळीं बोलावलें.—गौरवानें सत्कारलें—स्वतःचीं गाणीं गाण्यास विनविलें. स्वतःचीं कवनें कविवर्य गाऊं लागले—त्यांचे सूर खोलींत घुमूं लागले—कवनांतील भावना रसिकांना मुग्ध करूं लागल्या. घड्याळ टक्‌टक् करीत होतें, पण वेळेचें भान कोणाला होतें? 'Time was not' हाच आत्म-विस्मरणाचा अननुभूत अनुभव सर्वांना. दर्शन व श्रवण एकरूप झाले—श्रोता व उद्गाता अभिन्न बनले—प्रेम व करुणा यांचें दिव्य वातावरण कोंदून गेलें. अशी प्रतीति एका डच विद्वानानें लिहून ठेवली आहे.

* * * *

असाच समाधि-सुखाचा अनुभव 'दीनबंधु' अँड्र्यूज यांनींहि नोंदून ठेवला आहे. 'गीतांजलीं'तील इंग्रजी कवितांचें वाचन इंग्लंडांत प्रथमच व्हावयाचें होतें. १९१२ सालीं ही घटना घडली. कोणा मित्रानें अँड्र्यूजना सांगितलें, आज संध्याकाळीं आपले आयरिश कवि यीटस् हे रवींद्रनाथांचीं कवनें वाचून दाखविणार आहेत. तें कळतांच अँड्र्यूज लगेच, तसेच त्या मित्रासमवेत निघाले. पुढें एका घरीं सारे रसिक जमले – एक एक कवन वाचलें गेलें.

* * * *

'शब्दांनीं वर्णन करण्यास अशक्य अशी माझी अवस्था झाली' असें अँड्रूज सांगतात आणि लिहितात, "रवींद्रांच्या काव्य-सौंदर्यानें माझें मन स्तिमित झालें–मंत्र-मुग्ध झालें. त्यांच्या पायांशीं लोळण घ्यावी असें मला वाटूं लागलें." धुंद झालेल्या मनानें ते परत निघाले, तेव्हां ते स्तब्ध होते. ती धुंदी थोडथोडी ओसरूं लागल्यावर रवींद्रनाथासंबंधीं मित्राशीं ते संभाषण करूं लागले, तेव्हां "नेहमींचेंच आकाश, पण आज मला उज्ज्वल दिसूं लागलें–नव्या सौंदर्यानें नटलेलें भासूं लागलें." असे प्रचीतीचे बोल अँड्रूज यांचे आहेत. ते पुढें रवींद्रनाथांचे परम मित्र झाले.—'शांति–निकेतना' चे प्रेमळ घटक बनले.

* * * *

टोकियो येथील एका विद्यापीठांत जपानी विद्यार्थी दाटीवाटीनें बसले होते–रवींद्रनाथांची वाट उत्सुकतेनें पहात होते. त्यांची ती कर्पूरगौर मूर्ति सभागृहांत येतांच, भगवान बुद्धच अवतीर्ण झाल्याचा भास त्यांना झाला. युरोपमध्यें त्यांना पाहून श्रोत्यांना वाटे, पुनरुत्थान होऊन येशू ख्रिस्तच आपल्यापुढें उभा राहिला आहे. त्यांचीं दिव्य भावानें थबथबलेलीं व उच्च कल्पनेनें नटलेलीं कवनें ऐकतांना,—

"संध्याकाळच्या सोनेरी रंगानें चमकणाऱ्या आकाशांतून राजहंसांची माला उड्डाण करीत चालल्याचा भास आम्हांला होई." असें वर्णन सहृदय श्रोत्यांनीं करून ठेवलेलें आहे.

* * * *

आणि भारतानें तर काय ? 'भारत-भास्कर' अशी पदवी देऊन, 'गुरुदेव' म्हणून संबोधून, 'कवींद्रा' चें सिंहासन अर्पण करून, आपला परम आदर प्रगट केला आहे. गांधीजींना गुरुदेवांविषयीं मोठें प्रेम. त्यांच्या 'शांति-निकेतनांत' गेलें कीं पवित्र आश्रमांत गेल्यासारखें त्यांना वाटे.

आणि पं. जवाहरलाल नेहरूंवरहि गुरुदेवांची पकड विशेष. ते लिहितात, "टागोरांनीं आमच्या राष्ट्रीयत्वाला आंतरराष्ट्रीय अधिष्ठान

मिळवून दिलें. जीवनांतील जीं जीं उदात्त व सूक्ष्म तत्त्वें आहेत, त्यांच्याकडे ते आमची दृष्टि नेहमीं वळवितात. त्यामुळें व्यक्तीचा वा राष्ट्राचा आत्मा धुळीस न मिळतां सदैव सतेज रहातो." हे गुण म्हणजे खुद्द पंडितजींच्याच व्यक्तिमत्वाचे विशिष्ट पैलू नव्हेत काय ? जो तो जगाच्या आरशांत स्वतःचेंच प्रतिबिंब पहातो, हेंच खरें.

सुप्रसिद्ध शास्त्रज्ञ सर प्रफुल्लचंद्र रॉय यांनीं रवींद्रनाथांना वाल्मीकि-व्यास-कालिदास या कवि-रत्न-मालेंत नेऊन बसविलें आहे. स्वामी विवेकानंदांनीं भारतीय संस्कृतीची पताका अमेरिकेंत फडकविली व स्वदेशाची प्रतिष्ठा वाढविली, तशीच कामगिरी रवींद्रनाथांच्या काव्यानें केली, असा निष्कर्ष रॉय यांनीं काढला आहे.

* * * *

रवींद्रनाथ एक कवि होते, कादंबरीकार होते, कथाकार होते, नाटककार होते, प्रबंधकार होते, वक्ते होते, गायक होते, चित्रकार होते, शिक्षण-शास्त्रज्ञ होते, देशभक्त होते आणि अध्यात्मवादी संतहि होते.

त्यांनीं १६ व्या वर्षीं पहिला काव्य-संग्रह प्रसिद्ध केला, १९ व्या वर्षीं पहिली कादंबरी लिहावयास घेतली आणि २० व्या वर्षीं पहिलें नाटक रचलें. त्यांचें हस्ताक्षर अत्यंत सुंदर होतें. तें पाहून युरोपांतील कांहीं विद्वान् चकित झाले. आणि बंगालमध्यें तर त्या अक्षराचें अनुकरण करण्याची प्रवृत्तिच तरुणांत निर्माण झाली. ते लिहीतहि अत्यंत त्वरेनें. जपानला जातांना आगबोटीवर, अवघ्या एका आठवडयांत, त्यांनीं 'प्रकृतेर प्रतिशोध', 'राजा ओ राणी', 'मालिनी' व 'विसर्जन' या आपल्या चार नाटकांचीं भाषांतरें केलीं.

रवींद्रनाथांनीं जवळ जवळ जग-प्रवासच केला होता. सुमारें १३ वेळां ते स्वदेशाबाहेर पडून, कधीं युरोपांत तर कधीं अमेरिकेंत, कधीं जपानांत तर कधीं चीनमध्यें असे नाना देश हिंडून आले होते. " माझें नांवच रवि आहे ना ? तेव्हां रविप्रमाणें सर्व जगभर मी भ्रमण केलेंच पाहिजे. " असें ते थट्टेनें म्हणत.

त्यांच्या ८० व्या वाढदिवशीं त्रिपुराचे महाराजांनीं त्यांना जी पदवी बहाल केली, ती म्हणजे, 'भारत-भास्कर'. तिचा अर्थ केवळ भारतापुरता संकुचित नाहीं, तर भारतामध्यें उदय पावलेला हा भास्कर आपल्या सहस्र नेत्रांनीं अखिल विश्वाकडे पहात आहे व आपल्या सहस्रकरांनीं त्या विश्वाला संभाळीत आहे असा आहे.

रवींद्रनाथावर पदव्यांचा पाऊस किती पडला याची गणती करणेंच कठीण. ज्या ज्या देशांत ते गेले, तेथें तेथें ते सत्कारच पावले. त्यांच्या व्याख्यानांना तुडुंब गर्दी सर्वत्र असे—त्यांच्या नाटकांचें स्वागत प्रेक्षक-वृंद वारंवार टाळ्या वाजवून प्रेमानें करी. कांहीं देशांतील धनिक विद्वानांनीं तर आपल्या घरांतील सर्वच्या सर्व ग्रंथ-संग्रह 'शांति-निकेतन'ला अर्पण केले. युरोपमधील नाना देशांच्या सरकारांनीं त्यांना आपले 'खास पाहुणे' म्हणून ठेवून घेतलें व आपलीं 'खास विमानें' त्यांचे दिमतीस दिलीं. इटालीचा हुकूमशहा मुसोलिनी यानेंहि त्यांचा मोठा गौरव केला.

कोपनहेगन या शहरांतील विद्यार्थ्यांनीं तर, त्यांच्या सन्मानार्थ, मशालींची एक प्रचंड मिरवणूक काढली. जर्मनींतील कांहीं प्रकाशकांनीं त्यांच्या 'साधना' वगैरे पुस्तकांचीं भाषांतरें जर्मन भाषेंत केलीं; आणि तीं हजारोंनीं खपलीं. एका प्रकाशकानें तर त्यांच्या पुस्तकांच्या तीस लाख प्रति खपतील, असा अंदाज बांधून, त्यासाठीं लागणारा सारा कागद आगाऊच खरेदी करून ठेवला.

सन्मान व सत्कार ज्या ज्या स्वरूपांनीं प्रगट होऊं शकतो, तीं तीं सर्व स्वरूपें रवींद्रनाथांना पहावयास मिळालीं. एकदां मात्र राजकारणाचे काळे ढग या कीर्ति-सूर्याच्या आड आले. १९१९ सालीं, पंजाबांतील अत्याचारांच्या निषेधार्थ, रवींद्रनाथांनीं आपली 'सर' ही पदवी सरकारकडे रागानें परत केली. तेव्हां इंग्लंडमधील लोकमत त्यांच्यावर नाराज झालें. त्यानंतर ते तेथें गेले असतां, त्यांचें थंडें स्वागतच झालें;

एवढेंच नव्हे तर पुढें पुष्कळ वर्षें, इंग्लंडांतील शिक्षण-संस्था त्यांच्याकडे संशयी दृष्टीनें, किंबहुना वक्र दृष्टीनें, पहात होत्या. ऑक्सफर्ड विद्यापीठानें त्यांना १९३० सालीं, 'हिबर्ट व्याख्यानें' देण्यास पाचारलें. हें पाचारण म्हणजे एक सन्मानच होय. पण त्या विद्यापीठानें 'डॉक्टर' ही बहुमानाची पदवी तेव्हां त्यांना दिलेली नव्हती कां?

रवींद्रनाथांनीं जशी 'सर' पदवी परत केली, तशीच आपली पदवीहि ते अव्हेरतील, अशी त्यांच्या चालकांना भीति. तरी १९२६ सालीं त्यांचें मत चाचपून पहाण्यांत आलें. "तुम्ही इंग्लंडला याल, तर तुम्हांला ही पदवी मिळेल." असेंहि एका मित्रानें त्यांना सुचविलें. पण केवळ पदवी घेण्यासाठीं ते इंग्लंडला कशाला जातील? अखेर १९४० सालीं ऑक्सफर्ड विद्यापीठानें 'डी. लिट्.' ही पदवी त्यांना देण्याचा निश्चयच केला. पण पदवी घेणाऱ्यानें विद्यापीठांत आलें पाहिजे अशी परंपरा होती तिला तोंपर्यंत दोनच अपवाद झालेले होते. रवींद्रनाथांच्या बाबतींत विद्यापीठानें तिसरा अपवाद केला. त्यांना त्यांच्या भारत देशांतच, त्यांच्या 'शांति-निकेतन' संस्थेंतच, ऑक्सफर्ड विद्यापीठाची पदवी देण्याचा अपूर्व समारंभ घडून आला. त्या विद्यापीठाचे प्रतिनिधि म्हणून सर मॉरिस ग्वायर व सर सर्वपल्ली राधाकृष्णन् हे दोघे पदवी-दान-समारंभ करण्यासाठीं मुद्दाम शांति-निकेतनास गेले होते.

एकाद्या रमणीय उद्यानांतून झुळझुळ वहाणाऱ्या निर्झराप्रमाणें रवींद्रनाथांचें सर्व जीवित प्रशांत होतें हें खरें, पण आपल्या राष्ट्रांतील राजकीय प्रक्षोभाच्या प्रसंगीं तो शांत-शीतल निर्झर एकदम तप्त लाव्हारसाचें रौद्र रूप धारण करी. त्यांची काव्य-भक्ति श्रेष्ठ होती, पण त्यांची राष्ट्र-भक्ति श्रेष्ठतर होती; आणि मानव-भक्ति तर श्रेष्ठतम होती.

१९०६ सालीं त्यांच्या बंगाल प्रांताची फाळणी झाली, तेव्हां ते सिंहासारखे खवळून उठले व गांवोगांव जहाल भाषणें करूं लागले. त्यांच्या भाषणांत उडणाऱ्या निषेधाच्या ठिणग्या पाहून श्रोत्यांना वाटे,

कवीनें सतार टाकून समशेरच आपल्या हातीं घेतलेली आहे. त्यांचं ‘ धर्म-प्रचार ’ हें काव्य तर प्रसिद्ध होतांच एका मॅजिस्ट्रेटानें राजद्रोही ठरविलें व जप्तहि करून टाकलें.

आणि १९१९ सालीं जालियनवाला–बाग–प्रकरणानंतर त्यांनीं ‘सर’ पदवी परत करतांना व्हॉईसरायला जें पत्र लिहिलें, तें ज्वलन्त देशाभिमानानें रसरसणारें आहे. त्यांनीं त्या दिल्लीच्या शहानशहाला बजावून सांगितलें, “ साऱ्या जगाच्या इतिहासांत कोणत्याहि सुसंस्कृत सरकारनें असे अत्याचार केलेले नाहींत. नैतिक दृष्ट्या व राजकीय दृष्ट्या ते अधम ठरतात. यामुळें सर्व देशांतील करोडों लोकांमध्यें तीव्र संताप निर्माण झाला आहे. त्याला वाचा फोडण्यासाठीं मी हा पदवीचा बहुमान परत करीत आहें. त्याचे सर्व परिणाम भोगण्याची माझी तयारी आहे. या पदवीचा अलंकार अंगावरून उतरून माझ्या पीडित व अपमानित देश-बांधवांच्या शेजारीं एक साधा नागरिक म्हणून उभें रहाणेंच मला अभिमानाचें वाटतें.”

पण अशाहि वेळीं सज्जन इंग्रजांबद्दल त्यांनीं एका पत्रांत सद्भावच व्यक्त केला आहे. त्यांत ते विश्व-कवीला शोभेच्या उदारतेनें लिहितात, “ कोणत्याहि राष्ट्राची योग्यता त्यांतील थोर माणसावरूनच मोजली पाहिजे. निरनिराळ्या देशांतील थोर माणसांची जात एकच असते– लांकडें वांकडी-तिकडीं दिसलीं, तरी त्यांतून निघणारा अग्नि एकच असतो. कोणाचाहि द्वेष करणें या गोष्टीचाच मला द्वेष वाटतो.”

“ माझा हिंद देश कितीहि दीन, दरिद्री, दुःखी असो, तो मला प्रिय आहे; इतका कीं त्यांतच वारंवार पुनर्जन्म घेऊन जन्मास यावें, असें मला वाटतें. ”

( “ I shall be born in India again and again. With all her poverty misery, and wretchedness, I love India best. ” )

असा उत्कट देशाभिमान त्यांच्या स्वाभिमानांतून प्रगट होई. त्यांच्या स्वाभिमानाची चुणूक इटालीच्या मुसोलिनीलाहि दिसून आली होती. त्यानें त्यांचा गौरव केला, पण त्यांच्या तोंडीं खोटीं वाक्यें घालून भलता प्रचार केला. तेव्हां रवींद्रनाथांनीं त्याचा स्पष्ट इन्कार केला. जपानमध्येंहि त्यांचा सत्कार झाला, पण एकदां खटका उडाला. चीनबद्दलचा जपान सरकारचा द्वेष त्यांना रुचला नाहीं. तसेंच द्वंद्व-युद्धें वगैरे हिंसेचे प्रकारहि त्यांना मानवले नाहींत.

एकदां जपानमधील त्यांच्या कांहीं मित्रांनीं त्यांना विनंति केली, "कविवर्य, आमचे दोन जपानी वीर होते. ते खासगी कारणावरून एकमेकांशीं द्वंद्व खेळून ठार झाले. त्यांचें स्मारक आम्ही उभारणार आहोंत. त्यावर कोरण्यासाठीं आपण दोन काव्य-पंक्ति रचून द्याव्यात." रवींद्रनाथांनीं आरंभीं नकार दिला. पण फारच आग्रह पडला, तेव्हां त्यांनीं ज्या ओळी लिहून दिल्या, त्यांत त्यांनीं आपली तत्त्वनिष्ठा अचल राखल्याचें दिसून येतें. त्या ओळींचा भावार्थ असा–"देशाचे आणि, हिंसेचे ते उपासक होते–लोक त्यांची स्तुति करीत होते. पण ईश्वराला लज्जा वाटली आणि त्यानें त्या हिंसेची स्मृति, हिरव्या गवताखालीं झाकून टाकली."

१९३६ सालीं ब्रुसेल्स येथें 'जागतिक शांतता परिषद' भरली. तिला रवींद्रनाथांनीं जो संदेश पाठविला त्यांत त्यांचें सारें तत्त्वज्ञान स्पष्टपणें प्रगट झालें आहे. त्यांनीं लिहिलें, "आपल्याला शांतता पाहिजे असेल तर तिची पूर्ण किंमत आपण दिली पाहिजे आणि ती म्हणजे प्रबळ राष्ट्रांनीं आपला लोभ सोडला पाहिजे आणि दुर्बल राष्ट्रांनीं शूर बनण्यास शिकलें पाहिजे."

अशा काव्य-प्रेमी, राष्ट्र-प्रेमी व ईश-प्रेमी मानवाचें जीवन सफल व सुखाचें व्हावें, यांत नवल काय? त्यांच्या जीवनांत संकटें कांहीं थोडीं आलीं नाहींत, गोकुळासारख्या गजबजणाऱ्या त्यांच्या घरांत अनेक

भावा–बहिणींपैकीं फक्त एक वहीणच त्यांना शेवटपर्यंत सोबत करीत राहिली. त्यांना दोन मुलें व तीन मुली होत्या, पण त्यांपैकीं फक्त एक मुलगाच विधमान राहिला. अशीं अनेक सांसारिक दुःखें, इतरेजनांप्रमाणें, त्यांच्याहि वांटयास आलीं. स्वतःच्या दीर्घायुष्यामुळें त्यांना आपल्या मित्रांचे मृत्यु पहावे लागले. पण त्यांच्या अंतःकरणांत शांतीचा चंद्रमा अखंड प्रकाशत होता. त्यामुळें संतोष व समाधान यांचें चांदणें त्यांच्या मुखावर सदैव फुललेलें असे. या त्यांच्या अढळ व अथांग तृप्तींचे उद्गार त्यांच्या काव्यांतून सदैव ऐकूं येतात. “ आनंदाचे डोहीं आनंद–तरंग ” अशी तुकाराम–महाराजांची वृत्ति ते अनुभवीत होते. “ आनंदाचा पूर ” “ दयेचा वर्षाव ”, “ शांतीचा समुद्र ” असे त्यांचे अनेक उल्लेख त्यांची समाधानी वृत्तिच प्रगट करतात. “ मी जितकें दिलें त्याहून अधिक मिळविलें. ” असें आपल्या जीविताचें फळ ते सांगतात. ‘ He comes, comes, ever comes. ’ अशा ईश्वरी साक्षात्काराच्या आनंदांत त्यांचें मन सदैव डुलत असे.

साक्षात् मृत्यूचेंहि भय त्यांना नव्हतें; उलट त्याचें ते सहर्ष स्वागत करीत.—“ हा माझा अतिथि आहे—प्रियकर आहे–परमेश्वराचा दूत आहे. ” असें म्हणून ते मृत्यूला गौरवीत. एके ठिकाणीं तर ते म्हणतात, “ आई आपल्या अर्भकाला जेव्हां उजव्या कडेवरून डाव्या कडेवर घेते, तेव्हां तें अर्भक रडूं लागतें; पण लगेंच ती आई त्याला आपल्या डाव्या कडेवर घेऊन दूध पाजते; तसेंच परमेश्वरानें मानवाला जीवितांतून मृत्यूकडे नेणें होय. ”

आणि हें केवळ कागदावरचें काव्य नव्हतें–त्यांच्या रोमरोमांत भिनलेलें तत्त्वज्ञान होतें. १९२१ सालीं बर्लिनहून लिहिलेल्या एका पत्रांत ते म्हणतात, “ माझ्या जीवन-पथावर संध्या-छाया पसरत आहेत. मी थकून गेलों आहें. ” तरी हा थकलेला मुशाफर पुढें वीस वर्षें आपली शांति-यात्रा करीत चाललाच होता. ते पुनः लिहितात, “ माझा जल-प्रवास

संपत आला आहे असें मला वाटलें. पण नाहीं, ईश्वराची इच्छा निराळी आहे. माझ्या जिव्हेवरील जीर्ण शब्द जेव्हां झरून जातात, तेव्हांच माझ्या अंतःकरणांतून नवीं गीतें उफाळून बाहेर येतात. जुन्या वाटा बुजतात; पण नवे नवे प्रदेश दिसूं लागतात. ”

७० व्या वर्षी त्यांनीं आपल्या चित्रकलेला आरंभ केला, यावरून त्यांचें हृदय कसें चिर-तरुण होतें, चिर-रुचिर होतें, हें कळून येतें.

अखेर या मृत्युलोकावरील ती घटिका उगवली. कोणाचेंहि शरीर मर्त्यच. १९४१ सालच्या मे महिन्यांत ता. ७ रोजीं त्यांचा ८० वा वाढदिवस सर्वत्र मोठ्या समारंभानें साजरा झाला. त्यांचीं तीन नवीन पुस्तकें त्या दिवशीं प्रसिद्ध झालीं.

पण ता.९ऑगस्ट रोजीं ईश्वराघरचें बोलावणें त्यांना आलें.ते बेशुद्ध झाले. ता. ७ ऑगस्ट रोजीं तर त्यांची शांति–ज्योत शांत झाली !

कलकत्ता येथें त्यांची मोठी स्मशान-यात्रा निघाली. त्यांच्या राहत्या घरांतून त्यांचें शव बाहेर नेण्याच्या वेळीं, ऋग्वेदांतील ऋचा म्हणण्यांत आल्या व ब्राह्म-पद्धतीची उपासना करण्यांत आली. त्या घरापासून निमतोळा स्मशान–घाटापर्यंत प्रेत-यात्रा चालली असतांना, हजारों–लाखों स्त्री–पुरुषांनीं त्यांचें अंत्य दर्शन घेतलें, त्यांना भक्ति-भावानें वंदन केलें व त्यांच्यावर फुलें उधळलीं.

रात्रींचे ८। वाजले आणि चंदनाची चिता जळूं लागली. तिच्या ज्वाला कवींद्राची कीर्ति स्वर्गाला नेऊन पोचवीत आहेत, असेंच सर्वांना वाटलें !

“ गुरुदेवांनीं भारताच्या अंतरात्म्याला पृथ्वी-प्रदक्षिणा घडविली. ” असे गौरवाचे उद्गार कोणी काढले; तर कोणी निःश्वास टाकीत म्हटलें, “ आज एका विभूतिचें जीवित समाप्त झालें असें नव्हे—तर एक युगच समाप्त झालें ! ”

# चरित्र–पट

१८६१ जन्म, सोमवार ता. ६ मे १८६१ रोजीं.

१८६८ कविता करण्याचा प्रथम प्रयत्न.

१८७३ उपनयन–समारंभ.
वडिलांबरोबर हिमालयावर.

१८७४ आई शारदादेवीचा मृत्यु, ता. ८ मार्च.

१८७५ पहिला काव्य–संग्रह प्रसिद्ध.

१८७७ ‘ भारती ’ मासिक सुरू. ९ महिन्यांत २२ कविता रवींद्रांच्या. संपादकत्व ( १८९८–९९ ).

१८७८ अहमदाबाद येथें एप्रिल ते सप्टेंबरपर्यंत.
इंग्लंडची पहिली सफर ( सप्टेंबर १८७८ ते १८८० )

१८८३ विवाह–मृणालिनीदेवीशीं ता. ९ डिसेंबर रोजीं.
( मृत्यु २३–९–१९०२ )

१८८४ पहिली कादंबरी ‘ बहु ठाकुराणी हाट ’ प्रसिद्ध. पहिलें व्याख्यान, कलकत्ता येथें ‘ संगीता ’वर.
कारवार येथें वास्तव्य.

१८८५ ‘ बालक ’ मासिक सुरू.

१८८७ आदि ब्राह्मसमाजाचे चिटणीस, १९११ पर्यंत.

१८९० युरोपचा प्रवास, ऑगस्ट ते नोव्हेंबर, (इटाली, फ्रान्स व इंग्लंड).

१८९१ ‘ साधना ’ मासिक सुरू.

१८९४ वंगीय साहित्य परिषदेचे उपाध्यक्ष.

१९०१ ब्राह्म विद्यालयाची स्थापना, ता. २२ डिसेंबर.
‘ वंगदर्शन ’ मासिकाचे संपादक ५ वर्षें.

१९०३ ‘ नौका डुबी ’ कादंबरी प्रसिद्ध.
१३ काव्य–संग्रह तोंपर्यंत प्रसिद्ध.

का.बा. ३९३५९

१९०४ ‘स्वदेशी समाज ’वर व्याख्यान.
‘ शिवाजी उत्सवांत ’ भाग.
वंग–भंग–निषेधाची चळवळ.

१९०५ पिताजी महर्षि देवेंद्रनाथ यांचा मृत्यु ता. १९ जानेवारी.
‘ भांडार ’ मासिकाचे संपादक २ वर्षें.
गद्य वाङ्मयाचे १६ खंड तोंवर प्रसिद्ध.

१९०७ प्रथम ‘ वंग साहित्य परिषदेचे ’ अध्यक्ष.

१९०८ प्रांतिक परिषदेचे अध्यक्ष.

१९११ सुवर्ण–महोत्सव, कलकत्ता येथील ‘ वंगीय साहित्य परिषदेच’ मानपत्र.
‘ तत्त्वबोधिनी पत्रिकेचे ’ संपादक ( ४ वर्षें )

१९१२ युरोप–अमेरिकेची सफर ( मे १९१२ ते सप्टेंबर १९१३ )
‘ गीतांजलीचें ’ इंग्लंडांत इंग्रजी भाषांतर प्रसिद्ध.

१९१३ नोबेल पारितोषिक.
कलकत्ता विद्यापीठाची डी. लिट् पदवी.

१९१४ ‘ सर ’ ही सरकारची पदवी.

१९१५ म. गांधी आपल्या शिष्यांसह आफ्रिकेंतून येऊन शांतिनिकेतनांत राहिले.

१९१६ युरोप–प्रवास ( मे १९१६ ते मार्च १९१७ )

१९१७ जपानमध्यें व अमेरिकेमध्यें व्याख्यानांचा दौरा.
कलकत्ता येथील कॉंग्रेसचे स्वागताध्यक्ष ( कांहीं काळ )

१९१९ ‘ सर ’ पदवीचा त्याग–अमृतसरच्या जालियनवाला बागेंतील कत्तलीच्या निषेधार्थ.

१९२० युरोप–अमेरिकेची यात्रा ( मे १९२०–जुलै १९२१ ).
इंग्लंड, फ्रान्स, हॉलंड, स्वित्झलँड, जर्मनी, डेन्मार्क, स्वीडन ऑस्ट्रिया इत्यादि देशांत.

१९२१ हीरकोत्सव

"शांति-निकेतन" येथें "विश्वभारतीचा" उद्घाटन-समारंभ ता. २२ डिसेंबर रोजीं. १९२२ त ग्रामोद्धारासाठीं 'श्रीनिकेतन' शाखेची स्थापना.

१९२४ आशिया-दौरा ( मार्च ते जुलै ) ब्रह्मदेश, मलाया, चीन व जपान या देशांत.

युरोप-प्रवास. ( सप्टेंबर १९२४ ते फेब्रुवारी १९२५ )

१९२५ 'इंडियन फिलॉसॉफिकल कॉंग्रेस'चे अध्यक्ष.

१९२६ युरोप-दौरा ( मे ते डिसेंबर ) १७ देशांत.

१९२७ मलाया, जावा, बाली व सयाम या देशांना भेटी ( जुलै ते ऑक्टोबर )

१९२९ मलाया, चीन व जपान यांमध्यें प्रवास ( फेब्रुवारी- जुलै )

१९३० युरोप, रशिया व अमेरिका यांमध्यें दौरा ( फेब्रुवारी १९३० त जानेवारी १९३१ )

१९३१ सत्तरीचा वाढदिवस शांति-निकेतनमध्यें मे महिन्यांत. कलकत्ता येथें ता. २५ ते ३१ डिसेंबरांत सप्ताह-समारंभ. 'दि गोल्डन बुक ऑफ् टागोर' या गौरव- ग्रंथाचें समर्पण.

१९३२ येरवड्यास गांधीजींची भेट ( हरिजनांसाठीं केलेल्या उपोषणाच्या समाप्ति-प्रसंगीं )

१९४१ 'भारत-भास्कर' पदवी अर्पण. ऐशींवा वाढदिन देशभर साजरा.

३ नवीं पुस्तकें प्रसिद्ध.

निधन, ता. ७ ऑगस्ट रोजी. ( कलकत्ता येथें. )

IRBK-0106465
IRBK-0106465
अनुक्रम २९८९९
विभाग का. वा.
क्रमांक ९०७४
नों. दि. ३१/३/६९

# राष्ट्रपुरुषांचीं चरित्रें

| | |
|---|---|
| स्वराज्यमंत्रद्रष्टे दादाभाई नौरोजी | ०-१२-० |
| भारतसेवक गोपाळ कृष्ण गोखले | ०-१२-० |
| 'माला' कार चिपळूणकर | १- ०-० |
| न्यायमूर्ति रानडे | १- ०-० |
| राष्ट्रजनक टिळक | १- ४-० |
| सुधारकाचार्य आगरकर | १- ८-० |
| राष्ट्रपिता महात्मा गांधी | १- ०-० |
| राष्ट्रपति डॉ. राजेंद्रप्रसाद | १- ८-० |
| भारतभाग्यविधाता पं. नेहरू | १- ८-० |
| भारतभूषण पं. मालवीय | १- ४-० |
| सरोजिनी नायडू | ०-१२-० |
| पंजाबकेसरी लाला लजपतराय | ०-१२-० |
| विठ्ठलभाई पटेल | ०-१२-० |
| देशबंधु दास | १- ०-० |
| नेताजी सुभाषचंद्र बोस | ०-१२-० |
| सरदार वल्लभभाई पटेल | १- ८-० |
| क्रांतिवीर सरदार भगतसिंग | ०-१०-० |
| जयप्रकाश नारायण | १- ८-० |
| साने गुरुजी | १- ८-० |
| गुरुदेव टागोर | १- ०-० |
| विनोबा भावे | १- ८-० |

## चित्रशाळा प्रकाशन, पुणें २.